## सन २०१७ मध्ये रा.प. मध्यवर्ती कार्यालय,कर्मचारी वर्ग खात्याकडून प्रसारित केलेल्या परिपत्रकांची सूची

| कर्मचारी वर्ग परिपत्रक क्र. | विषय | जावक क्र. व दिनांक |
|---|---|---|
| १ | वाहकाची प्रलंबित अपहार प्रकरणे तडजोड करुन निकाली काढणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/५८०दिनांक २७.०१.२०१७ |
| २. | अपहार प्रवण असलेल्या वाहकाच्या बदली धोरणाबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/६७४ दिनांक ०१.०२.२०१७ |
| ३. | शिकाऊ उमेदवारांच्या नेमणूकीबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/७८४ दिनांक ०६.०२.२०१७ |
| ४. | घरभाडे भत्ता प्रयोजनार्थ शहरांचे/गावांचे सुधारित वर्गीकरणबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/प्रशा/३३२-ए/१३८६ दिनांक १०.०३.२०१७ |
| ५. | रा.प.कर्मचा-यांना परिपत्रक९/८७ भाग २ अंतर्गत रुग्णालयीन खर्चाची प्रतिपूर्ती रा.प. महामंडळाच्या पॅनलवर असलेल्या नजिकच्या रुग्णालयात उपचार करणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/१४०२ दिनांक १४.०३.२०१७ |
| ६. | शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/१४१५ दिनांक १५.०३.२०१७ |
| ७. | महाराष्ट्र सफाई कर्मचारी आयोग सन १९९८-१९९९ च्या अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार शैक्षणिक पात्रतेनुसार "वारसा "हक्काने महामंडळात नेमणूक करणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/४८६-ई/१४२२ दिनांक १५.०३.२०१७ |
| ८. | यांत्रिकी पर्यवेक्षकीय पदांचे विविध व्यवसाय रद्द करणे आणि वरिष्ठ कार्यदेशक व कनिष्ठ कार्यदेशक हे प्रवर्ग सहा.कार्यशाळा अधिक्षक या प्रवर्गात विलिन करणे. | क्र.राप/कर्मवर्ग/राज्यसंवर्ग/यांत्रिकी/१४६४ दिनांक १६.०३.२०१७ |
| ९. | रा.प.महामंडळातील अधिकारी/कर्मचारी यांचेवर बेहिशोबी मालमत्ता,नैतिक अध:पतन,लाचलुचपत, खून,खूनाचा प्रयत्न,बलात्कार या व यासारख्या गंभीर प्रकरणात फौजदारी गुन्हा दाखल झाल्याने निलंबनाची कारवाई झाली असेल अशा प्रकरणी निलंबनाच्या दिनांकापासून १ वर्षानंतर प्रकरण आढावा समितीपुढे ठेवणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/१४९५ दिनांक १८.०३.२०१७ |
| १०. | शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा १०० टक्के वापर करणेबाबत. | क्र.राप/आस्था ४०८-ई (ए) १५४१ दिनांक २०.०३.२०१७ |
| ११. | शिकाऊ उमेदवारांची निवड करण्यासाठी कार्यपध्दती. | क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/१५७७ दिनांक२२.०३.२०१७ |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| १२ | कुटुंब सुरक्षा योजने अंतर्गत गैरहजर व अपहार प्रकारामुळे बडतर्फ करण्यात आलेल्या कर्मचा-यांना पुर्न:नेमणुक देणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/१८३७,दि.०१/०४/२० |
| १३ | राज्य परिवहन महामंडळातील कर्मचारी कामगिरीवर असताना अपघातात जखमी झाल्यास / हृदय विकाराचा झटका आल्यास औषधोपचारास वैद्यकीय अग्रिम देणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/१८९३,दि.०६/०४/२० |
| १४. | कामाच्या ठिकाणी महिलांवर होणा-या लैंगिक अत्याचाराबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/लैंछ/१८९६, दि.०६/०४/२०१७ |
| १५ | सरळसेवा भरती अंतर्गत वाहक/कनिष्ठ पदांसाठी महिलांकरीता ठरविण्यात आलेल्या शारिरीक पात्रतेमध्ये अनुकंपा प्रकरणी शिथिलता देणेबाबत. | क्र.रा[illegible]र्मवर्ग/आस्था/युआर/२१५७, दि.१८/०४/२०१७ |
| १६ | प्रादेशिक कार्यालय स्तर कमी करुन त्रिस्तरीय प्रशासन प्रणाली अनुसरण्यात आल्यामुळे प्रादेशिक कार्यालयातील वर्ग-३ व वर्ग-४ या संवर्गातील पदे गोठविण्याबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/मब/२२३७,दि.२४/०४/२ |
| १७ | ९० दिवसांपुढे व १८० दिवसांपर्यन्त निलंबन कालावधी वाढविणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/२८३५,दि.१९/०५/ |
| १८ | शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरीता आरक्षणाच्या तरतुदीनुसार मा.उच्च न्यायालयाच्या दि.४ मे,२०१७ च्या अंतरीम आदेशाच्या अनुषंगाने खुल्या गुणवत्तेनुसार दिलेल्या तदर्थ नियुक्त्यांसंदर्भात करावयाची कार्यवाही. | क्र.राप/कर्मवर्ग/मावक/२८६६ दि.२०/०५/२०१७ |
| १९ | उपदान अदा करताना तात्पुरत्या समयवेतनश्रेणीच्या तारखेपुर्वीचे १८० दिवसाचा कालावधी उपदानासा[illegible] ग्राहय धरणेबाबत. | क्र.राप/आस्था/साप्र/३०११,दि.३०/०५/२ |
| २० | छोटया संवर्गातील मागासवर्गीयांकरीता आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती. | क्र.राप/कर्मवर्ग/मावक/३२९५, दि.१५/०६/२०१७ |
| २१ | अतिरिक्त उपदान तथा कर्मचारी ठेव निगडीत विमा योजनेअंतर्गत आर्थिक लाभाची मर्यादा पुर्वलक्षी प्रभावाने वाढविण्याबाबत. | क्र.राप/आस्था/साप्र/अतिरिक्त उपदान/३३ दि.१६/०६/२०१७ |
| २२ | वाहकांविरुध्दची अपहार प्रकरणे तडजोड करुन निकाली काढणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/३३६७,दि.१७/० |
| २३ | रा.प.महामंडळातील कार्यालयीन साफसफाई मोहिमेअंतर्गत जुन्या कालबाहय रद्दीची विल्हेवाट/ लिलाव करणेबाबत. | क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/३४०२, दि.२०/०६/२०१७ |
| २४ | शिकाऊ उमेदवार अधिनियम-१९६१ अंतर्गत शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतनात वाढ करणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/३४५६, दि.२३/०६/२०१७ |

Scanned by CamScanner

| | |
|---|---|
| महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील अधिकारी/कर्मचा-यांना स्वीयेतर सेवेत प्रतिनियुक्तीवर पाठविणेबाबत. | क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/३८४९, दि.१४/०७/२०१७ |
| राज्य परिवहन महामंडळातील अधिकारी/कर्मचा-यांवर अवलंबित असणा-या नातेवाईकांच्या वैद्यकीय देयकाबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/३८४२,दि.१४/०७/२०१७ |
| शिस्त व आवेदन कार्यपध्दती अंतर्गत प्राप्त होणा-या रा.प.कर्मचा-यांच्या निलंबन प्रस्तावाबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/४२४३,दि.०२/०८/२०१७ |
| वय वर्षे ४० पुढील चालक/वाहकांची आरोग्य तपासणी करणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/४३५४,दि.०९/०८/२०१७ |
| सरळसेवा भरती अंतर्गत वाहतूक नियंत्रक (कनिष्ठ) पदासाठी महिलांकरीता ठरविण्यात आलेल्या शारिरीक पात्रतेमध्ये अनुकंपा प्रकरणी शिथिलता देणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/४८६-ई/४३[illegible]१,दि.१०/०८/२०१७ |
| दिनांक ०१/०४/२०१७ पासुन कनिष्ठ वेतनश्रेणीचा कालावधी ३ वर्षावरुन १ वर्ष करणेबाबत.(वर्ग-३ व वर्ग-४ मधील रा.प.कर्मचारी.) | क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/५२०३, दि.२६/०९/२०१७ |
| रा.प.अपघातामधील कर्तव्यावरील मृत कर्मचा-यांच्या मृत्यू प्रसंगी अनुकंपा तत्वावर वारसदारांना नोकरी अथवा हिंदु ह्रदय सम्राट शिवसेना प्रमुख, बांळासाहेब ठाकरे, अपघात सहाय्यता निधी योजना अंतर्गत नुकसान भरपाईचा लाभ देणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/४८६-ई/५३०९, दि.२९/०९/२०१७ |
| पर्यवेक्षकीय कर्मचा-यांच्या पदांचे वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी या पदात रुपांतर करण्याबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/म.ब./५३१०,दि.२९/०९/२०१७ |
| वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरलेल्या कर्मचारी [illegible]ना स्वेच्छानिवृत्ती लागू करणेबाबत. | क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/ ५३११, दि.२९/०९/२०१७ |
| कामाच्या ठिकाणी महिलांवर होणा-या लैंगिक अत्याचाराबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत. | क्र.[illegible]/कर्मवर्ग/प्रशा/लैंछ/५४०९, दि.[illegible]/१०/२०१७ |
| प्रादेशिक कार्यालयस्तर कमी करुन त्रिस्तरीय प्रशासन प्रणाली अनुसरण्यात आल्यामुळे पुणे प्रदेशातील गोठविण्यात आलेल्या सुरक्षा रक्षक प्रवर्गाच्या ४ मंजूर पदांपैकी २ पदांची मंजूरी द्वितीय आवेदन समिती व कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयासाठी पुन:र्जिवित करण्याबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/म.ब./५४२१,दि.०९/१०/२०१७ |
| शिकाऊ उमेदवार अधिनियम-१९६१ अंतर्गत शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतनात वाढ करणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/५४७४, दि.१०/१०/२०१७ |
| मेस्कोकडुन तसेच जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाकडुन कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन घेण्याबाबत करावयाची कार्यवाही. | क्र.राप/कर्मवर्ग/म.ब./५७३८, दि.३०/१०/२०१७ |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| ३८ | अपहार प्रवण असलेल्या वाहकांच्या बदली धोरणाबाबत. | ...कर्मवर्ग/प्रशा/६००९,दि.१३/११/२... |
| ३९ | खाजगी रुग्णालयांना रा.प.महामंडळाच्या नामिकेवर (पॅनेल) घेण्याबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/६२३६,दि.२२/११/२... |
| ४० | गजानन हार्ट हॉस्पीटल, जळगाव या रुग्णालयाची मान्यता रद्द करण्याबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/६२३५ दि.२२.११.२०१७ |
| ४१ | सरळसेवा भरती सन २०१६-१७ अंतर्गत सहाय्यक (कनिष्ठ) पदाच्या भरतीबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/घटक संवर्ग/६५०७ दि.०६.१२.२०१७ |
| ४२ | अखिल भारतीय सेवेतील,राज्य सेवेतील तसेच सार्वजनिक उपक्रम,मंडळे,महामंडळे इत्यादींचे अधिकारी/पदाधिकारी यांच्या विदेश दौ-या संबंधिचे निकष,सुचना व कार्यपध्दती -- एकत्रित आदेश. | क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/६५६८ दि.०७.१२.२०१७ |
| ४३ | अनुकंपा तत्वावर लिपीक-टंकलेखक (कनिष्ठ) पदी नेमणूक दिलेल्या परंतु विहित कालमर्यादेत विहित टंकलेखन व एमएससीआयटी संगणक कोर्स प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे सेवा समाप्त केलेल्या कर्मचा-यांना मागील रा.प.सेवेची सलगता न धरता पुर्न:नेमणूक देण्याबाबत. | क्र.राप/आस्था/४८६-ई(१)/६७२३ दि.१५.१२.२०१७ |
| ४४ | सरळसेवा भरती सन २०१६-१७ अंतर्गत देण्यात आलेल्या लिपीक-टंकलेखक(कनिष्ठ)पदातील जाहिरातीच्या अनुषंगाने घेण्यात येणा-या लेखी परीक्षा देण्याकरिता रा.प.महामंडळातील सदर पदाची सर्व अर्हता पूर्ण करणा-या सर्व पदातील इच्छूक कर्मचा-यांना परवानगी देणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/६७५८ दि.१६.१२.२०१७ |
| ४५ | शिस्त व अपिल कार्यपध्दतीबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/६७७० दि.१६.१२.२०१७ |
| ४६ | अपहार प्रवण असलेल्या वाहकांच्या बदली धोरणाबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/६७७१ दि.१६.१२.२०१७ |
| ४७ | चालकांची दृष्टी तिक्ष्णता चाचणी करणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/६७७७ दि.१८.१२.२०१७ |
| ४७ अ | पर्यवेक्षकीय कर्मचा-यांच्या पदांचे वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी या पदात रुपांतर करणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/मब/६९४४(अ) दि.२६.१२.२०१७ |
| ४८ | रा.प.कर्मचारी विशेषत: चालक पदातील कर्मचा-यांसाठी समुपदेशक नेमणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/६९७३ दि.२८.१२.२०१७ |

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ७/२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ ५८०
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४०००0८.
दिनांक:२ ७जानेवारी, २०१७.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय,पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे )/ (समिती क्र.२- औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३ -नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक,रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड
अमरावती /अकोला /बुलढाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय: वाहकांची प्रलंबित अपहार प्रकरणे तडजोड करुन निकाली काढणेबाबत.**

संदर्भ : कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.२४/२०१६ क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/३८४६,
दिनांक ०६ ऑगस्ट, २०१६.

----------

दि.०१.०४.२०१६ रोजी रा.प.संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये पारीत केलेल्या महामंडळ ठराव क्रमांक २०१६:०४:१५ दिनांक ०१.०४.२०१६ अन्वये दिलेल्या निदेशानुसार वाहकांची प्रलंबित अपहार प्रकरणे तडजोड करुन निकाली काढणेबाबत संदर्भित परिपत्रकान्वये कार्यवाही करण्याबाबत सूचना प्रसारीत करण्यात आल्या आहेत. सदर परिपत्रक रद्द करण्यात येत असून, त्याऐवजी खालीलप्रमाणे सुधारीत सूचना देण्यात येत आहेत.

(१)अ) रा. प. महामंडळातील वाहकांच्या खाली नमुद केलेल्या अपहार प्रकरणी खालील प्रमाणे तडजोड करण्यात यावी.

| अ. क्र. | अपहाराचे प्रकार | प्रस्तावित तडजोडीची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | प्रवासभाडे वसुल करुन तिकीट न देणे. | १)प्रथम प्रमाद - अंतर्भूत रकमेच्या ३०० पट किंवा रु.१०,०००/- यापैकी जी रक्कम जास्त असेल ती रक्कम वसुल करावी.<br>२)द्वितीय प्रमाद - अंतर्भूत रकमेच्या ४०० पट किंवा रु.१५,०००/- यापैकी जी रक्कम जास्त असेल ती रक्कम वसुल करावी.<br>३)तृतिय प्रमाद - अंतर्भूत रकमेच्या ५०० पट किंवा रु.२०,०००/- यापैकी जी रक्कम जास्त असेल ती रक्कम वसुल करावी.<br>४)चतुर्थ व त्यानंतरचे प्रमाद -निलंबीत करुन शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार आरोपपत्र देऊन कारवाई करण्यात यावी व सदर वाहकाविरुध्द शिस्त व आवेदन कार्यपध्दतीमधील अनुसूची 'अ' मधील ७-अ ते ७-ज व १२-ब ही कलमे सिध्द झाल्यास, बडतर्फी हीच शिक्षा राहील. |
| २ | प्रवासभाडे वसुल न करणे व तिकीट न देणे | १) प्रथम प्रमाद - अंतर्भूत रकमेच्या ५० पट किंवा रु.१०००/- यापैकी जी रक्कम जास्त असेल ती रक्कम वसुल करावी.<br>२) द्वितीय प्रमाद - अंतर्भूत रकमेच्या १०० पट किंवा रु.२०००/- यापैकी जी रक्कम जास्त असेल ती रक्कम वसुल करावी.<br>३) तृतिय प्रमाद - अंतर्भूत रकमेच्या १५० पट किंवा रु.३०००/- यापैकी जी रक्कम जास्त असेल ती रक्कम वसुल करावी.<br>४)चतुर्थ व त्यानंतरचे प्रमाद -निलंबीत करुन शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार आरोपपत्र देऊन कारवाई करण्यात यावी व सदर वाहकाविरुध्द शिस्त व आवेदन कार्यपध्दतीमधील अनुसूची 'अ' मधील ७-अ ते ७-ज व १२-ब ही कलमे सिध्द झाल्यास, बडतर्फी हीच शिक्षा राहील. |

Scanned by CamScanner

**ब) उपरोक्त अपहाराच्या प्रकाराव्यतिरिक्त इतर अपहाराचे प्रकरणी तडजोड न करता शिस्त व आवेदन कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्यात यावी.**

२) रा. प. महामंडळातील वाहतूक खात्याच्या मार्ग तपासणी पथकातील व सुरक्षा व दक्षता खात्याच्या पथकातील कर्मचा-यांनी तपासणी करताना केलेल्या प्रमादाबाबत खालील प्रमाणे प्रमादीय कारवाई करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| विनातिकीट प्रवास किंवा तिकीट न देणे अशी वाहकांकडून झालेली अनियमीतता (गैरवर्तणूकीची कृत्ये) यांची माहिती देण्यास तपासणी कर्मचा-याने कसूर केल्यास, तसेच कोणताही वाहक/चालक यांनी केलेल्या कोणत्याही अनियमितता / गैरवर्तणूकीचे कृत्य शोधण्याचे व त्यांची खबर देण्याचे तपासणी कर्मचा-याने टाळणे किंवा त्यात कसूर करणे. | प्रथम प्रमाद | अंतर्भूत रकमेच्या ७५ पट परंतू किमान रु.१०,०००/- इतकी नुकसान भरपाई वसुल करण्यात यावी. |
| | द्वितीय प्रमाद | अंतर्भूत रकमेच्या १५० पट परंतू किमान रु.२०,०००/- इतकी नुकसान भरपाई वसुल करण्यात यावी. |
| | तृतीय व त्यानंतरचे प्रमाद | शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार आरोपपत्र देऊन कारवाई करण्यात यावी. |

३) उपरोक्त नमुद केल्यानुसार सदर परिपत्रकाच्या दिनांकापर्यंत अंतिम निर्णय न दिलेल्या प्रलंबित असलेल्या यापुढील अपहार प्रकरणांचा विचार करण्यात यावा. परिपत्रकाच्या दिनांकापर्यंत निकाली निघालेल्या अपहार प्रकरण विचार करण्यात येऊ नये.

४) वरील प्रमाणे अपहार प्रकरणी होणा-या तडजोडी व त्या अंतर्गत होणा-या रकमेच्या वसुलीची कार्यवाही क जबाबदारी संबंधित विभागातील विभागीय वाहतूक अधिक्षक,विभागीय कर्मचारीवर्ग अधिकारी,विभागीय ले अधिकारी व कामगार अधिकारी यांची संयुक्तीकरित्या राहील. यांचेमार्फत अपहार प्रकरणी होणा-या तडजोडी व अंतर्गत होणा-या रकमेच्या वसुलीची प्रकरणे विभाग नियंत्रक यांचेकडे मंजूरीसाठी सादर करण्यात यावीत. या सं कार्यवाहीचा संबधित विभागाच्या नियंत्रण समितीने वेळोवेळी आढावा घ्यावयाचा असून आवश्यकतेनुसार संबं विभागास मार्गदर्शन करावयाचे आहे.

५) उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे वाहकांची प्रलंबित अपहार प्रकरणे तडजोड करुन निकाली काढणेबाबत रा महामंडळाचे कायम स्वरुपी धोरण म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रमाणे करावयाच्या कार्यवाहीच्या अंमलबजावणी संदर्भात संबंधित नियंत्रण समितीमार्फत वेळोवे आढावा घेण्यात यावा, व विभागामार्फत विचारणा केल्यास सदर कार्यवाहीबाबत मार्गदर्शन करण्यात यावे.

सदर परिपत्रक वाहतूक खाते,सुरक्षा व दक्षता खाते व लेखा खात्याच्या सहमतीने प्रसृत करण्यात येत आहे.

वरील सुचनांची अंमलबजावणी त्वरीत सुरु करावी तसेच परिपत्रकाची पोच द्यावी.

**उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतू महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिति तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / मुख्य विधि अधिका सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / सहा.जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधि (सेवामंडळ) / अध्यक्षांचे स्वीय सचिव/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचा अधिकारी (सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्य (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)

(माधव काळे)

Scanned by CamScanner

चारीवर्ग खाते
पत्रक क्र.२ /२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ ६७४
रा.प.मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४००००८.
दिनांक: जानेवारी, २०१७.
०९।२।१७

व्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे
महाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२- औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३ -नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड
अमरावती /अकोला /बुलढाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय : अपहार प्रकरण असलेल्या वाहकांच्या बदली धोरणाबाबत.**

१) रा.प. महामंडळामध्ये उत्पन्न मिळवून देण्याची महत्वपूर्ण जबाबदारी वाहकांवर सोपविण्यात आलेली आहे. परंतू काही वाहक स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी रा.प. रकमेचा विविध प्रकारे अपहार करीत असतात. यामुळे अशा वाहकांवर अपहार प्रकरणात शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार कारवाई करण्यात येत असूनही अपहार प्रकरणांची संख्या कमी झाल्याचे दिसून येत नाही. अशा अपहार प्रकरणांना आळा घालण्याकरिता सदर वाहकांची त्यांनी केलेल्या अपहाराच्या प्रकारानुसार खालीलप्रमाणे बदलीची कार्यवाही करण्यात यावी. सदर बदलीची कार्यवाही करताना दि.०६.०८.२०१६ नंतर घडलेल्या अपराध प्रकरणांचा विचार करण्यात यावा.

अ) **प्रवासभाडे वसूल करुन तिकीट न देणेबाबत** :- सदर अपहाराच्या तृतीय प्रमाद प्रकरणी संबधित विभागातील अन्य आगारामध्ये बदली करण्यात यावी, व चतुर्थ व त्यानंतरच्या प्रमाद प्रकरणी सदर कर्मचा-याची संबंधित प्रदेशातील इतर विभागामध्ये बदली करण्यात यावी.

ब) **प्रवासभाडे वसूल न करणे व तिकीट न देणेबाबत** :- सदर अपहाराच्या तृतीय प्रमाद प्रकरणी संबधित विभागातील अन्य आगारामध्ये बदली करण्यात यावी, व चतुर्थ व त्यानंतरच्या प्रमाद प्रकरणी सदर कर्मचा-याची संबंधित प्रदेशातील इतर विभागामध्ये बदली करण्यात यावी.

क) **अपहार क्र.अ व ब बाबत** :- चतुर्थ प्रमाद प्रकरणी कर्मचा-यावर करण्यात आलेल्या शिस्त व आवेदन कार्यपद्धती अंतर्गत कर्मचारी निलंबीत / बडतर्फ झाला असेल व सदर कर्मचारी अपिलाद्वारे अथवा मा.न्यायालयाच्या निकालानुसार किंवा प्रशासकीय कारणास्तव पुन:श्च सेवेत दाखल झाला असेल तर त्या कर्मचा-याची अन्य विभागात पद:स्थापना करण्यात यावी.

२) रा.प. महामंडळातील वाहतूक खात्याच्या व सुरक्षा खात्याच्या मार्गतपासणी पथकामधील कर्मचा-यांनी मार्गतपासणी करताना केलेल्या प्रमादाबाबत करावयाच्या कारवाई व्यतिरिक्त खालीलप्रमाणे बदलीची कारवाई करण्यात यावी.

अ) मार्ग तपासणी पथकातील कर्मचा-यांकडून मार्ग तपासणी करताना दुसरा प्रमाद घडल्यास उपरोक्त शिक्षेव्यतिरीक्त सदर पथकातील कर्मचारी घटक संवर्ग पदातील असल्यास त्या कर्मचा-याची मार्ग तपासणी पथकातून विभागातील अन्य आगारामध्ये बदली करण्यात यावी व मार्ग तपासणी पथकातील कर्मचारी राज्य संवर्ग पदातील असल्यास त्या कर्मचा-याची बदली संबंधित प्रदेशातील अन्य विभागामध्ये बदली करण्यात यावी.

ब) मार्ग तपासणी पथकातील कर्मचा-यांकडून मार्ग तपासणी करताना तिसरा व त्यानंतरचा प्रमाद घडल्यास उपरोक्त शिक्षेव्यतिरीक्त सदर पथकातील कर्मचारी घटक संवर्ग पदातील असल्यास त्या कर्मचा-याची संबंधित प्रदेशातील अन्य विभागामध्ये बदली करण्यात यावी व मार्ग तपासणी पथकातील कर्मचारी राज्य संवर्ग पदातील असल्यास त्या कर्मचा-याची बदली इतर प्रदेशातील विभागामध्ये करण्यात यावी.

तृतीय प्रमाद प्रकरणी कर्मचा-यावर करण्यात आलेल्या शिस्त व आवेदन कार्यपद्धती अंतर्गत कर्मचारी निलंबीत / बडतर्फ झाला असेल व सदर कर्मचारी अपिलाद्वारे अथवा मा.न्यायालयाच्या निकालानुसार किंवा प्रशासकीय कारणास्तव पुन:श्च सेवेत दाखल झाला असेल तर त्या कर्मचा-याची अन्य विभागात पद:स्थापना करण्यात यावी.

कृ.मा.प.

Scanned by CamScanner

(३) उपरोक्त अनुक्रमांक १ व २ मध्ये नमूद केल्यानुसार कसुरदार वाहकांची व मार्ग तपासणी पथकाप कर्मचा-यांची बदली अन्य विभागात करण्याबाबतचा बदलीचा प्रस्ताव सदर कर्मचा-याच्या अपराधाच्या सं तपशीलासह व संबंधित कागदपत्रासह विभागीय वाहतूक अधिक्षक यांचे मार्फत पुढील कार्यवाही क रा.प.मध्यवर्ती कार्यालय, कर्मचारीवर्ग खात्याकडे पाठविण्यात यावा.

रा.प.महामंडळातील अपहारप्रवण वृत्तीला आळा बसण्याच्या दृष्टीने उपरोक्त परिपत्रकीय सूचना संपूर्ण स्वतंत्रपणे देण्यात येत आहेत. सदर सूचनांचा अन्य कोणत्याही परिपत्रकीय सूचनांशी संबंध नाही. वरील सुचनां काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी व त्यामध्ये कोणतीही हयगय होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. त परिपत्रकाची पोच द्यावी.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिका (सेवामंडळ) / अध्यक्षांचे स्वीय सहायक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीव अधिकारी (सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ३ /२०१७

क्र. राप/कमवग/आस्था/युआर/ ७८८
म.रा.मा.प. महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई-४०० ००८.
दिनांक : ०६.०२.२०१७

- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण),रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/ धुळे/ अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/ उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

...

विषय : शिकाऊ उमेदवारांच्या नेमणूकीबाबत.

संदर्भ : कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.२९/२०००,
पत्र क्र.राप/कर्मवर्ग/शिकाऊ/४९३१ दि.२१.९.२०००.

****

रा.प.महामंडळात तांत्रिक /आय.टी.आय.व्होकेशनल या ट्रेडमध्ये शिकाऊ उमेदवारांची दरवर्षी भरती करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

संदर्भित परिपत्रकान्वये शिकाऊ उमेदवारांची संख्या निश्चित करण्याबाबतचे अधिकार उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी प्रादेशिक व्यवस्थापक / कार्यशाळा व्यवस्थापक यांनी आपल्या अखत्यारितील विभागात / घटकात शिकाऊ उमेदवार अधिनियम ,१९६१ च्या अंतर्गत करण्यांत येणा-या शिकाऊ उमेदवारांच्या संख्येस मंजूरी देण्याचे अधिकार दिलेले आहेत.त्यानुसार सध्या शिकाऊ उमेदवारांची नेमणूकीबाबतची कार्यवाही करण्यांत येत आहे.

आता प्रादेशिक कार्यालये दि.१.१२.१६. पासून बंद झाली असल्यामुळे विभागांना कार्यशाळेकडील शिकाऊ उमेदवार घेण्यासाठी प्रत्येक वर्षी मंजूरी देण्याबाबतचे अधिकार संबंधित विभाग नियंत्रक यांना देण्याबाबत उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी मान्यता दिलेली आहे.

शिकाऊ उमेदवार अधिनियम ,१९६१ च्या अंतर्गत करण्यात येणा-या शिकाऊ उमेदवारांच्या संख्येस मंजूरी द्यावी. मात्र अशी मंजूरी देताना यंत्र अभियंता (चालन) व संबंधित कर्मचारीवर्ग अधिकारी यांनी सर्वेक्षकाबरोबरच शिकाऊ उमेदवारांच्या प्रशिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या सोयी /सुविधा ,कुशल कामगारांची संख्या यांचा विचार करुन सर्वेक्षण अहवाल तयार केला जाईल अशी दक्षता घ्यावी म्हणजे प्रशिक्षणार्थी उपसल्लागार व व्यवस्थापन यांच्यात शिकाऊ उमेदवारांच्या भरती बाबत मतभेद निर्माण होणार नाहीत अशा संख्येबाबत निशिचत मंजूरी देताना भविष्यात विशेषतः विद्यावेतनाच्या मुद्दयाबाबत लेखा परिक्षणाचे आक्षेप उद्‌भवणार नाही याची दक्षता घ्यावी.

यापुढे प्रत्येक सत्रात शिकाऊ उमेदवारांच्या भरतीबाबत वेळीच कार्यवाही करावी व प्रत्येक सत्रात भरती केलेल्या शिकाऊ उमेदवारांच्या संख्येच्या प्रवर्गनिहाय तपशिल या कार्यालयास पाठविण्यांत यावा.

परिपत्रकाची पोहोच द्यावी व कार्यवाही करावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

प्रत रवाना :

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां.व ख)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (य.अ.) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) / मुख्य विधी अधिकारी/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/ मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / स.क.अ. (मुख्यालय) / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन यांस माहितीसाठी.

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्रमांक. ४/२०१८

क्रमांक : राप/ आस्था/ प्रशा /332-प/ ९३८८
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई 400 008.
दिनांक १० मार्च, २०१८

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/
  कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
  परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

विषयः- घरभाडे भत्ता प्रयोजनार्थ शहरांचे/गावांचे सुधारित वर्गीकरणबाबत.

संदर्भ :- 1) कामगार करार 1996-2000, परिपत्रक क्रमांक 1/1999.
जा.क्र.राप/आस्था/702-जीई/6141 दिनांक 05.10.1999.
2) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक 19/2000
जा.क्र.राप/आस्था/702-जीई/4011 दिनांक.02.08.2000.
3) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक 42/2002
जा.क्र.राप/आस्था/702-जीई/6378 दि.17.12.2002.
4) परिपत्रक क्रमांक राप/आस्था/702-जीई/2330 दि. 16.05.2005.
5) परिपत्रक क्रमांक राप/आस्था/702-जीई/694 दि.13.02.2006.
6) कामगार करार परिपत्रक क्रमांक 1/2013
जा.क्र.राप/आस्था/702-जीई/2978 दि.04.07.2013.

कामगार करारातील तरतुदीनुसार, शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटी, नियम, दर तसेच राज्यातील शहरांच्या व गावांच्या वर्गीकरणानुसार महामंडळातील कर्मचा-यांना,घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता अदा करण्याबाबत संदर्भित परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

घरभाडे भत्ता अनुज्ञेयतेच्या प्रयोजनार्थ शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक घभाभ-1015/प्र.क्र.19/सेवा-5 दिनांक 16 डिसेंबर 2016 सोबतच्या "जोडपत्र-एक" अन्वये विहित करण्यात आलेल्या शहरांचे/गावांचे सुधारित वर्गीकरण अंमलात आणले आहे.(शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.) त्यानुसार रा.प.महामंडळातील अधिकारी/ कर्मचा-यांना घरभाडे भत्ता दिनांक 01.डिसेंबर 2016 पासून अदा करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

कृपया परिपत्रकाची पोच द्यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व.औ.सं)

सोबतः वरीलप्रमाणे

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-**
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (यं. अ)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ उपमहाव्यवस्थापक (बांधकाम)/मुख्य विधि अधिकारी /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/ अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/ (प्रशासन)/ (राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/ (मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/ (घटकसंवर्ग) / (मुख्यालय)

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व.औ.सं)

Scanned by CamScanner

राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना घरभाडे
भत्ता मंजूर करण्यासाठी राज्यातील शहरे /
गावे यांचे पुनर्वर्गीकरण..........

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

**शासन निर्णय क्रमांकः घभाभ-१०१५ / प्र. क्र. १९ /सेवा-५**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२
तारीख: १६ डिसेंबर, २०१६

<u>वाचा -</u>

१) शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेपुर-१२८७/६४३/सेवा-१०, दि.२५ एप्रिल, १९८८
२) शासन निर्णय वित्त विभाग क्र.घभाभ-१०९८/प्र.क्र.८२/९८/सेवा-५, दि. ११ डिसेंबर, १९९८
३) शासन शुद्धीपत्रक, वित्त विभाग क्र. घभाभ-१०९८/प्र.क्र.८२/९८/सेवा-५, दि. ५ जानेवारी, १९९९
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, घभाभ-१००३/प्र.क्र.४५/सेवा-५, दि.१० नोव्हेंबर, २००३
५) शासन निर्णय वित्त विभाग क्र.घभाभ-१००५/प्र.क्र.१३/सेवा-५, दि. १७ जून, २००५
६) शासन निर्णय, वित्त विभाग, संकीर्ण-१००९/प्र.क्र.४०/सेवा-५, दि. १३ मे, २००९
७) शासन निर्णय वित्त विभाग क्र.घभाभ-१००९/प्र.क्र.६७/सेवा-५, दि. २४ ऑगस्ट, २००९
८) केंद्र शासन, वित्त मंत्रालय, व्यय विभाग यांचे कार्यालयीन ज्ञापन क्रमांक २/५/२०१४-ई.II(बी), दिनांक २१ जुलै, २०१५ चे ज्ञापन

## शासन निर्णय

केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांना घरभाडेभत्ता मंजूर करण्याच्या प्रयोजनार्थ शहर व गावे यांच्या वर्गीकरणात तसेच घरभाडेभत्त्याच्या दरात केंद्र शासनाच्या दिनांक २९.०८.२००८ च्या ज्ञापनान्वये केलेली सुधारणा विचारात घेवून राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना घरभाडे भत्ता मंजुर करण्यासाठी वरील -वाचा-(७)° येथे नमूद केलेल्या दिनांक २४ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयासोबतच्या "जोडपत्र-१" अन्वये राज्यातील शहरांचे / गावांचे वर्गीकरण दर्शविणारी यादी जोडपत्र-१ नुसार सहपत्र स्वरुपात विहित केली आहे. आता, केंद्र शासनाने सन २०११ च्या जनगणनेच्या आधारे केंद्रीय कर्मचा-यांना घरभाडे भत्ता मंजूरीच्या प्रयोजनासाठी केंद्र शासनाने देशातील विविध शहरांचे / गावांचे वरील -वाचा-(८)° येथील दिनांक २१.०७.२०१५ च्या कार्यालयीन ज्ञापनासमवेतच्या जोडपत्रानुसार (Annexure) पुनवर्गीकरण केले आहे. त्या धर्तीवर राज्य शासनाने या अगोदर अनुक्रमांक ७ येथील शासन निर्णयान्वये घरभाडेभत्त्याच्या प्रयोजनार्थ केलेल्या शहरे व गावे यांच्या वर्गीकरणामध्ये सुधारणा करुन या नवीन वर्गीकरणानुसार संबंधित शहरे व गावे यांना सुधारीत दराने घरभाडेभत्ता अनुज्ञेय करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या काही काळ विचाराधीन होता.

Scanned by CamScanner

२. वरील पार्श्वभुमीवर उपरोक्त अनुक्रमांक ७ येथे नमूद केलेल्या दि. २४ ऑगस्ट, २००९ च्या शा निर्णयासमवेतचे "जोडपत्र-१", नुसार घरभाडे भत्ता मंजूरीच्या प्रयोजनासाठी करण्यात आलेले राज्या शहरांचे/गावांचे सुधारीत वर्गीकरण या शासन निर्णयासमवेतच्या "जोडपत्र-एक" नुसार करण्यात येत आहे.

३. या आदेशासमवेतच्या "जोडपत्र-एक" अन्वये केलेल्या सुधारित वर्गीकरणानुसार, संबंधित शहरां गावांना पुढील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या दरानुसार घरभाडेभत्ता मंजूर करण्यात यावा.

| अ.क्र. | शहरांचे / गावांचे वर्गीकरण | घरभाडे भत्त्याचे दर (मूळ वेतनाची टक्केवारी) |
|---|---|---|
| १ | एक्स | ३० टक्के |
| २ | वाय | २० टक्के |
| ३ | झेड | १० टक्के |

४. घरभाडे भत्त्याच्या अनुज्ञेयतेसंबंधीच्या विद्यमान आदेशातील इतर सर्व तरतूदी व अटी जशाच्या त लागू राहतील.

५. शहरांच्या/गावांच्या पुनर्वर्गीकरणामुळे घरभाडे भत्त्यावरील खर्चात वाढ होत असल्यास असा वाढीव ख मंजुर अनुदानातून भागवावा.

६. हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या महिन्यापासून अंमलात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपल करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१२१६१७३७२८०८०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षर साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,.

Bhalchandra Jagannath Gadekar

Digitally signed by Bhalchandra Jagannath Gadekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=...
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=...
Date: 2016.12.16 17:43:32 +05'30'

(भा. ज. गाडेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
२) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
३) महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
४) महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
७) सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नार्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
८) राज्यपालांचे सचिव,
९) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
१०) सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
११) मंत्रालयीन सर्व विभाग,
१२) सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय,



Scanned by CamScanner

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :-घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/सेवा-५,
दिनांक १६.१२.२०१६ चे सहपत्र
जोडपत्र - एक
घरभाडे भत्ता मंजूरीसाठी राज्यातील शहरांचे / गावांचे सुधारीत वर्गीकरण

| शहरांचे / गावांचे वर्गीकरण | शहरांची / नागरी समहांची नावे | | नागरी समूह घटक व त्यात येणारे क्षेत्र |
|---|---|---|---|
| (१) | (२) | | (३) |
| एक्स वर्ग शहरे | मुंबई (नागरी समूह) | (१) | बृहन्मुंबई (महानगरपालिका) |
| | | (२) | मीरा-भाईंदर (महानगरपालिका) |
| | | (३) | ठाणे (महानगरपालिका) |
| | | (४) | नवी मुंबई (महानगरपालिका) |
| | | (५) | कल्याण-डोंबिवली (महानगरपालिका) |
| | | (६) | उल्हासनगर (महानगरपालिका) |
| | | (७) | अंबरनाथ (नगरपरिषद) |
| | | (८) | कुळगांव-बदलापूर (नगरपरिषद) |
| | पुणे (नागरी समूह) | (१) | पुणे (महानगरपालिका) |
| | | (२) | पुणे (छावणी) |
| | | (३) | खडकी (छावणी) |
| | | (४) | पिंपरी-चिंचवड (महानगरपालिका) |
| | | (५) | देहू रोड (छावणी) |
| | | (६) | देहू (सी.टी.) |
| वाय वर्ग शहरे | नागपूर (नागरी समूह) | (१) | नागपूर (महानगरपालिका) |
| | | (२) | डिगडोह (सी.टी.) |
| | | (३) | वाडी (सी.टी.) |
| | नाशिक (नागरी समूह) | (१) | नाशिक (महानगरपालिका) |
| | | (२) | एकलहरे (सी.टी.) |
| | | (३) | देवळाली (छावणी) |
| | | (४) | भगूर (नगर परिषद) |
| | अमरावती महानगर पालिका | | |
| | औरंगाबाद (नागरी समूह) | (१) | औरंगाबाद (महानगरपालिका) |
| | | (२) | औरंगाबाद (छावणी) |
| | भिवंडी (नागरी समूह) | (१) | भिवंडी-निजामपूर (महानगरपालिका) |
| | | (२) | खोनी (सी. टी.) |
| | सोलापूर महानगर पालिका | | |
| | कोल्हापूर (नागरी समूह) | (१) | कोल्हापूर (महानगरपालिका) |
| | | (२) | गांधीनगर (सी.टी.) |
| | वसई-विरार शहर महानगर पालिका | | |
| | मालेगांव (नागरी समूह) | (१) | मालेगांव (महानगरपालिका) |
| | | (२) | भायगांव (ओ. जी.) |
| | | (३) | दरेगांव (ओ. जी.) |
| | | (४) | सोयगांव (सी.टी.) |
| | | (५) | द्याने (सी.टी.) |
| | | (६) | माळदे (सी.टी.) |
| | नांदेड-वाघाळा महानगर पालिका | | |
| | सांगली (नागरी समूह) | (१) | सांगली मिरज कुपवाड (महानगरपालिका) |
| | | (२) | माधवनगर (सी.टी.) |

सी.टी. - सेन्सस टाऊन

ओ.जी.- आऊट ग्रोथ

टीप:- राज्यातील जी अन्य शहरे / गावे एक्स किंवा वाय वर्गात समाविष्ट नाहीत, त्यांचा समावेश झेड वर्गात होतो.



Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ५/२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/ ९८०२
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आ.ना.मार्ग,
मुंबई-४००००८.
दिनांक: ९८ मार्च, २०१७.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /
नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

विषय: रा.प.कर्मचा-यांना परिपत्रक ९/८७ भाग २ अंतर्गत रुग्णालयीन खर्चाची प्रतिपूर्ती रा.प.महामंडळाच्या पॅनलवर असलेल्या नजिकच्या रुग्णालयात उपचार करणेबाबत.

संदर्भ: परिपत्रक क्र.२६/२०१६ क्र.राप/कर्मवर्ग/६०१वै/४९००,
दि.३१.१०.२००६

*****

संदर्भित परिपत्रकान्वये ह्दय उपमार्ग शस्त्रक्रिया, ह्दयावरील इतर शस्त्रक्रिया, ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया, मूत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया व कर्करोग या ५ गंभीर आजारासाठी परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या मान्यताप्राप्त रुग्णालयात उपचार घेतल्यास तेथील आंतररुग्ण कालावधीतील औषधोपचारावरील खर्चाची १००% प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील अशा सूचना प्रसारीत करण्यात आल्या आहेत.

२. तथापि, या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या काही प्रकरणांमध्ये कर्मचा-याने हदयविकारासारख्या गंभीर आजारासाठी सदर कर्मचा-याच्या घराजवळील किंवा कार्यालयाजवळील महामंडळाच्या पॅनेलवर असलेल्या रुग्णालयात उपचार न घेता महामंडळाच्या पॅनेलवर असलेल्या दूर अंतरावरील रुग्णालयामध्ये उपचार घेतल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु अशा दूरवरच्या रुग्णालयात उपचार घेण्याच्या आवश्यकतेबाबत कोणताही समर्पक खुलासा देयकाचा प्रस्ताव पाठविताना केल्याचे दिसून येत नाही.

३. या संदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

- परिपत्रक ९/८७ भाग-२ अंतर्गत कर्मचा-याने घराजवळील अथवा कार्यालयापासून जवळ असलेल्या रा.प.महामंडळाच्या पॅनेलवरील रुग्णालयात उपचार न घेता, महामंडळाच्या पॅनेलवरील दूरवरच्या अन्य रुग्णालयात उपचार घेतला असल्यास त्याबाबतच्या समर्थनीय कारणासह कर्मचा-याचा/ अधिका-याचा समर्पक खुलासा, त्यास संबंधित विभागातील मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांची सदर खुलासा मान्य/ अमान्य केल्याबाबतची सुस्पष्ट शिफारस प्रस्तावासोबत पाठविणे आवश्यक आहे.

कृ.मा.प.

Scanned by CamScanner

- सदर आजारावरील उपचारांसाठी कर्मचा-यास अग्रीम अदा केला गेला असल्यास सदर अग्रिमाचा निपटारा विहित कालावधीत होण्याच्या दृष्टीने कर्मचा-यामार्फत वैदयकीय देयक प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत नियमानुसार लेखा परीक्षण करुन रु.१,००,०००/- पेक्षा अधिक रकमेचे देयक या कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावे.
- सदर ५ गंभीर आजारावरील शस्त्रक्रियेनंतर कर्मचारी/ अधिकारी संबंधित रुग्णालयाच्या सल्ल्यानुसार पुढील उपचार/औषधोपचार चालू असल्याबाबत किंवा पूर्ण झाले असल्याबाबत कर्मचा-याकडून लेखी स्वरुपात घेणे आवश्यक आहे.
- वैद्यकिय प्रतिपूर्तीचा प्रस्ताव पाठविताना सोबत सादर करण्यात आलेली देयके व्यवस्थित नस्ती तयार करुन, पृष्ठांकन करुन पाठविणे आवश्यक आहे.
- आवश्यक ठिकाणी मानसेवी वैद्यकिय अधिकारी, विभागीय कामगार अधिकारी, विभागीय लेखा अधिकारी यांचे नाव,स्वाक्षरी,पद्नाम व दिनांक काटेकोरपणे नमूद करणे आवश्यक आहे. वैद्यकिय देयकाचे लेखा परिक्षण केल्यानंतर लेखा परिक्षणाचा शिक्का योग्य त्या ठिकाणी असणे जरुरीचे आहे.

४. वैद्यकिय प्रतिपूर्तीचा प्रस्ताव पाठविताना उपरोक्त बाबींचे काटेकोरपणे पालन केले जावे अन्यथा सदर प्रस्ताव विचारात घेतला जाणार नाही. तसेच त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विभाग प्रमुख/घटक प्रमुखाची राहील याची नोंद घेण्यात यावी.

५. सदर परिपत्रक सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून स्वाक्षरी घेण्यात यावी. परिपत्रकाची पोच देण्यात यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना-

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी /विधि सल्लागार / सचिव,म.रा.मा.प. महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी /जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग)/(मुख्यालय)/(मनुष्यबळ) /(घटकसंवर्ग)/(प्रशासन)/(सामान्य प्रशासन)/(मावक)

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

F:\Medical-१\Circulars_Dabke.docx

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. ०६ /२०१७
महत्त्वाचे / तातडीचे :

क्र.राप/ कर्मवर्ग/आस्था/युआर/ ९४९५
म.रा.मा.प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक : १५.०३.२०१७.

- महाव्यवस्थापक (आ[illegible]), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/ धुळे/ अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/ उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

...

विषय : शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत.

संदर्भ : कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. २८/२०१६,
संदर्भ क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/ ३९५३ दिनांक ११.०८.२०१६

***

शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ नुसार दरवर्षी फेब्रुवारी व ऑगस्ट सत्रामध्ये तांत्रिक व्यवसायिक व आय.टी.आय.उत्तीर्ण, कार्यशाळा शिकाऊ उमेदवारांची नेमणूक केली जाते व त्यांना शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार विद्यावेतन अदा करण्यात येते.

विद्यावेतनवाढ ही संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाद्वारा अधिसूचित अर्धकुशल कर्मचा-यांसाठी निश्चित केलेल्या किमान वेतनावर आधारित आहे. कामगार आयुक्त यांनी त्यांचे दि.२८.०१.२०१५ रोजीच्या कळविलेल्या पत्रानुसार किमान वेतन हे मुळ वेतन अधिक विशेष भत्ता एकत्रित करुन परिगणित करण्यात येते. मूळ वेतनावर दिला जाणारा विशेष भत्ता प्रत्येक सहा महिन्यानंतर बदलत असतो.

सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षणार्थी संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांचे पत्र क्र.२१/एटीएस/२०१५/प्र.क्र.१४/१७५ दिनांक १०.०९.२०१५ अन्वये किमान वेतनाच्या (Minimum Wages) दरामध्ये वेळोवेळी होणारे बदल सुधारण्यासाठी www.paycheck.in/India या संकेतस्थळावरुन अधिक माहिती उपलब्ध करुन घेण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

सदर संकेतस्थळावरुन माहिती घेतली असता दि.०१.०१.२०१६ ते ३०.०६.२०१६ या कालावधीकरिता खालीलप्रमाणे किमान वेतनाचे (Minimum Wages) दर दर्शविण्यात आले आहेत.

| अनु.क्र. | तपशिल | किमान वेतनाचे दर | |
|---|---|---|---|
| | | परिमंडळ - १ | परिमंडळ - २ |
| १. | मुळवेतन | ४६००.०० | ४४००.०० |
| २. | विशेष भत्ता | ३६३३.०० | ३६३३.०० |
| ३. | एकुण | ८२३३.०० | ८०३३.०० |

..२..

SH\F:\2017- UR\UR-Circular - 2017.docx

Scanned by CamScanner

उपरोक्त दर्शविलेल्या किमान वेतनाच्या दरानुसार रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय, श्रम रोजगार मंत्रालय अधिसूचना भाग - II, खंड - ३, उपखंड (i) दि.२२.०९.२०१४ नुसार सुधारित खालीलप्रमाणे दर्शविण्यात येत आहेत.

| क्र. | वर्ष | **पूर्वीचा दर** (परिपत्रक क्र.२८/२०१६ संदर्भ क्र. राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/३९५३ दि.११.०८.२०१६) (www.paycheck.in/India येथे दर्शविल्यानुसार) किमान वेतन = मुळ वेतन + विशेष भत्ता **परिमंडळ-१ =** मुळ वेतन रु. ४६०० + विशेष भत्ता रु.३३३२.८५ = रु.७९३२.८५ व **परिमंडळ-२ =** मुळ वेतन रु. ४४०० + विशेष भत्ता रु.३३३२.८५ = रु. ७७३२.८५ (विशेष भत्ता दि.०१.०७.२०१५ ते ३१.१२.२०१५ कालावधीकरीता www.paycheck.in/India येथे दर्शविल्यानुसार) याप्रमाणे निश्चित केलेल्या किमान वेतनाच्या दरानुसार **सुधारित दर (रुपयामध्ये)** | | **सुधारित दर** (www.paycheck.in/India येथे दर्शविल्यानुसार) किमान वेतन [illegible] वेतन + विशेष भत्ता **परिमंडळ-१ =** मुळ वेतन रु. ४६०० + विशेष भत्ता रु.३६३३ = रु.८२३३ व **परिमंडळ-२ =** मुळ वेतन रु. ४४०० + विशेष भत्ता रु.३६३३ =रु. ८०३३ (विशेष भत्ता दि.०१.०१.२०१६ ते ३०.०६.२०१६ कालावधीकरीता www.paycheck.in/India येथे दर्शविल्यानुसार) याप्रमाणे निश्चित केलेल्या किमान वेतनाच्या दरानुसार **सुधारित दर (रुपयामध्ये)** | |
|---|---|---|---|---|---|
| | | **परिमंडळ - १** | **परिमंडळ - २** | **परिमंडळ - १** | **परिमंडळ - २** |
| १ | **पहिले वर्ष** | किमानवेतन रु. ७९३२.८५ च्या ७०% = रु.५५५३.०० | किमानवेतन रु. ७७३२.८५ च्या ७०% = रु.५४१३.०० | किमानवेतन रु. ८२३३ च्या ७०% = रु.५७६३.१० | किमानवेतन रु. ८०३३ च्या ७०% = रु.५६२३.१० |
| २ | **दुसरे वर्ष** | किमानवेतन रु. ७९३२.८५ च्या ८०% = रु.६३४६.२८ | किमानवेतन रु. ७७३२.८५ च्या ८०% = रु.६१८६.२८ | किमानवेतन रु. ८२३३ च्या ८०% = रु.६५८६.४० | किमानवेतन रु. ८०३३ च्या ८०% = रु.६४२६.४० |
| ३ | **तिसरे वर्ष** | किमानवेतन रु. ७९३२.८५ च्या ९०% = रु.७१३९.५७ | किमानवेतन रु. ७७३२.८५ च्या ९०% = रु.६९५९.५७ | किमानवेतन रु. ८२३३ च्या ९०% = रु.७४०९.७० | किमानवेतन रु. ८०३३ च्या ९०% = रु.७२२९.७० |
| ४ | **चौथे वर्ष** | | | | |

** परिमंडळ १ - महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगर पालिका व 'अ' वर्ग नगरपालिका क्षेत्रांचे मिळून होईल.

** परिमंडळ २ - परिमंडळ एक वगळून राज्याच्या उर्वरित क्षेत्राचे मिळून होईल.

SH\F\2017- UR\UR-Circular - 2017.docx

Scanned by CamScanner

सदर अधिसुचनेमध्ये असे नमुद केले आहे की, जर एखाद्या संबंधीत राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाद्वारा एखाद्या व्यवसायासाठी किमान वेतनाचा दर ठरवून दिला नसेल तर अशावेळी या व्यवसायातील विद्यावेतन अदा करताना त्या संबंधीत राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाद्वारा अर्धकुशल कर्मचा-यांसाठी अधिसूचीत केलेल्या अनुसूचीत रोजगारातील जास्तीत जास्त किमान वेतन विचारात घेण्यात यावे. तसेच, सदर अधिसुचनेमध्ये अधिनियम धारा -६ मधील खंड -क मध्ये नमुद केलेल्या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारांनी जर राष्ट्रीय परिषदेने मान्य केलेल्या कोणत्याही विद्यालय किंवा अन्य संस्थामध्ये घेतलेला प्रशिक्षणार्थीचा कालावधी विद्यावेतन अदा करताना विचारात घेण्यात यावा असे नमुद केले आहे.

वर नमुद केल्याप्रमाणे, सुधारित दराने विद्यावेतन अदा करताना संबंधित खात्याशी संपर्क साधून महामंडळामधील शिकाऊ उमेदवारांना कोणत्या दराने विद्यावेतन द्यावे लागणार आहे, याची पुर्णपणे पडताळणी करुन व लेखा परिक्षण करुनच शिकाऊ उमेदवारांना विद्यावेतन अदा करावे. अतिरिक्त विद्यावेतन अदा केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी संबंधित विभाग/घटकाची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

तरी, वर दर्शविलेल्या तारखेपासून सुधारीत दराने विद्यावेतन अदा करण्यात यावे.

सदर परिपत्रक वित्त व लेखा खात्याच्या सहमतीने प्रसृत करण्यात येत आहे.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क. व औ. सं.)

प्रत रवाना : मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां. व ख)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) महाव्यवस्थापक (यं.अ.) / मुख्य विधी अधिकारी/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्र.१ - मुंबई-पुणे, नियंत्रण समिती क्र.२ - नाशिक - औरंगाबाद, नियंत्रण समिती क्र.३ - अमरावती - नागपूर / मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/ मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / स.क.अ. (मुख्यालय) / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन यांस माहितीसाठी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क. व औ. सं.)

SH\F:\2017- UR\UR-Circular - 2017.docx

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. ८ /२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/४८६-ई/ १४२२
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक : १५ .०३.२०१७.

- महाव्यवस्थापक (आवेदन),रा.प.प्रादेशिक कार्यालय, मुंबई.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१ - मुंबई व पुणे) / (समिती क्र.२ - औरंगाबाद - नाशिक) / (समिती क्र.३ - नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे / औरंगाबाद / नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/ पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदूर्ग/ ठाणे/ नाशिक/ जळगांव/ धुळे/ अहमदनगर/ पुणे/ कोल्हापूर/ सांगली/ सातारा/ सोलापूर/ औरंगाबाद/ बीड/ जालना/ लातूर/ नांदेड/ उस्मानाबाद/ परभणी/ नागपूर/ भंडारा/ चंद्रपूर/ गडचिरोली/ वर्धा/ अमरावती/ अकोला/ बुलढाणा/ यवतमाळ.

....

विषय : महाराष्ट्र सफाई कर्मचारी आयोग सन १९९८-९९ च्या अहवालातील शिफारसीच्या अनुषंगाने लाड पागे समितीच्या शिफारसीनुसार शैक्षणिक पात्रतेनुसार "वारसा" हक्काने महामंडळात नेमणूक करणेबाबत.

संदर्भ : १) क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/१८५७ दिनांक २५.०५.२००७.
२) क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/५१२२ दिनांक १८.११.२००८.
३) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१६/२०१५
क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/४८६-ई/२४१९ दिनांक ०७.०५.२०१५

*****

रा.प.महामंडळामध्ये लाड-पागे समितीच्या शिफारसीच्या अनुषंगाने "वारसा" हक्काने नेमणूक देण्यासंदर्भात उपरोक्त संदर्भित परिपत्रकाद्वारे यापूर्वी सुचना देण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत रा.प.महामंडळामध्ये वारसा हक्काने नियुक्ती देण्यासंदर्भात नव्याने विचार करुन महामंडळ ठराव क्र.२०१६:१२:०५ दिनांक ३०.१२.२०१६ नुसार ठराव पारित केला आहे. त्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

"१) वाल्मिकी, मेहतर समाजाला सामाजिक, आर्थिक संरक्षण देण्यासाठी, सफाई कर्मचारी म्हणून सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणा-या अथवा स्वेच्छानिवृत्ती घेणा-या किंवा सेवेत असताना निधन पावलेल्या मेहतर, वाल्मिकी व भंगी या पोट जातींसह अनुसूचित जातीमधील इतर सफाई कर्मचा-यांच्या वारसांस किंवा नातेवाईकास सदर योजनेनुसार "वारसा" हक्काने नेमणूक द्यावयाची आहे.

२) "वारसा" हक्काने नेमणूक देताना, वारसदारांची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन अन्य पदावर वर्ग-३ घटकसंवर्ग व वर्ग - ४ पदांमधील चालक (कनिष्ठ), वाहक (कनिष्ठ), वाहतूक नियंत्रक (कनिष्ठ), सहाय्यक (कनिष्ठ), शिपाई (कनिष्ठ), सफाईगार (कनिष्ठ), सहाय्यक कारागिर (कनिष्ठ) (टायर फिटर / रबरसंयोजक), स्वच्छक (कनिष्ठ), लिपीक-टंकलेखक (कनिष्ठ), तसेच राज्यसंवर्ग पदातील वाहतूक निरिक्षक (कनिष्ठ), सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक (कनिष्ठ), लेखाकार (कनिष्ठ), भांडारपाल (कनिष्ठ), कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (कनिष्ठ) या अनुकंपा तत्वावरील नेमणूकीकरिता निश्चित करण्यात आलेल्या पदांमध्ये सदर पदांची सामान्य स्थायी आदेश ५०३ नुसार विहीत केलेली शैक्षणिक अर्हता, शारिरीक पात्रता, इतर अटी व शर्ती पुर्ण करीत असल्यास अशा उमेदवारांना वरील पदांमध्ये नियमाधीन नियुक्ती देण्यात यावी.

..२..

SH\F:\2017 - Anukampa\A-Circulars.doc

Scanned by CamScanner

३) उपरोक्त महामंडळ ठरावाच्या तारखेपासून म्हणजेच दिनांक ३०.१२.२०१६ पासून पुढील प्रकरणांना "वारसा" हक्काच्या नियुक्तीकरिता अर्ज करण्याची मुदत सफाई कर्मचारी दिवंगत किंवा सेवानिवृत्त किंवा विकलांग झाल्याच्या दिनांकापासून १ वर्षाची राहील. याबाबत नमुद करण्यात येते की, वारसा हक्काबाबत त्या कामगारास व त्याच्या कुटूंबास सविस्तर माहिती देण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखाची राहील तसेच नियत वयोमनानुसार निवृत्त / स्वेच्छानिवृत्त, मयत, वैद्यकियदृष्टया अपात्र ठरलेल्या सफाई कामगारांच्या विभागीय कार्यालयीन आदेशात "वारसा" हक्काबाबतच्या तरतूदी स्पष्टपणे नमुद करावयाच्या आहेत.

४) रा.प.महामंडळात अशी प्रकरणे विभागा अंतर्गत प्रलंबित असतील तर सदर प्रकरणी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

५) सफाई कर्मचारी सोडून दुस-या इतर एखाद्या पदावर नियुक्ती दिलेल्या कर्मचा-याच्या वारसास पुनःश्च "वारसा" पध्दतीचा लाभ देय राहणार नाही.

६) "वारसा" हक्काने नेमणूक देण्यासंदर्भात झालेले महामंडळ ठराव क्र.२००७:०४:११ दिनांक २१.०४.२००७, महामंडळ ठराव क्र.२००८:१०:०६ दिनांक १३.१०.२००८, व महामंडळ ठराव क्र.२०१५:०३:०८ दिनांक ०५.०३.२०१५ व त्या अनुषंगाने प्रसारित केलेली संदर्भित परिपत्रके रद्द करण्यात येत आहेत.

७) "वारसा" हक्काने नेमणूका देण्याबाबतच्या प्रकरणाची ज्येष्ठता ही माजी कर्मचा-याच्या मृत्युची सेवानिवृत्तीची किंवा वैद्यकियदृष्टया अपात्रतेची तारीख हा आधारभूत पाया धरुन पदाच्या प्रतिक्षा यादीवरील अनुकंपा प्रकरणांच्या आपापसातील ज्येष्ठतेनुसार निश्चित करावी व त्यानुसारच अवलंबितांना "वारसा" हक्काने नेमणूका द्याव्यात.

उपरोक्त सुचनांचे विभागीय स्तरावर काटेकोरपणे पालन करावे.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क. व औ.सं.)

प्रत रवाना :

- मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां.व ख)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) महाव्यवस्थापक (यं.अ.) / मुख्य विधी अधिकारी/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / प्रादेशिक व्यवस्थापक उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१, २ व ३) मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/ मा.अध्यक्ष म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / स.क.अ. (मुख्यालय) / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन यांस माहितीसाठी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क. व औ.सं.)

Scanned by CamScanner

**कर्मचारीवर्ग खाते**
**परिपत्रक क्र.** ०८/२०१७

क्र.राप/ कर्मवर्ग/ राज्यसंवर्ग/यांत्रिकी/ १४६४
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई-४००००८.
दिनांक १६ मार्च,२०१७.

कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद/ नागपूर.

उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण),रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.

विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, मुंबई /ठाणे/रत्नागिरी/रायगड /सिंधुदुर्ग /पालघर/जळगांव /धुळे/ अहमदनगर/ नाशिक/ पुणे/ सातारा/ सोलापूर/ कोल्हापूर / सांगली/ औरंगाबाद /बीड /लातूर /नांदेड/ उस्मानाबाद / परभणी/ जालना/ भंडारा / चंद्रपूर/ वर्धा/ नागपूर/ अमरावती / अकोला/ बुलढाणा/ यवतमाळ/ गडचिरोली.

**विषय** : यांत्रिकी पर्यवेक्षकीय पदांचे विविध व्यवसाय रद्द करणे आणि वरिष्ठ कार्यदेशक व कनिष्ठ कार्यदेशक हे प्रवर्ग सहा.कार्यशाळा अधिक्षक या प्रवर्गात विलिन करणे.

----

रा.प.महामंडळाची आर्थिक स्थिती विचारात घेऊन उपलब्ध मनुष्यबळाचा गरजेनुसार पूर्ण क्षमतेने वापर करणे. तसेच कामाच्या निकडीनुसार मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे. त्याचप्रमाणे यांत्रिकी पर्यवेक्षकीय प्रवर्गाची विभाग / घटकनिहाय व्यवसायानुसार असलेल्या मंजूरीनुसार उपलब्ध होऊ न शकणारी रिक्त पदे यामुळे संबंधितांची बदली करताना येणा-या अडचणी, काही व्यवसायासाठी कर्मचारी उपलब्ध न झाल्यामुळे राहणा-या रिक्त जागा तसेच काही व्यवसायामध्ये रिक्त जागा नसल्याने दिर्घकाळ बढतीच्या प्रतिक्षेवर राहणारे कर्मचारी इत्यादी बाबी विचारात घेऊन यांत्रिकी पर्यवेक्षकीय प्रवर्गाचे सद्याचे विविध व्यवसाय रद्द करणे. तसेच काळाच्या गरजेनुसार यांत्रिकी पर्यवेक्षकीय प्रवर्गातील समकक्ष कामे असलेली वरिष्ठ कार्यदेशक, कनिष्ठ कार्यदेशक हे प्रवर्ग सहा.कार्यशाळा अधिक्षक या प्रवर्गात विलिन करुन यापुढे केवळ सहा.कार्यशाळा अधिक्षक हा एकच प्रवर्ग वापरणे बाबतचा प्रस्ताव मा.संचालक मंडळास सादर करण्यात आला होता. मा.संचालक मंडळाने महामंडळ ठराव क्र.२०१६:१२:१५, दिनांक ३०.१२.२०१६ अन्वये वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजूरी दिलेली आहे.

महामंडळ ठराव क्र.२०१६:१२:१५, दिनांक ३०.१२.२०१६ अन्वये देण्यात आलेल्या मंजूरीनुसार महामंडळातील यांत्रिकी पर्यवेक्षकीय प्रवर्गाचे विविध व्यवसाय रद्द करणे आणि वरिष्ठ कार्यदेशक, कनिष्ठ कार्यदेशक प्रवर्गाची मंजूरी सहा.कार्यशाळा अधिक्षक या प्रवर्गात टप्प्या-टप्प्याने विलिन करणेबाबत खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) सहा.कार्यशाळा अधिक्षक व प्रभारक या यांत्रिकी पर्यवेक्षकीय पदात बढती देण्यांत येणारे कर्मचारी हे मुळ प्रमुख कारागिर या यांत्रिकी प्रवर्गातील असल्याने तसेच नव्याने सेवाप्रविष्ट होणा-या कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकी मधील पदविका / पदवी असल्याने यांत्रिकी पर्यवेक्षकीय प्रवर्गात यापुढे भरती करताना अथवा बढती देताना व्यवसाय चाचणी घेण्यात येणार नाही. म्हणजेच संबंधित पदासाठी केवळ लेखी परीक्षा घेण्यात येईल व लेखी परीक्षेत पात्र ठरणा-या कर्मचा-यांना संबंधित प्रवर्गात नियमानुसार बढती देण्यात येईल, मात्र बढती देण्यांत आलेल्या कर्मचा-यांना संबंधित पदासाठी विहीत केलेले कोणत्याही व्यवसायाशी निगडित काम करणे बंधनकारक राहील.

--२--

Scanned by CamScanner

२) वरिष्ठ कार्यदेशक, कनिष्ठ कार्यदेशक व प्रभारक या प्रवर्गात परिपत्रक प्रसारीत करण्यात आल्याच्या तारखेस जे कर्मचारी कार्यरत आहेत, ते कर्मचारी संबंधित पदावर त्याच्या व्यवसायानुसार कार्यरत राहतील. तसेच संबंधित विभाग / घटकाची कार्यरत कर्मचा-यांची या पदातील व्यवसायानुसार असणारी सद्यस्थितीतील मंजुरी यामध्ये आज रोजी कोणताही बदल होणार नाही.

३) वरिष्ठ कार्यदेशक व कनिष्ठ कार्यदेशक या प्रवर्गातील रिक्त पदे यापुढे भरती अथवा बढतीने भरण्यात येणार नाहीत. सदर प्रवर्गातील आज रिक्त असणारी व यापुढे जस-जशी पदे रिक्त होतील, तस-तशी ही पदे सहा.कार्यशाळा अधिक्षक या प्रवर्गात वर्ग होतील, म्हणजेच संबंधित प्रवर्गातील विभाग / घटकातील सद्यस्थितीत रिक्त व यापुढे जस-जशी पदे रिक्त होतील, तस-तशी सहा.कार्यशाळा अधिक्षक या प्रवर्गात संबंधित विभाग / घटकातच वर्ग होतील, अशी मंजूरी वर्ग झाल्यामुळे होणा-या बदलाबाबतची माहिती संबंधित विभाग / घटकाने होणा-या सुधारणेनुसार नंतरच्या पदनिहाय मंजूरीसह मध्यवर्ती कार्यालयास कळवावयाची आहे. मध्यवर्ती कार्यालयाकडुन पुढील कर्मचारी नेमणुकीच्या वेळी सुधारित मंजूरीनुसार नेमणूका देण्यात येतील.

४) कनिष्ठ कायदेशक हा प्रवर्ग सहा.कार्यशाळा अधिक्षक या प्रवर्गाशी समकक्ष असल्याने व कनिष्ठ कार्यदेशक हा प्रवर्ग टप्याटप्याने सहा.कार्यशाळा अधिक्षक प्रवर्गात विलिन करणेबाबत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कनिष्ठ कार्यदेशक या पदात आज कार्यरत असलेल्या कर्मचा-यांपैकी जे कर्मचारी सहा.कार्यशाळा अधिक्षक पदात काम करण्यास इच्छूक असतील त्यांनी दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत लिखित स्वरुपात मध्यवर्ती कार्यालयास कळविल्यास या कर्मचा-यांचे सहा.कार्यशाळा अधिक्षक पदात प्रशासकीय कारणासाठी पून:प्रवर्गीकरण करण्यात येईल. पुन:प्रवर्गीकरण हे प्रशासकीय कारणास्तव करण्यात येणार असल्याने या कर्मचा-यांना त्यांच्या कनिष्ठ कार्यदेशक पदातील नेमणूकीच्या तारखेनुसार सहा.कार्यशाळा अधिक्षक या पदात सेवा ज्येष्ठता यादीत त्यांचे नाव समाविष्ट करण्यात येईल.

५) प्रभारक या प्रवर्गातील आज रिक्त असणारी व यापुढे जस-जशी पदे रिक्त होतील, तस-तसे या पदांचे असलेले विविध व्यवसाय रद्द होतील, म्हणजेच यापुढे नेमणूक / बढती देण्यात येणा-या कर्मचा-यांना व्यवसायानिहाय दर्शविण्यांत येणार नाही. मात्र, अशा कर्मचा-यांना प्रभारक पदासाठी नेमुन देण्यांत आलेले कोणत्याही व्यवसायाचे काम करणे बंधनकारक राहील.

६) प्रभारक या यांत्रिकी प्रवर्गात सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या कर्मचा-यांपैकी जे कर्मचारी प्रभारक पदात कोणत्याही व्यवसायाचे काम करण्यास इच्छूक आहेत, अशा कर्मचा-यांनी लेखी स्वरुपात दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत अर्जाद्वारे विनंती केल्यास त्यांची बदली करताना रिक्त जागांचे व्यवसाय विचारात घेण्यांत येणार नाहीत. मात्र, अशा कर्मचा-यांना प्रभारक पदातील कोणत्याही व्यवसायाचे नेमुन दिलेले काम करणे बंधनकारक राहील. दिनांक ३१.०३.२०१७ नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

७) तसेच दिनांक २२ / २३ ऑगस्ट, २०१५ रोजी घेण्यात आलेल्या प्रभारक या प्रवर्गाच्या बढती परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या कर्मचा-यांपैकी ज्या कर्मचा-यांनी प्रत्यक्ष बढती स्विकारलेली नाही अथवा जे कर्मचारी बढतीच्या व्यवसायनिहाय रिक्त जागा उपलब्ध नसल्याने बढतीच्या प्रतिक्षा यादीवर आहेत अशा कर्मचा-यांनी प्रभारक पदावर कोणत्याही व्यवसायाचे काम करण्यास इच्छूक असल्याचे लेखी स्वरुपात मध्यवर्ती कार्यालयास दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत कळविल्यास अशा कर्मचा-यांना प्रभारक पदाच्या रिक्त जागांच्या उपलब्धतेनुसार बढती देण्यांत येईल. मात्र, अशा कर्मचा-यांना प्रभारक पदातील कोणत्याही व्यवसायाचे नेमुन देण्यांत आलेले काम करणे बंधनकारक राहील. दिनांक ३१.०३.२०१७ नंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

Scanned by CamScanner

तरी वरील सूचनांनुसार सर्व विभाग / घटकांनी कार्यवाही करावयाची आहे. परिपत्रक प्रस्तृत झाल्याच्या तारखेपासुन परिपत्रकाची अंमलबजावणी करण्यांत यावी.

कृपया, परिपत्रकाची पोच देण्यांत यावी.

**उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

**<u>प्रत अग्रेषित</u> :-**

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (भां.व ख)/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (यं.अ.)/ महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ उप महाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / मुख्य कामगार अधिकारी/ विधी सल्लागार / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ/ सहा.जनसंपर्क अधिकारी/ मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य अंतर्गत लेखा परिक्षक / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/ अध्यक्षांचे स्वीय सचिव/ उपाध्यक्ष व व्यवस्थापक यांचे स्वीय सचिव/ सहा.कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय) यांस माहितीसाठी.

**(माधव काळे)**
**महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)**

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.०९/२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ १४९५
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४००००८.
दिनांक: १८ मार्च, २०१७.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड
अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय: रा.प.महामंडळातील अधिकारी / कर्मचारी यांचेवर बेहिशेबी मालमत्ता, नैतिक अध:पतन, लाचलुचपत, खून, खुनाचा प्रयत्न, बलात्कार या व यासारख्या गंभीर प्रकरणात फौजदारी गुन्हा दाखल झाल्याने निलंबनाची कारवाई झाली असेल अशा प्रकरणी निलंबनाच्या दिनांकापासून १ वर्षानंतर प्रकरण आढावा समितीसमोर ठेवणेबाबत.**

**संदर्भ:** १) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.निप्रआ-११११/ प्र.क्र.८६/११-अ दि.१४ ऑक्टोबर, २०११.
२)सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.अभियो- १३१२/प्र.क्र.३०/पुनर्बांधित- १/११-अ दि. १२ फेब्रुवारी, २०१३.
३)सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.अभियो- १३१४/प्र.क्र.८६/११-अ दिनांक ३१ जानेवारी, २०१५.

----------

रा.प.शिस्त व अपिल कार्यपध्दतीनुसार ९० दिवसांपर्यंत कसूरदार अधिकारी / कर्मचा-यास निलंबीत ठेवण्याचे अधिकार संबंधित सक्षम प्राधिका-यांस देण्यात आलेले आहेत. सक्षम प्राधिका-याच्या अधिकारात असलेल्या ९० दिवसांच्या निलंबन कालावधीच्या विहित मुदतीत संबंधित कर्मचा-यावरील अपराध कारवाई पूर्ण करण्याबाबत तसेच अपवादात्मक प्रकरणांमध्ये ९० दिवसांच्यापुढे व १८० दिवसांपर्यंत निलंबन कालावधी वाढविण्याबाबत मंजुरीसाठी प्रस्ताव मध्यवर्ती कार्यालयाकडे पाठविण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, उपरोक्त कालावधीमध्ये अपराध कारवाई पूर्ण न झाल्यास सक्षम प्राधिकारी यांस जबाबदार धरण्यात येईल.

कृ.मा.प.

Scanned by CamScanner

रा.प.महामंडळातील प्रमाद प्रकरणी निलंबीत करण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचे दिवसांपुढील निलंबन कालावधी वाढविणेबाबतचे प्रस्ताव मध्यवर्ती कार्यालयाकडे सादर केले जा महामंडळ ठराव क्र.९३७० दि.२९.१०.१९८० नुसार ९० दिवसांपुढे १८० दिवसांपर्यंत नि कालावधी वाढविण्याचे अधिकार मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना प्रदान करण्यात आले अ १८० दिवसांपुढे निलंबन कालावधी वाढविण्याचे अधिकार स्थायी समितीस प्रदान करण्यात आले आहेत.

महामंडळ ठराव क्र.२०१६:१२:१४ दि.३०.१२.२०१६ नुसार रा.प.महामंडळात बेहि मालमत्ता, नैतिक अध:पतन,लाचलुचपत,खून,खुनाचा प्रयत्न,बलात्कार या व यासारख्या गंभीर प्रक फौजदारी गुन्हा दाखल असलेल्या रा.प.अधिकारी व कर्मचा-याच्या प्रकरणामध्ये १ वर्षानंतर निलंबना निर्णय घेण्याचे किंवा निलंबन कालावधी वाढविण्याबाबतचे अधिकार पुढीलप्रमाणे गठीत करण्यात आले समितीस प्रदान करण्यात आले आहेत.

| | |
|---|---|
| मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी | अध्यक्ष |
| महाव्यवस्थापक (कवऔसं) | सदस्य |
| मुख्य कामगार अधिकारी | सदस्य |
| मुख्य विधि अधिकारी/विधि सल्लागार | सदस्य |
| मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी | सचिव |

शासन निर्णय दि.१४.१०.२०११ मध्ये दिलेल्या निदेशानुसार उपरोक्त समितीमध्ये एकही मागासव अधिकारी नसेल तर सदर समितीमध्ये महामंडळातील मध्यवर्ती कार्यालयातील/ मध्यवर्ती कार्यालयात उप नसल्यास विभाग किंवा घटकामधील कार्यरत असलेल्या वर्ग-१ दर्जाच्या मागासवर्गीय अधिका-याचा मा.उपाध्य व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने समितीमध्ये समावेश करण्यात येईल.

तरी यापुढे महामंडळ ठराव क्र.२०१६:१२:१४ दि.३०.१२.२०१६ नुसार ज्या रा.प.अधिका कर्मचा-यावर बेहिशोबी मालमत्ता, नैतिक अध:पतन,लाचलुचपत,खून,खुनाचा प्रयत्न,बलात्कार या यासारख्या गंभीर प्रकरणात फौजदारी गुन्हा दाखल झाल्याने निलंबनाची कारवाई करण्यात आली असेल अ प्रकरणी रा.प.अधिकारी व कर्मचा-यांना निलंबनाच्या दिनांकापासून संबंधित सक्षम प्राधिका-यांमा १ वर्षापर्यंत निलंबीत ठेवण्यात यावे व एक वर्षानंतर प्रकरण उपरोक्त आढावा समितीसमोर स करण्यासाठी या कार्यालयास पाठविण्यात यावेत.

या संदर्भात शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेऊन विभागांस / घटकांस खालील प्रमाणे सू देण्यात येत आहेत.

(१) ज्या प्रकरणी रा.प.अधिकारी / कर्मचा-यावर बेहिशोबी मालमत्ता, चोरी, लांडी-लबाडी, महामंडळ फसवणूक,नैतिक अध:पतन, लाच-लुचपत, खून, खुनाचा प्रयत्न, बलात्कार या व अशा गंभीर प्रकरणात फौज गुन्हा दाखल झाल्यामुळे निलंबनाची कारवाई करण्यात आली असेल अशा प्रकरणी निलंबनाच्या दिनांकापासून वर्षानंतर प्रकरण संबंधित निलंबन आढावा समितीसमोर निलंबन कालावधी वाढविण्याबाबत किंवा निलंबन करण्याबाबत विचारार्थ सादर करण्यात यावे.

Scanned by CamScanner

अ) असे प्रकरण निलंबन आढावा समिती समोर सादर करण्यापूर्वी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या विरुध्द रा.प.शिस्त व आवेदन कार्यपद्धतीमधील तरतूदीनुसार विभागीय चौकशी सुरु करण्यात येऊन दोषारोपपत्र बजावण्यात आलेले असावे.

ब) वरील प्रमाणे जेथे संबंधितांवर दोषारोप पत्रे बजावण्यात आलेली आहेत त्याबाबतच्या समक्ष सुनावणीची सद्य:स्थिती नमूद करुन <u>प्रकरण निलंबन आढावा</u> <u>समिती समोर सादर करण्यात यावे.</u>

क) संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द सक्षम न्यायालयात अभियोग चालविण्यास सक्षम प्राधिका-यांनी मंजुरी दिलेली असावी.

ड) (i) एकाच प्रकरणात <u>एकाच विभागातील/ घटकातील</u> एकापेक्षा अधिक अधिकारी व कर्मचारी गुंतलेले असून ते निलंबित असतील तर शक्यतोवर अशा प्रकरणात त्या प्रकरणातील सर्वच अधिकारी / कर्मचा-यांचा प्रस्ताव एकत्रितपणे मांडण्यात यावा . जेणेकरुन, एकाच प्रकरणातील अधिकारी /कर्मचा-यांच्या पुन:स्थापनेबाबत समान निर्णय घेणे निलंबन आढावा समितीस शक्य होईल.

(ii) एकाच प्रकरणात <u>एकापेक्षा अधिक विभागातील</u> अधिकारी व कर्मचारी गुंतलेले असून ते निलंबित असतील तर अशा प्रकरणात त्या प्रकरणातील सर्वच अधिकारी / कर्मचारी यांचा प्रस्ताव एकत्रितपणे सर्व विभाग जर एका नियंत्रण समितीच्या अधिपत्याखाली असतील तर त्या नियंत्रण समितीमार्फत किंवा सर्व विभाग एकापेक्षा जास्त नियंत्रण समितीच्या अधिपत्याखाली असतील तर जास्त अपचारी असलेल्या विभागाच्या संबंधित नियंत्रण समितीमार्फत निलंबन आढाव समिती समोर सादर करण्यात यावा. जेणेकरुन एकाच प्रकरणातील अधिकारी / कर्मचारी यांच्या पुन:स्थापनेबाबत समान निर्णय घेणे निलंबन आढावा समितीस शक्य होईल.

(२) <u>निलंबन आढावा समितीने प्रकरणांचा आढावा घेताना पुढील बाबी विचारात घ्याव्यात.</u>

१) विभागीय चौकशांतील / न्यायालयात दाखल झालेल्या दोषारोपपत्रातील दोषारोपाचे गांभिर्य, स्वरुप व व्याप्ती तसेच, तो सिध्द झाल्यास होऊ शकणारी कमाल शिक्षा.

२) संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचा निलंबन कालावधी १ वर्षाहून अधिक झालेला असावा.

३) फौजदारी गुन्हयाच्या संदर्भात सक्षम न्यायालयात अभियोग दाखल करण्याच्या प्रक्रियेची सद्य:स्थिती. संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या विरुध्द सक्षम न्यायालयात अभियोग चालविण्यास सक्षम प्राधिका-यांनी मंजुरी दिलेली असावी.

४) संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात येऊन दोषारोप पत्र बजावण्यात आलेले असावे. संबंधिता विरुध्द चालू असलेली विभागीय चौकशी / न्यायालयीन कार्यवाही / दोषारोप पत्र सादर करण्याच्या कार्यवाहीत विलंबास संबंधित अपचारी जबाबदार आहे किंवा कसे ?

५) संबंधित अधिकारी / कर्मचा-यांचा त्यापूर्वीचा सेवा तपशिल व सक्षम प्राधिका-याचे मत.

६) संबंधित अधिकारी / कर्मचा-यांस अदा करण्यात येणा-या निर्वाह भत्त्याची टक्केवारी व रक्कम.

कृ.मा.प.

Scanned by CamScanner

उपरोक्त बाबी विचारात घेऊन निलंबन आढावा समिती उपचा-याचे निलंबन संपुष्टात आणून अकार्य
पदावर नियुक्ती देण्याची शिफारस करु शकते. निलंबन आढावा समितीने अशा प्रकरणी आपला सविस्तर अह
स्पष्ट शिफारशीसह मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना सादर करावा. सदर अहवालावर मा.उपाध्य
व्यवस्थापकीय संचालक निर्णय घेतील.

(३) उपरोक्त नमुद केल्यानुसार निलंबन आढावा समितीच्या शिफारशीनुसार सक्षम प्राधिकारी आवश्यक
कार्यवाही करतील. मात्र, ज्या प्रकरणी अपचा-याला त्याच्याविरुध्दचे फौजदारी प्रकरण खटला/अपील/विभा
चौकशी प्रलंबित असताना पुनःस्थापित करण्याचा निर्णय झाला असेल, त्या प्रकरणी अशा अधिकारी / कर्मचा-य
अकार्यकारी, जनसंपर्क येणार नाही अशाच आर्थिक अधिकार नसलेल्या पदावर किंवा तसे शक्य नसेल तर आर्थि
अधिकार काढून घेऊन नियुक्ती देण्याची तसेच, प्रकरणाचा खटला/अपील/विभागीय चौकशी निकाल लागे
अशा अधिकारी/कर्मचा-याची पदस्थापना अशाच पदावर राहील याची खबरदारी सक्षम प्राधिका-यांनी घ्यावी.

(४) न्यायालयात अभियोग दाखल झालेल्या निलंबित शासकीय अधिकारी / कर्मचा-याला स
न्यायालयाने दोषमुक्त केले असेल तर सक्षम प्राधिका-याने त्याला पुनर्स्थापित करण्याबाबत निर्णय घ्य
कनिष्ठ न्यायालयाने दोषमुक्त केल्यानंतर संबंधित विभाग / घटक प्रमुखाने / सक्षम प्राधिका-याने व
न्यायालयात अपिल दाखल केले असेल तरीदेखिल अशा प्रकरणी संबंधित अधिका-यास / कर्मचा-यास व
न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अधिन राहून पुनर्स्थापित करण्याची कार्यवाही करावी. असे प्रकरण निल
आढावा समितीकडे पाठविण्याची आवश्यकता नाही.

तथापि, ज्या प्रकरणी एखाद्या रा.प. अधिकारी / कर्मचा-यावर एकापेक्षा जास्त फौजदारी गुन्हे दा
असतील व एका गुन्हयातून सदर रा.प. अधिकारी / कर्मचा-यास दोषमुक्त करण्यात आले असले तरी अ
फौजदारी गुन्हयाप्रकरणी कार्यवाही चालू असल्यास अशा रा.प. अधिकारी / कर्मचा-यांच्या बाबतीत वर वि
केल्यानुसार निलंबनाचा आढावा घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त दिलेल्या सुचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्था
(भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्था
अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार / सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मु
सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्य
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारी
अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

Scanned by CamScanner

परिपत्रक क्र. ९०/२०१७

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/ ५५८९
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई- ४००००८
दिनांक : २० मार्च, २०१७.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय : शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा १०० टक्के वापर करणेबाबत.
संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र.राप/आस्था/४०८-ई (१)/२४८२,दि.०७ जून २०१३.

-------

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर शासनाने मराठीतून राज्यकारभार करण्याचे आपले धोरण जाहीर केले आहे. सदर धोरणानुसार दिनांक २६ जानेवारी १९६५ पासून मराठी ही राज्याची राजभाषा म्हणून घोषित करण्यात आली. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम,१९६४ मधील तरतुदीनुसार दिनांक १ मे १९६६ पासून वर्जित प्रयोजने वगळता सर्व कामकाज मराठीतून करणे **बंधनकारक** करण्यात आले आहे. त्यानुसार वर्जित प्रयोजने वगळता सर्व कामकाज मराठीतून करण्यासाठी यापूर्वी वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, रा.प. महामंडळातील कार्यालयीन कामकाज १०० टक्के मराठीतून होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. शासनाच्या धोरणाची पायमल्ली होणे ही बाब अत्यंत आक्षेपार्ह आहे. सबब दि.२७ फेब्रुवारी २०१७ रोजीच्या मराठी दिनाचे औचित्य साधून मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ तथा मा.मंत्री (परिवहन) यांच्या निदेशानुसार खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

२. आपल्या कार्यालयातील तसेच आपल्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वर्जित प्रकरणे खेरीज करुन उर्वरित सर्व कामकाजात त्यातही विशेषत्वाने खालील बाबींमध्ये मराठीचा वापर १०० टक्के केला जाईल याची सर्व विभाग नियंत्रक/घटक प्रमुखांनी व्यक्तिश:खात्री करुन घ्यावी :-

### (अ) कार्यालय

- कार्यालयातील सर्व नामफलक व सुचनाफलक मराठीमध्ये लिहिणे. अधिका-यांचे पदनामासह नामफलक (नावातील आद्याक्षरे उच्चाराप्रमाणे मराठीतून लिहणे, जसे एच.एन.आपटे,विभाग नियंत्रक असे न लिहिता ह.ना.आपटे,विभाग नियंत्रक असे), मेजावरील पाटया तसेच आवश्यक ठिकाणी पर्यवेक्षकीय कर्मचा-यांच्या मेजावरील पाटया पदनामासह मराठीत असणे आवश्यक आहे. कर्मचा-यांच्या गणवेशावरील पाटयावरील नावे व पदनाम मराठीतूनच असणे आवश्यक आहे.

### (ब) कामकाज

- कार्यालयात सादर करण्यात येणा-या टिपण्या मराठीतच असाव्यात.
- अधिका-यांनी कार्यालयीन कामकाजासंदर्भात द्यावयाचे शेरे मराठीत नोंदवावेत.
- टिपणीवर सर्व कर्मचा-यांनी व अधिका-यांनी मराठीतच स्वाक्षरी करुन स्वाक्षरीखाली मराठी अद्याक्षरासह नाव, दिनांक व पदनाम मराठीत नमुद करुन टिपणी, पत्रव्यवहार व अन्य ठिकाणी मराठी आकडे नमुद करावेत. लेखाजोखा, तक्ते, वेतनपत्रिका, वार्षिक ताळेबंद या मधील मजकूर व आकडेही मराठीत असावेत.
- गोपनीय अहवाल/मूल्यांकन अहवाल कोणत्याही परिस्थितीत मराठीत सादर करावेत.
- सर्व परिपत्रके/निर्णय,विविध प्रकारच्या नोंदवहीतील नोंदी मराठीत असणे आवश्यक आहे.
- विभाग/घटकामार्फत करण्यात येणारा दैनंदिन पत्रव्यवहार मराठीतच करण्यात यावा.

---२---



Scanned by CamScanner

- निविदा संदर्भातील कागदपत्रे शक्यतो मराठीत प्रसिध्द करावीत.ते शक्य नसल्यास, इंग्रजीमधील निविदांचा मराठी अनुवाद प्रसिध्द करावा. कार्यालयातून निर्गमित करण्यात येणा-या जाहीराती/निविदा यांना मराठी वृत्तपत्रातून ठळक प्रसिध्दी देण्यात यावी.
- विभाग/घटकामार्फत निर्गमित करण्यात येणारे सर्व प्रकारचे आदेश मराठीत प्रसारित करावेत.

**(क) इतर आवश्यक कामकाज**

वर्जित प्रयोजनाबाबत अशा सूचना देण्यात येत आहेत कि :-

(१) सक्षम न्यायालयात शपथपत्र इंग्रजीतून दाखल करावे लागणार असले तरी त्याबाबतचा पत्रव्यवहार कार्यालयीन टिप्पण्या मराठीतच सादर कराव्यात .

(२) अशाच प्रकारे केंद्र शासनाशी /अन्य राज्यशासनाशी करावयाचा पत्रव्यवहार इंग्रजीतून करावा लागणार असला तरी त्या संबंधींच्या टिप्पण्या मराठीतच असाव्यात.

(३) याच प्रकारे जेथे इंग्रजीचा वापर करणे अनिवार्य असेल तेथेही वरील अनुक्रमाक (१), १(२)प्रमाणे कार्यवाही करावी.

३. वर नमूद केल्यानुसार कार्यालयातील कामकाजामध्ये १०० टक्के मराठीचा वापर होईल याकडे संबंधित विभाग नियंत्रक/घटक प्रमुखांनी **व्यक्तिशः** लक्ष देऊन आवश्यक ती उपाययोजना करावी. त्यासाठी त्यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयांना आवश्यक त्या सूचना तात्काळ द्याव्यात. दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत उपरोक्त कार्यवाही पूर्ण झाली असल्याचे व त्यानुसार १००% अंमलबजावणी होत असल्याची खात्री करुन घेऊन संबंधित विभाग नियंत्रक / घटक प्रमुख यांनी त्याबाबतचे **स्वतःच्या सहीचे प्रमाणपत्र** जोडलेला पूर्तता अहवाल दिनांक ०७.०४.२०१७ पर्यंत सादर करावा.

४. वर्जित प्रयोजने वगळता इतर बाबतीत सयुक्तीक कारणे नसताना राजभाषा मराठीचा वापर करण्यास टाळाटाळ करणा-या अधिकारी व कर्मचारी यांच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्यात यावी. त्या खेरीज त्यांच्याविरुध्द एका वर्षाकरिता बढती रोखणे किंवा एका वर्षाकरिता पुढील वेतन वाढ रोखणे या शिक्षा देण्यात याव्यात. त्यानंतरही सदर कर्मचा-यांनी मराठीत कामकाज करण्यास कुचराई केल्यास त्यांच्या विरुध्द **शिस्तभंगाची कठोरतम** कारवाई करण्यात यावी.

५. उपरोक्त सूचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे होत आहे किंवा कसे याचा पूर्तता अहवाल दर तीन महिन्यांनी विभाग नियंत्रक/ घटक प्रमुखांनी खाली दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार सादर करावा.

| अ.क्र. | कालावधी | अहवाल सादर करण्याचा दिनांक |
|---|---|---|
| १ | दि.०१.०४.२०१७ ते दि.३०.०६.२०१७ | दि.०७.०७.२०१७ |
| २ | दि.०१.०७.२०१७ ते दि.३०.०९.२०१७ | दि.०७.१०.२०१७ |
| ३ | दि.०१.१०.२०१७ ते दि.३१.१२.२०१७ | दि.०७.०१.२०१८ |
| ४ | दि.०१.०१.२०१८ ते दि.३१.०३.२०१८ | दि.०७.०४.२०१८ |

सदरहू परिपत्रक कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रदर्शित करावे. व आपल्या अखत्यारीतील सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावे व परिपत्रकातील सुचना समजलेबाबत संबंधितांच्या स्वाक्ष-या घेण्यात याव्यात. तसेच या परिपत्रकातील सूचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्याची जबाबदारी विभाग / घटक प्रमुखांची असेल. परिपत्रकाची पोच देण्यात यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :**

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (यं. अ)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/
महाव्यवस्थापक(नियोजन व पणन) /उपमहाव्यवस्थापक (बांधकाम)/मुख्य विधि अधिकारी /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव म.रा.मा.प. महामंडळ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/
मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/मा.अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव /
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/(प्रशासन)/(राज्यसंवर्ग)/(मागासवर्ग)/(मनुष्यबळ/नियोजन/समन्वय)/(घटकसंवर्ग) /(मुख्यालय)

(माधव काळे)

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. २२ /२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/ ७५७७
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक : 22 .०३.२०१७.

महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे / औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/ पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदूर्ग/ ठाणे/ नाशिक/ जळगांव/ धुळे/ अहमदनगर/ पुणे/ कोल्हापूर/ सांगली/ सातारा/ सोलापूर/ औरंगाबाद/ बीड/ जालना/ लातूर/ नांदेड/ उस्मानाबाद/ परभणी/ नागपूर/ भंडारा/ चंद्रपूर/ गडचिरोली/ वर्धा/ अमरावती/ अकोला/ बुलडाणा/ यवतमाळ.

....

विषय : शिकाऊ उमेदवारांची निवड करण्यासाठी कार्यपध्दती.
संदर्भ : कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१९/२००९
परिपत्रक क्र. राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/२०१-ई/३७४० दिनांक १०.०९.२००९.

*****

शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१ नुसार दरवर्षी फेब्रुवारी व ऑगस्ट सत्रामध्ये तांत्रिक व्यवसायिक व आय.टी.आय.उत्तीर्ण कार्यशाळा शिकाऊ उमेदवारांची नेमणूक केली जाते.

कार्यशाळा शिकाऊ उमेदवारांच्या निवडीबाबत संदर्भाधिन परिपत्रकानुसार शिकाऊ उमेदवारांच्या निवडीकरिता उमेदवारांच्या आय.टी.आंय.मध्ये मिळालेल्या गुणांना ७५ टक्के व मुलाखतीच्या गुणांना २५ टक्के भारांक देण्याचे निश्चित करण्यात आले होते. तसेच मुलाखतीकरिता प्रादेशिक व्यवस्थापक / कार्यशाळा व्यवस्थापक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन निवडीची कार्यवाही करण्याबाबत सुचना प्रसारित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार सध्या शिकाऊ उमेदवारांबाबतच्या निवडीबाबत कार्यपध्दती अवलंबिण्यात येत होती.

आता प्रादेशिक कार्यालय दिनांक ०१.१२.२०१६ पासून बंद करण्यांत आलेली आहेत. तसेच संचालक मंडळाने वर्ग-३ व वर्ग-४ पदाकरिता मुलाखती रद्द केल्याचे धर्तीवर शिकाऊ उमेदवारांचीही निवड त्यांचे आय.टी.आय./ बारावीच्या गुणांनुसार करण्याचे धोरण अवलंबिण्यास सक्षम प्राधिकारी यांनी मान्यता दिलेली आहे. मा.संचालक तथा राज्य प्रशिक्षणार्थी सल्लागार, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय, मुंबई यांनी शिकाऊ उमेदवारांची निवड करण्याकरिता संगणकीय प्रणाली सुरु केलेली आहे. त्यानुसार कार्यशाळा शिकाऊ उमेदवारांच्या निवडीबाबत खालीलप्रमाणे कार्यपध्दती विहीत करण्यात येत आहे.

१) सर्व विभाग / घटकांनी केंद्र शासनाने तयार केलेल्या एम.आय.एस.पोर्टलवर www.apprenticeship.gov.in या वेबसाईटवर प्रत्येक आस्थापनाने रजिस्ट्रेशन करणे बंधनकारक आहे. जे उमेदवार ऑनलाईन रजिस्ट्रेशन करतील त्याच उमेदवारांना शिकाऊ उमेदवार म्हणून भरती करता येईल व त्याच उमेदवारांचे कॉन्ट्रक्ट फॉर्म रजिस्ट्रर होतील.

२) आस्थापनेतील एकुण मनुष्यबळाच्या (कंत्राटी कामगारांसह) २.५% ते १०% या प्रमाणात आस्थापना शिकाऊ उमेदवारांची भरती करु शकतात.

३) शिकाऊ उमेदवार आस्थापनेमध्ये भरती झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत करारपत्र नोंदणी करणे आवश्यक आहे.

४) शिकाऊ उमेदवारांना त्यांच्या प्रशिक्षण कालावधीमध्ये आस्थापनेमध्ये असलेल्या रजेच्या नियमाप्रमाणे रजा अनुज्ञेय असेल.

५) आस्थापना वर्षातून केव्हाही शिकाऊ उमेदवारांची भरती करु शकतात. शिकाऊ उमेदवाराचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण झाल्यानंतर होणा-या एन.सी.व्ही.टी.परीक्षेस बसण्यास तो पात्र असेल.

..२..



Scanned by CamScanner

६) जर आस्थापनेने शैक्षणिक वर्षात शिकाऊ उमेदवारांची भरती न केल्यास सदर आस्थापनेस प्रथ... महिन्यांसाठी रु.१५००/- प्रति शिकाऊ उमेदवार आणि त्यानंतर रु.१०००/- प्रति शिकाऊ उमे... दंड जोपर्यंत सदर जागेवर प्रती शिकाऊ उमेदवार भरती करत नाहीत, तोपर्यंत शासनास ... करावा लागेल.

७) केंद्र शासनामार्फत प्रत्येक शिकाऊ उमेदवारामागे रु.१५००/- दरमहा आस्थापनेस प्रतिपुर्ती कर... येणार आहे.

८) शिकाऊ उमेदवार योजनेची संपुर्ण माहिती एम.आय.एस.पोर्टलद्वारे स्वीकारण्यात येईल.

वरील प्रमाणे कार्यपध्दतीनुसार प्राप्त होणा-या शिकाऊ उमेदवारांच्या अर्जांनुसार त्यांचे निवडीक... खालीलप्रमाणे समितीचे गठन करण्यात येत आहे.

मध्यवर्ती कार्यशाळा (दापोडी-पुणे, औरंगाबाद, नागपूर)

१) कार्यशाळा व्यवस्थापक,
२) अधिक्षक / उपअधिक्षक (उत्पादन),
३) सहायक कर्मचारीवर्ग अधिकारी

सर्व विभागांकरिता -

१) विभाग नियंत्रक,
२) यंत्र अभियंता (चालन),
३) विभागीय कर्मचारीवर्ग अधिकारी

कार्यशाळा शिकाऊ उमेदवारांची निवड करताना आय.टी.आय.परीक्षेत मिळालेल्या गुणांनुसार गुण... यादी व्यवसायानुसार तयार करुन शिकाऊ उमेदवारांना गुणवत्तेनुसार व व्यवसायनिहाय रिक्त जाग... नेमणूक देण्याची कार्यवाही सक्षम व नियुक्ती प्राधिकारी म्हणून संबंधित कार्यशाळा व्यवस्थापक / विभाग नि... यांनी वरील कार्यपध्दतीनुसार नियुक्ती देण्याची कार्यवाही करावी.

परिपत्रकाची पोच द्यावी व त्यानुसार कार्यवाही करावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क. व औ. सं.)

प्रत रवाना : मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यव... (भां.व ख)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) महाव्यवस्थापक (यं.अ.) / मुख्... अधिकारी/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती... मुंबई-पुणे, नियंत्रण समिती क्र.२ - नाशिक - औरंगाबाद, नियंत्रण समिती क्र.३ - अमरावती - नागपूर... कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी... कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/ मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपा... व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / स.क.अ. (मुख्यालय) / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासव... सामान्य प्रशासन यांस माहितीसाठी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क. व औ. सं.

SH\F:\2017- UR\UR-Circular - 2017.docx

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.१२/२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ ९८३६
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४०००0८.
दिनांक: ०७ मार्च, २०१७.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-नाशिक व औरंगाबाद)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड
अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

विषय: कुटूंब सुरक्षा योजने अंतर्गत गैरहजर व अपहार प्रकारामुळे बडतर्फ करण्यात आलेल्या कर्मचा-यांना पुनर्नेमणूक देणेबाबत

संदर्भ: १)परिपत्रक क्र.२३/२०१६ क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/३८४५ दि.०६.८.२०१६.
२)परिपत्रक क्र. २५/२०१६ क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/३८४७ दि.०६.८.२०१६.
३)पत्र क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/४२९९ दि.०२.०९.२०१६.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने प्रसारीत करण्यात आलेल्या परिपत्रक क्र.२३/२०१६ व परिपत्रक क्र.२५/२०१६ मध्ये देण्यात आलेली सूचना क्र.७ व संदर्भित पत्र क्र.४२९९ दि.०२.०९.२०१६ सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' मधील, पृष्ठ क्र.४ वरील मुद्दा क्र.९ नुसार शारिरीक पात्रता तपासणी बाबत देण्यात आलेली सूचना याद्वारे अधिक्रमीत करण्यात येत असून, या परिपत्रकान्वये आता पुढीलप्रमाणे सुधारीत सूचना देण्यात येत आहेत:-

१) परिपत्रक क्र.२३/२०१६ व परिपत्रक क्र.२५/२०१६ नुसार पात्र कर्मचा-यांना कुटूंब सुरक्षा योजने अंतर्गत पुनर्नेमणूक देताना संबंधित संवर्गातील / पदातील रिक्त जागांनुसार नेमणुकीची कार्यवाही करावी. यासाठी बिंदु नामावली पाहण्याची गरज नाही.

२) या कार्यालयाचे पत्र क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/४२९९ दि.०२.०९.२०१६ अन्वये उपरोक्त परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. सदर सूचनांमध्ये पुनर्नेमणूक देताना कर्मचा-याची शारिरीक पात्रता तपासणी करण्याबाबत नमुद करण्यात आले होते. तथापि सा.स्था.आ.क्र.५०३ नूसार ज्या पदासाठी शारिरीक पात्रता आवश्यक आहे, अशा पदातील उमेदवाराची शारिरीक पात्रता तपासणी करण्यात येते व पात्र उमेदवारांना रा.प.सेवेत सामावून घेण्यात येते. कुटूंब सुरक्षा योजने अंतर्गत पुनर्नेमणूक केले जाणारे कर्मचारी हे रा.प.चे माजी कर्मचारी असल्याने नियुक्तीच्यावेळी त्यांची शारिरीक पात्रता तपासण्यात आली असल्यामुळे कुटूंब सुरक्षा योजने अंतर्गत पुनर्नेमणूकीची कार्यवाही करताना त्यांची शारिरीक पात्रता तपासणी करण्यात येऊ नये. तथापि बडतर्फी नंतर

कृ.मा.प.

Scanned by CamScanner

काही कारणांमुळे संबंधित कर्मचा-यांमध्ये पुन्हा पुनर्नेमणूकीच्या पदाची कामगिरी त्यांना पार पाडता नाही अशा स्वरुपाचे काही व्यंग अथवा शारिरीक अक्षमता निर्माण झाली आहे किंवा कसे पडताळणी करण्याकरिता परिपत्रक क्र.२३/२०१६ व परिपत्रक क्र.२५/२०१६ नुसार कर्मचा-यास सुरक्षा योजने अंतर्गत पुनर्नेमणूक देताना सेवा विनियम ४७(ब) नुसार वैद्यकीय तपासणी करण्यात यावी.

३) या योजने अंतर्गत सुरु असलेल्या कार्यवाहीचा आढावा घेतला असता काही विभागांमध्ये झालेल्या अर्जांच्या प्रमाणात पुनर्नेमणूक दिलेल्यांची संख्या अत्यंत कमी असल्याचे दिसून येते. परिपत्रकानुसार करण्यात येणा-या कार्यवाहीस विलंब होत असल्याचे दिसून येत असल्याने सदर का जलद गतीने होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

अ) उपरोक्त परिपत्रकामधील दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने अनुसरावयाच्या कार्यपद्ध (Standard Operating System) या कार्यालयाचे पत्र क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ दि.०२.०९.२०१६ अन्वये सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार वरील क्र.२ ला अधिन राहून काटेकोरपणे कार्यवाही करण्याबाबत पुनश्च: सुचित करण्यात येत आहे.

ब) अर्जदाराच्या वैद्यकीय तपासणीपर्यंतची कार्यवाही अर्ज मिळाल्यापासून १५ कार्यालयीन दि आत करुन घेण्याची जबाबदारी संबंधित विभाग नियंत्रक यांची राहील.

क) अर्ज प्राप्त झाल्यापासून १५ कार्यालयीन दिवसांच्या आत छाननी पूर्ण करुन सकृतदर्शनी पात्र उमेदवारास वैद्यकीय तपासणीसाठी <u>न</u> पाठविल्यास, सदर उमेदवारास मध्यवर्ती कार्यालयाकडे त्याने अर्जाच्या छायाप्रतीसह अपील करता येईल. ही बाब, अर्जदाराच्या त्याचा अर्ज प्राप्त करुन निदर्शनास आणण्याची जबाबदारी संबंधित विभाग नियंत्रकांची राहील.

ड) अर्जदाराने विहित वैद्यकीय पात्रतेचा दाखला कार्यालयास सादर केल्यापासून कोणत्याही परि तीन कार्यालयीन दिवसांचे आत अर्जदारास नेमणूक देण्यात यावी.

इ) सदर सूचना संबंधित विभागाच्या / आगाराच्या सूचना फलकावर ठळकपणे प्रदर्शित करण्यात

ई) या योजने अंतर्गत दिलेल्या पुनर्नेमणूकी संदर्भात शासनास वेळोवेळी अहवाल सादर करावा असल्याने याची माहिती विहित नमुन्यात प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेच्या stadm@rediffmail.com या ई-मेल आयडीवर पाठविणेबाबत वारंवार पत्रा दूरध्वनीद्वारे सूचना देऊनही माहिती वेळेवर प्राप्त <u>न</u> झाल्याने शासनास अहवाल सादर क विलंब होतो, ही बाब खेदजनक आहे. या संदर्भात आपणास पुन्हा सूचित करण्यात येते की माहिती विहित नमुन्यात प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेच्या आत मध्यवर्ती कार्यालयाकडे करण्याची काटेकोरपणे दक्षता घेण्यात यावी. अन्यथा सदर बाब मा.उपाध्यक्ष व व्यवस्थ संचालक यांच्या निदर्शनास आणण्यात येईल.

फ) उपरोक्त सूचनांव्यतिरीक्त दि.०६.०८.२०१६ रोजीच्या परिपत्रकामधील व दि.०२.०९. रोजीच्या पत्रातील सूचनांमध्ये इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

Scanned by CamScanner

४. सदर कार्यवाही विहीत वेळेत होणेबाबत संबंधित विभाग नियंत्रक यांनी व्यक्तीशः पाठपुरावा करणे आवश्यक आहे. सदर अर्जदाराने वर नमूद केल्यानुसार मध्यवर्ती कार्यालयाकडे अपील केल्यास, व यामध्ये विलंब झाल्याचे निष्पन्न झाल्यास कार्यवाहीस झालेल्या विलंबाबाबत संबंधित विभाग नियंत्रक यांचा खुलासा मागवून, जरुर तर संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रकाची पोच देण्यात यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार / सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

Scanned by CamScanner

**परिपत्रक क्र.१३/२०१७**

क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/ ९८३
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-८
दिनांक:०८ एप्रिल, २०१७.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.

उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.

उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/ (समिती क्र.३- नागपूर व अमरावती).

कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर

विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,

मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/ नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी / नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषयः राज्य परिवहन महामंडळातील कर्मचारी कामगिरीवर असताना अपघातात जखमी झाल्यास/ ह्दयविकाराचा झटका आल्यास औषधोपचारास वैद्यकीय अग्रिम देणेबाबत.**

**संदर्भ:** १) परिपत्रक क्र.७/१९९७, क्र.राप/कर्मवर्ग/६०१-वै/७७९, दि.११.०२.१९९७

२) परिपत्रक क्र.१५/२०००, क्र.राप/कर्मवर्ग/६०१-वै/६६९, दि.०४.०२.२००२

३) कामगार करार परिपत्रक क्र.१/२०१३, क्र.राप/आस्था/७०२ जीई-२९७८, दि.०४.०७.२०१३

४) कामगार करार परिपत्रक क्र.राप/कर्मवर्ग/६०१-वै/४५९९, दि.११.१०.२०१३

---------

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कामगार करार २०१२-१६ समझोत्यातील मागणी क्र.४२ मध्ये मान्य करण्यात आल्यानुसार राज्य परिवहन महामंडळातील कर्मचारी कामगिरीवर असताना अपघातात जखमी झाल्यास/ ह्दयविकाराचा झटका आल्यास अशा कर्मचा-यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यास रु.८०,०००/- पर्यंत अग्रिम देण्याबाबत संदर्भित परिपत्रक क्र.४ नुसार सूचना प्रसारीत करण्यात आल्या आहेत.

तथापि सदरची रक्कम अपूरी असून त्यामध्ये वाढ करणे आवश्यक वाटल्याने राज्य परिवहन महामंडळातील कर्मचारी कामगिरीवर असताना अपघातात जखमी झाल्यास/ ह्दयविकाराचा झटका आल्यास रु.१,००,०००/- पर्यंत वैद्यकीय अग्रिम देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. तरी त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

--२--

Scanned by CamScanner

संदर्भित दोन्ही परिपत्रकातील अग्रीम रक्कम वगळता इतर सूचनांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. सदर परिपत्रक वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांच्या सहमतीने प्रसारीत करण्यात येत आहे.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार / सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(सेवामंडळ)/मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी(सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

Scanned by CamScanner

**कर्मचारीवर्ग खाते**

परिपत्रक क्र.१४/२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/लैंछ/ ९८८६

म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आ.ना.मार्ग,
मुंबई-४०००0८.
दिनांकः ६ एप्रिल, २०१७.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-नाशिक व औरंगाबाद)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक,रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड
अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

विषय : कामाच्या ठिकाणी महिलांवर होणा-या लैंगिक अत्याचाराबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत.

संदर्भ: परिपत्रक क्र.३३/२०१६,क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/लैंछ/५९७०, दि.०५.१२.२०१६.

उपरोक्त संदर्भित परिपत्रकानुसार मध्यवर्ती कार्यालय स्तरावर महिला लैंगिक अत्याचार तक्रार निवारण यंत्रणा समिती गठीत करण्यात आली होती. समितीतील अध्यक्ष श्रीमती शा.वि.उबाळे, भांडार अधिकारी (हं), भांडार व खरेदी खाते, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांनी सादर केलेला अध्यक्ष पदाचा राजीनामा मंजूर करण्यात आल्याने सदर जागा रिक्त झाली आहे. सदर रिक्त जागी श्रीमती दि.रा.कुंडले, सांख्यिकी अधिकारी यांची अध्यक्ष पदी मध्यवर्ती कार्यालय स्तरावर महिला लैंगिक अत्याचार तक्रार निवारण यंत्रणा समितीमध्ये नियुक्ती करण्यात येत असून रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई येथे खालीलप्रमाणे अंतर्गत तक्रार निवारण समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष | श्रीमती दि.रा.कुंडले | सांख्यिकी अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई |
| २ | सदस्य सचिव | श्रीमती एम.एस.उदामले | स्वीय सहाय्यक, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई |
| ३ | सदस्य | श्री.पी.बी.पवार | मुख्य कामगार अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई |
| ४ | सदस्य | श्रीमती शिल्पा मल्होत्रा | सहा.लेखा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई |
| ५ | सदस्य | श्री.एन.आर.तिवारी | यंत्र अभियंता (चालन) मध्यवर्ती कार्यालय, मुंबई |
| ६ | सदस्य | श्री.पी.एल.राठोड | सहा.कर्मचारीवर्ग अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई |
| ७ | सदस्य | श्रीमती दिव्या तनेजा | अशासकीय सदस्य (टाटा सामाजिक विज्ञान संस्थान, मुंबई) |

परिपत्रकाची पोच देण्यात यावी.

(माधव काळे)
**महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)**

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी /उप महाव्यवस्थापक (विधी) / सचिव,म.रा.मा.प. महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / सहा.जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / मा. अध्यक्षांचे स्वीय सचिव/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग)/(मुख्यालय)/(मनुष्यबळ)/(घटकसंवर्ग)/(प्रशासन)/(सामान्य प्रशासन)/ (मावक)/ श्रीमती शा.वि.उबाळे, भांडार अधिकारी (हं), म.का. मुंबई/ श्रीमती एम.एस.उदामले, स्वीय सहाय्यक,म.का.मुंबई / श्रीमती शिल्पा मल्होत्रा,सहा.लेखाअधिकारी,म.का.मुंबई/श्री.एन.आर.तिवारी,यंत्र अभियंता (चालन)म.का.मुंबई/ श्री.पी.एल.राठोड,सहा.कर्मचारीवर्ग अधिकारी(मुख्यालय)म.का.मुंबई/ श्रीमती दि.रा.कुंडले,सांख्यिकी अधिकारी,म.का.मुंबई/ श्रीमती दिव्या तनेजा,अशासकीय सदस्य (टाटा सामाजिक विज्ञान संस्था)/ व्ही.एन.पुरव मार्ग,देवनार,मुंबई-४०००८८.

(माधव काळे)
**महाव्यवस्थापक (क.व औ.सं)**

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. २५ /२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/ 2946
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक : १८.०४.२०१७.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे / औरंगाबाद / नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/ पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदूर्ग/ ठाणे/ नाशिक/ जळगांव/ धुळे/ अहमदनगर/ पुणे/ कोल्हापूर/ सांगली/ सातारा/ सोलापूर/ औरंगाबाद/ बीड/ जालना/ लातूर/ नांदेड/ उस्मानाबाद/ परभणी/ नागपूर/ भंडारा/ चंद्रपूर/ गडचिरोली/ वर्धा/ अमरावती/ अकोला/ बुलडाणा/ यवतमाळ.

....

विषय : सरळसेवा भरती अंतर्गत वाहक (कनिष्ठ) पदासाठी महिलांकरीता ठरविण्यात आलेल्या शारिरीक पात्रतेमध्ये अनुकंपा प्रकरणी शिथिलता देणेबाबत.

संदर्भ : कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. २१/१९९६,
पत्र क्र. राप/आस्था/४०८-ई/नोभ/५१०९ दिनांक ३०.०७.१९९६

*****

महामंडळ ठराव क्र.१९९६:०६:१७ दिनांक २४/२५ जून १९९६ अन्वये वाहक पदावर नोकरी देताना नेमावयाच्या महिला उमेदवारांना त्यांच्या शारिरीक पात्रतेबाबत कमीत कमी उंची १४८ सेंमी इतकी विहीत करण्याबाबत उपरोक्त संदर्भित परिपत्रकानुसार सुचना प्रसारित करण्यात आलेल्या आहेत.

महामंडळ ठराव क्र. २०१७:०३:२१ दिनांक १८.०३.२०१७ अन्वये अनुकंपा तत्त्वावरील महिला वाहक (कनिष्ठ) पदासाठी आवश्यक किमान उंची १४८ सेंमी. ऐवजी १४५ सेंमी. करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली आहे.

संचालक मंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार अनुकंपा तत्त्वावर महिला वाहक (कनिष्ठ) पदासाठी आवश्यक किमान उंची १४८ सेंमी. ऐवजी १४५ सेंमी. इतकी विहीत केली आहे. सदर बाब फक्त अनुकंपा तत्त्वावरील प्रकरणासाठी लागू राहील. या व्यतिरिक्त उपरोक्त संदर्भित परिपत्रकातील कोणत्याही अटीमध्ये बदल करण्यात आलेला नाही. याची नोंद घ्यावी.

सदर अर्हतेबाबत अशा त-हेची काही प्रकरणे विभागीय स्तरावर प्रलंबित असतील, ती सुध्दा उपरोक्त तरतूदी विचारात घेऊन नियमानुसार निकाली काढण्यात यावी.

परिपत्रकाची पोच द्यावी व त्यानुसार कार्यवाही करावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क. व औ.सं.)

त रवाना : मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक भां.व ख)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) महाव्यवस्थापक (यं.अ.) / मुख्य विधी अधिकारी/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्र.१ - मुंबई-पुणे, नियंत्रण समिती क्र.२ - नाशिक - औरंगाबाद, नियंत्रण समिती क्र.३ - अमरावती - नागपूर / मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/ मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे यक्तिक सचिव / स.क.अ. (मुख्यालय) / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन यांस माहितीसाठी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क. व औ.सं.)

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१६/२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/म.ब./ 2236
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आ.ना. मार्ग,
मुंबई- ४०० ००८
दिनांक २७ एप्रिल, २०१७.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी-पुणे/औरंगाबाद/नागपूर.
- कार्यकारी अभियंता, रा.प.मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
- विभाग नियंत्रक,
  रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/
  कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
  परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

विषय :- प्रादेशिक कार्यालय स्तर कमी करुन त्रिस्तरीय प्रशासन प्रणाली अनुसरण्यात आल्यामुळे प्रादेशिक कार्यालयातील वर्ग-३ व वर्ग-४ या संवर्गातील पदे गोठविण्याबाबत.

*********

नियोजन व पणन खात्याचे परिपत्रक क्र.२/२०१६ दिनांक १७.११.२०१६ अन्वये रा.प.महामंडळामध्ये सध्या कार्यान्वित असलेल्या चार स्तरीय प्रशासन प्रणाली मधिल प्रादेशिक कार्यालयस्तर कमी करुन त्रिस्तरीय प्रशासन प्रणाली अनुसरण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. तसेच प्रादेशिक कार्यालये बंद करुन त्याऐवजी ३ नियंत्रण समित्या (मॉनिटरिंग कमिटी) मध्यवर्ती कार्यालयात कार्यान्वित ठेवल्या आहेत.

तरी प्रादेशिक स्तर कमी झाल्याने प्रादेशिक कार्यालयामध्ये वर्ग-३ व वर्ग-४ या संवर्गात कार्यरत असलेल्या पदांमधून काही पदे रा.प.मध्यवर्ती कार्यालयात वर्ग करण्यात आली असून उर्वरीत अतिरिक्त ठरलेली पदे गोठविण्यात येत आहेत. त्याबाबतचा तपशिल खालील तक्ताप्रमाणे आहे.

तक्ता

| अ.क्र. | पदाचे नाव | परिपत्रक क्र.२४/७८६ दि.२.७.२००५ नुसार सुधारीत मंजुरी | ३ समित्यांसाठी मंजूर केलेल्या पदांची संख्या | गोठविण्याबाबत कार्यवाही करण्यात येणा-या पदांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | लघुलेखक (क/वरिष्ठ) | ६ | ३ | ३ | |
| २ | वरिष्ठ सहाय्यक/ पर्यवेक्षक | १२ | - | १२ | |
| ३ | सहाय्यक वाहतूक अधिक्षक | ११ | ३ | ८ | |
| ४ | सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक | ६ * | ३ | ३ | * परिपत्रक क्र.८/२००५ दि.३०.३.२००५ नुसार मूळ मंजूरीमधून ३ पदे समितीसाठी वर्ग |
| ५ | वाहतूक निरीक्षक | (१८) ६ * | - | ६ | * ८/२०१५ नुसार मूळ मंजूरी प्रादेशिक कार्यालयास प्रत्येकी १ अशी ठेवण्यात आली आहे ती गोठविण्यात येत आहे. |

-2-

Scanned by CamScanner

| अ. क्र. | पदाचे नाव | परिपत्रक क्र.२४/७८६ दि.२.७.२००५ नुसार सुधारीत मंजुरी | ३ समित्यांसाठी मंजूर केलेल्या पदांची संख्या | गोठविण्याबाबत कार्यवाही करण्यात येणा-या पदांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ६ | सहाय्यक वाहतूक निरीक्षक | ६ | - | ६ | |
| ७ | वरिष्ठ लिपिक | १८ | - | १८ | |
| ८ | लिपीक-टंकलेखक | १८ | ६+६ * = १२ | ६ | * मुख्य स्थापत्य अभियंता यां दि.१८.११.२०१६ रोजी सा केलेल्या टिप्पणीवर मा. सक्षम प्राधिकारी यांनी मंजूरी दिल्यानुस स्थापत्य अभियंता यांचे पत्र क्र.राप/स्थाअ/विद्युत/ ४५९९ दि.२२.११.२०१६ अन्वये ६ प्रदेशातील कार्यका अभियंता कार्यालयास प्रत्येकी लिपीक-टंकलेखक विद्युत कामासाठी वर्ग |
| ९ | खातेवाहन चालक | १८ | - | १८ | |
| १० | शिपाई | १२ | ३ | ९ | |
| ११ | सुरक्षा रक्षक | १२ | - | १२ | प्रादेशिक कार्यालय पुणे,औरंगा व नागपूर येथील प्रत्येकी सु.रक्षकांची मंजूरी गोठविण्यात आहे. |
| | एकूण | १२५ | २४ | १०१ | |

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत सादर रवाना :**

मा.मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी /वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी /
महाव्यवस्थापक (वाहतूक)/महाव्यवस्थापक (भांवख)/ महाव्यवस्थापक (यं.अ.)/महाव्यवस्थापक(नियोजन व पणन)/
उप महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/उप महाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)/विधि सल्लागार/मुख्य स्थापत्य अभियंता/
मुख्य कामगार अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/
सचिव, म.रा. मा.प. महामंडळ/ मुख्य कर्मचरीवर्ग अधिकारी(सेवामंडळ)/ /मुख्य कर्मचरीवर्ग आधिकारी/
जनसंपर्क अधिकारी /मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे स्वीय सहाय्यक/
मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तीक सचिव/
सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/ (घटकसंवर्ग)/ (मावक)/ (प्रशासन/सा.प्रशासन)/(राज्यसंवर्ग)

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

F:\MPP२०१७\Circular.docx

Scanned by CamScanner

परिपत्रक क्र. १७/२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ 2634
कर्मचारीवर्ग खाते, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४००००८.
दिनांक: १८ मे, २०१७.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र. १-मुंबई व पुणे)/(समिती क्र. २-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र. ३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद/जालना /लातूर/बीड/उस्मानाबाद /परभणी /नांदेड/
अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा/भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय: ९० दिवसांपुढे व १८० दिवसांपर्यंत निलंबन कालावधी वाढविणेबाबत.**

महामंडळ ठराव क्र.९३७० दि.२९.१०.१९८० अन्वये रा.प.अधिकारी / कर्मचारी यांचे अपराध प्रकरणी ९० ते १८० दिवसांपर्यंत निलंबन कालावधीचा निर्णय घेण्याचे व वाढविण्याचे अधिकार मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना अधिकार प्रदान करण्यात आले होते. सदर महामंडळ ठराव रद्द करण्यात आला असून, महामंडळ ठराव क्र.२०१७:०३:१५ दिनांक १८.०३.२०१७ अन्वये उपरोक्त विषया संदर्भात पारीत केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

रा.प.महामंडळातील अधिकारी / कर्मचारी यांच्या अपराध प्रकरणी निलंबनाबाबत निर्णय घेण्याचे व कालावधी वाढविण्याचे अधिकार पुढील प्रमाणे प्रत्यायोजित करण्यात येत आहेत.

| क्र. | निलंबन कालावधी | निलंबन कालावधी वाढविणारे प्राधिकारी |
|---|---|---|
| १ | ९० दिवसांपर्यंत | सक्षम प्राधिकारी |
| २ | ९१ ते १८० दिवस | महाव्यवस्थापक (क व औ.स.) |

उपरोक्त असलेल्या तरतूदीनुसार निलंबन कालावधीचे प्रस्ताव या कार्यालयाकडे मंजूरीसाठी पाठविताना मध्यवर्ती कार्यालयामार्फत परिपत्रक क्र.१९/२०१६ क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/३३०२ दि.१८.०७.२०१६ अन्वये देण्यात आलेल्या सूचनांनुसार या कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा. अपूर्ण प्रस्ताव विचारात घेतला जाणार नाही व त्यामुळे निलंबन कालावधी वाढविण्यास विलंब झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी विभाग/घटक प्रमुखाची राहील.

सदर परिपत्रकाची पोच देण्यात यावी.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प )/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार / सचिव, म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग)/ (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

महाव्यवस्थापक (क व औ.स.)

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्रमांक १८/२०१७

क्र. राप/कर्मवर्ग/मावक/ २८६६
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई ४०० ००८
दिनांक :- २० मे,२०१७

● महाव्यवस्थापक (आवेदन)
रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे
● उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण)
रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे
●कार्यशाळा व्यवस्थापक.
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा,
दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.
●विभाग नियंत्रक,
म.रा.मा.प.महामंडळ,
मुंबई/ठाणे/रत्नागिरी/रायगड/सिंधुदूर्ग/पालघर/पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर/नाशिक/धुळे/जळगांव/अहमदनगर/औरंगाबाद/बीड/जालना/नांदेड/उस्मानाबाद/लातूर/परभणी/नागपूर/चंद्रपूर/भंडारा/वर्धा/ गडचिरोली/अमरावती/बुलढाणा/अकोला/यवतमाळ.

विषय - शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ४ मे,२०१७ च्या अंतरीम आदेशाच्या अनुषंगाने खुल्या गुणवत्तेनुसार दिलेल्या तदर्थ नियुक्त्यांसंदर्भात करावयाची कार्यवाही.

संदर्भ - १) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १२/२०१४
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/४१२१ दि.०५ सप्टेंबर,२०१४
२) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १३/२०१४
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/४१२२ दि.०५ सप्टेंबर,२०१४
३) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १५/२०१४
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/४१३३ दि.०६सप्टेंबर,२०१४
४) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ०७/२०१५
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/९९६ दि.२४ फेब्रुवारी,२०१५
५) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ३८/२०१५
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/६१६७ दि.११ डिसेंबर,२०१५

*****

उपरोक्त विषयाबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांकःबीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-४/२०१३/१६-ब, दिनांक १७ मे,२०१७ ची प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी यासोबत जोडली आहे.

वरील शासन निर्णयाची काटेकोरपणे अमंलबजावणी करण्यात यावी.

सदर परिपत्रक मिळाल्याची कृपया पोच द्यावी.

सोबत :वरीलप्रमाणे

महाव्यवस्थापक (क.व औं.स.)

---२---

Scanned by CamScanner

<u>प्रत सादर रवाना :-</u>

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / विधि सल्लागार (वर्ग-१)/ सचिव,म.रा.मा.प. महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य कामगार अधिकारी / जनसंपर्क अधिकारी/ अध्यक्षांचे स्वीय सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (घटकसंवर्ग)/ (मनुष्यबळ / समन्वय) /(सामान्य प्रशासन)/(प्रशासन) यांचे माहितीसाठी. उपरोक्त शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.

२) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) यांचे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी. उपरोक्त शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.

सोबत :वरीलप्रमाणे

महाव्यवस्थापक (क.व औं.स.)

Scanned by CamScanner

**शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ४ मे, २०१७ च्या अंतरीम आदेशाच्या अनुषंगाने खुल्या गुणवत्तेनुसार दिलेल्या तदर्थ नियुक्त्यांसदर्भात करावयाची कार्यवाही.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-४/२०१३ /१६-ब**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : १७ मे, २०१७.

वाचा:-

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई (१)/ 3702
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई- ४००००८
दिनांक :-20जुन, २०१७.

- महाव्यवस्थापक (आवद), रा.प. प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/नांदेड/
  अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/
  उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय:- रा.प.महामंडळातील कार्यालयीन साफसफाई मोहिमेअंतर्गत जुन्या कालबाहय रद्दीची विल्हेवाट/लिलाव करणेबाबत.

संदर्भ:-१. क्र.राप/उपावव्यसं/खातेप्रमुख बैठक/१९८, दि २५.०५.२०१७.
२. सा.स्था.आदेश क्र.१००७ व क्र.१००७-अ दि.२४.०२.१९७१.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी वरील विषयाबाबत आढावा बैठकीमध्ये कार्यालयीन साफसफाई मोहिमेअंतर्गत सर्व रा.प. आस्थापनामधील कालबाहय झालेल्या जुन्या कागदपत्रांच्या रद्दीबाबत विल्हेवाट लावून रद्दी व इतर सामानांचा लिलाव विहीत कालमर्यादेत करण्यात याव्यात अशा सूचना दिल्या आहेत. त्यानुसार वरील संदर्भित आदेश क्र.२ मधील सूचना विचारात घेवून ज्या कागदपत्रांचा भविष्यात उपयोग होणार नाही. अथवा जुन्या रद्दीच्या स्वरुपात कार्यालयामध्ये पडून आहे. त्या रद्दीबाबत सबंधित खाते प्रमुखांनी आपल्या अखत्यारीत येणा-या सर्व आस्थापनांचा आढावा घेवून रद्दीची विल्हेवाट/लिलाव करण्याबाबत दि.१५ जुलै २०१७ ते दि.३१ जुलै २०१७ पर्यंत कालबध्द कार्यक्रम तयार करुन रद्दीची विल्हेवाट लावण्याची कार्यवाही करण्यांत यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल कोणत्याही परिस्थितीत दि.०५ ऑगस्ट २०१७ पूर्वी मध्यवर्ती कार्यालयास सादर करण्याची संबंधित खाते प्रमुखांनी व्यक्तिश: दक्षता घ्यावी.

या परिपत्रकातील सूचनांच्या अनुपालनात कसूर झाल्यास सक्षम प्राधिकारी यांचे निर्दशनास आणून देणेत येईल.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

--२--

D:\GAD\Circular\Gen Circular-२०१७.docx

Scanned by CamScanner

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :**

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (नियोजन)/महाव्यवस्थापक ( भां.व ख.)/महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (यं. अ)/ उपमहाव्यवस्थापक (संगणित्र)/मुख्य विधि अधिकारी/ मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिक / मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी /कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/अ... वैयक्तिक सचिव /उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे सचिव /मानसेवी मुख्य वैद्यकीय अ... सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (घटकसंवर्ग)/(मुख्यालय)/ (प्रशासन/सा.प्रशासन/(राज्य... (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/ समन्वय).

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.२८ /२०१७
महत्त्वाचे / तातडीचे :

क्र. राप/ कर्मवर्ग/आस्था/युआर/३४५६
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक : २३.०६.२०१७

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प. मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/ धुळे/ अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/ उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

...

विषय : शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत.

संदर्भ : कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. ०६/२०१७,
संदर्भ क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/१४१५ दिनांक १५.०३.२०१७.

***

शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ नुसार दरवर्षी फेब्रुवारी व ऑगस्ट सत्रामध्ये तांत्रिक व्यवसायिक व आय.टी.आय.उत्तीर्ण, कार्यशाळा शिकाऊ उमेदवारांची नेमणूक केली जाते व त्यांना शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार विद्यावेतन अदा करण्यात येते.

विद्यावेतनवाढ ही संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाद्वारा अधिसूचित अर्धकुशल कर्मचा-यांसाठी निश्चित केलेल्या किमान वेतनावर आधारित आहे. कामगार आयुक्त यांनी त्यांचे दि.२८.०१.२०१५ रोजीच्या कळविलेल्या पत्रानुसार किमान वेतन हे मुळ वेतन अधिक विशेष भत्ता एकत्रित करुन परिगणित करण्यात येते. मूळ वेतनावर दिला जाणारा विशेष भत्ता प्रत्येक सहा महिन्यानंतर बदलत असतो.

सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षणार्थी संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांचे पत्र क्र.२१/एटीएस/२०१५/प्र.क्र.१४/१७५ दिनांक १०.०९.२०१५ अन्वये किमान वेतनाच्या (Minimum Wages) दरामध्ये वेळोवेळी होणारे बदल सुधारण्यासाठी www.paycheck.in/India या संकेतस्थळावरुन अधिक माहिती उपलब्ध करुन घेण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

सदर संकेतस्थळावरुन माहिती घेतली असता दि.०१.०७.२०१६ ते ३१.१२.२०१६ या कालावधीकरिता खालीलप्रमाणे किमान वेतनाचे (Minimum Wages) दर दर्शविण्यात आले आहेत.

| अनु.क्र. | तपशिल | किमान वेतनाचे दर | |
|---|---|---|---|
| | | परिमंडळ - १ | परिमंडळ - २ |
| १. | मुळवेतन | ४६००.०० | ४४००.०० |
| २. | विशेष भत्ता | ३७३२.७५ | ३७३२.७५ |
| ३. | एकुण | ८३३२.७५ | ८१३२.७५ |



SH\F\2017-UR\UR Circular - 2017.docx

Scanned by CamScanner

उपरोक्त दर्शविलेल्या किमान वेतनाच्या दरानुसार रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय, श्रम व रोजगार मंत्रालय अधिसूचना भाग - II, खंड - ३, उपखंड (i) दि.२२.०९.२०१४ नुसार सुधारित दर खालीलप्रमाणे दर्शविण्यात येत आहेत.

| क्र. | वर्ष | **पूर्वीचा दर** (परिपत्रक क्र.०६/२०१७ संदर्भ क्र. राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/१४१५ दि.१५.०३.२०१७) | | **सुधारित दर** | |
|---|---|---|---|---|---|
| | | (www.paycheck.in/India येथे दर्शविल्यानुसार) किमान वेतन = मुळ वेतन + विशेष भत्ता **परिमंडळ-१ =** मुळ वेतन रु. ४६०० + विशेष भत्ता रु.३६३३ = रु.८२३३ व **परिमंडळ-२ =** मुळ वेतन रु. ४४०० + विशेष भत्ता रु.३६३३ =रु. ८०३३ (विशेष भत्ता दि.०१.०१.२०१६ ते ३०.०६.२०१६ कालावधीकरीता www.paycheck.in/India येथे दर्शविल्यानुसार) याप्रमाणे निश्चित केलेल्या किमान वेतनाच्या दरानुसार **सुधारित दर (रुपयामध्ये)** | | (www.paycheck.in/India येथे दर्शविल्यानुसार) किमान वेतन = मुळ वेतन + विशेष भत्ता **परिमंडळ-१ =** मुळ वेतन रु. ४६०० + विशेष भत्ता रु. ३७३२.७५ = रु. ८३३२.७५ व **परिमंडळ-२ =** मुळ वेतन रु. ४४०० + विशेष भत्ता रु. ३७३२.७५ =रु. ८१३२.७५ (विशेष भत्ता दि.०१.०७.२०१६ ते ३१.१२.२०१६ कालावधीकरीता www.paycheck.in/India येथे दर्शविल्यानुसार) याप्रमाणे निश्चित केलेल्या किमान वेतनाच्या दरानुसार **सुधारित दर (रुपयामध्ये)** | |
| | | **परिमंडळ - १** | **परिमंडळ - २** | **परिमंडळ - १** | **परिमंडळ - २** |
| १ | **पहिले वर्ष** | किमानवेतन रु. ८२३३.०० च्या ७०% = रु.५७६३.१० | किमानवेतन रु. ८०३३.०० च्या ७०% = रु.५६२३.१० | किमानवेतन रु. ८३३२.७५ च्या ७०% = रु.५८३२.९२ | किमानवेतन रु.८१३२.७५ च्या ७०% = रु.५६९२.९२ |
| २ | **दुसरे वर्ष** | किमानवेतन रु.८२३३.०० च्या ८०% = रु.६५८६.४० | किमानवेतन रु. ८०३३.०० च्या ८०% = रु.६४२६.४० | किमानवेतन रु. ८३३२.७५ च्या ८०% = रु.६६६६.२ | किमानवेतन रु.८१३२.७५ च्या ८०% = रु.६५०६.२ |
| ३ | **तिसरे वर्ष** | किमानवेतन रु.८२३३.०० च्या ९०% = रु.७४०९.७० | किमानवेतन रु. ८०३३.०० च्या ९०% = रु.७२२९.७० | किमानवेतन रु. ८३३२.७५ च्या ९०% = रु.७४९९.४७ | किमानवेतन रु.८१३२.७५ च्या ९०% = रु.७३१९.४७ |
| ४ | **चौथे वर्ष** | | | | |

** परिमंडळ १ - महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगर पालिका व 'अ' वर्ग नगरपालिका क्षेत्रांचे मिळून होईल

** परिमंडळ २ - परिमंडळ एक वगळून राज्याच्या उर्वरित क्षेत्राचे मिळून होईल.

..३.



Scanned by CamScanner

सदर अधिसुचनेमध्ये असे नमुद केले आहे की, जर एखाद्या संबंधीत राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाद्वारा एखाद्या व्यवसायासाठी किमान वेतनाचा दर ठरवून दिला नसेल तर अशावेळी या व्यवसायातील विद्यावेतन अदा करताना त्या संबंधीत राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाद्वारा अर्धकुशल कर्मचा-यांसाठी अधिसूचीत केलेल्या अनुसूचीत रोजगारातील जास्तीत जास्त किमान वेतन विचारात घेण्यात यावे. तसेच, सदर अधिसुचनेमध्ये अधिनियम धारा -६ मधील खंड -क मध्ये नमुद केलेल्या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारांनी जर राष्ट्रीय परिषदेने मान्य केलेल्या कोणत्याही विद्यालय किंवा अन्य संस्थामध्ये घेतलेला प्रशिक्षणार्थीचा कालावधी विद्यावेतन अदा करताना विचारात घेण्यात यावा असे नमुद केले आहे.

वर नमुद केल्याप्रमाणे, सुधारित दराने विद्यावेतन अदा करताना संबंधित खात्याशी संपर्क साधून महामंडळामधील शिकाऊ उमेदवारांना कोणत्या दराने विद्यावेतन द्यावे लागणार आहे, याची पुर्णपणे पडताळणी करुन व लेखा परिक्षण करुनच शिकाऊ उमेदवारांना विद्यावेतन अदा करावे. अतिरिक्त विद्यावेतन अदा केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी संबंधित विभाग/घटकाची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

तरी, वर दर्शविलेल्या तारखेपासून सुधारीत दराने विद्यावेतन अदा करण्यात यावे.

सदर परिपत्रक वित्त व लेखा खात्याच्या सहमतीने प्रसृत करण्यात येत आहे.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क. व औ.सं.)

प्रत रवाना : मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां.व ख)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) महाव्यवस्थापक (यं.अ.) / मुख्य विधी अधिकारी/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्र.१ - मुंबई-पुणे, नियंत्रण समिती क्र.२ - नाशिक - औरंगाबाद, नियंत्रण समिती क्र.३ - अमरावती - नागपूर / मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/ मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / स.क.अ. (मुख्यालय) / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन यांस माहितीसाठी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क. व औ.स.)

\2017- \UR-Circular - 2017.docx

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.२५/२०१७

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई (१)/ ३८७९
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई- ४००००८
दिनांक :-१४जुलै, २०१७.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प. प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/नांदेड/
  अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/
  उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय:- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील अधिकारी/कर्मचा-यांना स्वीयेतर सेवेत प्रतिनियुक्तीवर पाठविणेबाबत.
संदर्भ:- कर्मचारी वर्ग खाते परिपत्रक क्र.४२/२००१
क्र.राप/आस्था/७०४-जीई/जीएडी/३५२४, दि.२२ जुलै २००१.

मुंबई राज्य परिवहन कर्मचारी सेवा विनियम मधील प्रकरण चार 'अ' येथे स्वीयेतर सेवेसंबधी तरतुद विहित करण्यात आली आहे, त्यानुसार म.रा.मा.प. महामंडळातील अधिका-यांना स्वीयेतर संस्थेत प्रतिनियुक्तीवर पाठविण्याबाबत महामंडळ ठराव क्रमांक २०००:०३:०७ दि. ०७.०३.२००० पारित केला होता, त्यानंतर दिनांक १८.०३.२०१७ रोजीच्या संचालक मंडळामध्ये प्रतिनियुक्तीबाबत ठराव पारीत केला. तसेच दिनांक २०.०४.२०१७ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत अनु.क्र.१ मध्ये अंशत दुरुस्ती करण्यात आली. ती विचारात घेऊन प्रतिनियुक्तीबाबत खालीलप्रमाणे धोरण ठरविण्यात आलेले आहे:-

१. रा.प. महामंडळातील अधिकारी व कर्मचा-यांना, संयुक्त राष्ट्र संघटनेने पुरस्कृत केलेल्या आंतरराष्ट्रीय संस्था, केंद्र, राज्य शासन व त्यांचे अंगीकृत उपक्रमांवर तसेच एस.टी.को.ऑप.बॅक येथे व्यवस्थापकीय संचालक, या पदावर प्रतिनियुक्तीवर पाठविण्यास, संचालक मंडळाने मान्यता दिली.

२. रा.प.महामंडळाशी संबंधित कर्मचारी संघटना, सहकारी पतपेढी व एस.टी.को.ऑ.बॅक (बॅकेचे व्यवस्थापकीय संचालक पद वगळून) येथे रा.प.अधिकारी/कर्मचारी यांना प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात येऊ नये, यास संचालक मंडळाने मान्यता दिली.

३. सदर बाबत संचालक मंडळात पारीत केलेला ठराव क्र.२०००:०३:०७ दिनांक ०७.०३.२००० नुसार कार्यवाही करण्यास व प्रतिनियुक्तीच्या विनंतीबाबत गुणवत्तेनुसार प्रकरणनिहाय निर्णय घेण्यास, संचालक मंडळाने मान्यता दिली.

४. म.रा.मा.प.महामंडळातील अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीबाबत मुद्दा क्र.१ प्रमाणे गुणवत्तेनुसार प्रकरणनिहाय निर्णय घेण्याचे अधिकार, मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना प्रदान करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली.

--२--



Scanned by CamScanner

महामंडळ ठराव क्रमांक २०१०:०३:०३ दि.१८.०३.२०१७ मधील तरतुद राज्य प... महामंडळातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देण्यात यावी. तसे केल्याबाबतची नोंद घे... आपल्या दप्तरी ठेवण्यात यावी. या नंतरही राज्य परिवहन महामंडळातील अधिकारी/कर्मचारी तरतुदींची पू... करताच विना परवानगी स्वीयेतर सेवेत रुजू झाले तर त्याच्या विरुध्द शिस्त व अपिल कार्यपध्दतीनुसार ... करण्यात यावी.

सदर निर्णय महामंडळ ठरावाच्या दिनांकापासून म्हणजे दिनांक १८.०३.२०१७ पासुन लागू झाला...

**उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**
**म.रा.मा.प.महामंडळ**

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :**

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (नियोजन)/महाव्यवस्थापक ( भां.व ख.)/महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (यं. अ)/ उपमहाव्यवस्थापक (संगणित्र)/मुख्य विधि अधिकारी/ मुख्य स्थापत्य अभियंता / मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिक / मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी /कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/अध्यक्ष... वैयक्तिक सचिव /उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे सचिव /मानसेवी मुख्य वैद्यकीय अधिका... सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (घटकसंवर्ग)/(मुख्यालय)/ (प्रशासन/सा.प्रशासन/(राज्यसं... (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/ समन्वय).

- व्यवस्थापकीय संचालक, एस.टी.को.ऑ.बॅक, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई यांस माहिती व पु... कार्यवाहीस्तव.

**(माधव काळे)**
**महाव्यवस्थापक (क.व औ...**

Scanned by CamScanner

परिपत्रक क्र.२६/२०१७

क्र.रापु/कार्मवर्ग/वैध/ 3882
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल मुंबई-८.
दिनांक: २४ मे, २०१७.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय,पुणे.

उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक,रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /
नांदेड/अमरावती /अकोला /बुलढाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय: राज्य परिवहन महामंडळातील अधिकारी / कर्मचा-यांवर अवलंबित असणा-या नातेवाईकांच्या वैद्यकीय देयकाबाबत.**

---------

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, रा.प.अधिकारी / कर्मचारी यांचेवर अवलंबून असणा-या नातेवाईकांच्या वैद्यकीय देयकांबाबत सेवा विनियम १८८ मधील कुटुंबाच्या व्याख्येमध्ये समाविष्ट असणा-या नातेवाईकांच्या वैद्यकीय देयकांची प्रतिपूर्ती करण्यात येते. अधिकारी / कर्मचारी वैद्यकीय पर्याय स्विकारताना त्यांच्याकडून अवलंबित नातेवाईकांबाबत प्रतिज्ञापत्र घेण्यात येते.

तथापि अधिकारी / कर्मचारी यांचेवर अवलंबीत असणा-या नातेवाईकांच्या या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या काही वैद्यकीय देयकांच्या अर्जासोबत/अर्जावर सदर नातेवाईक अधिकारी/कर्मचारी यांचेवर अवलंबित असल्याचे नमुद केले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

या परिपत्रकाद्वारे स्पष्ट सूचना देण्यात येत आहेत की, यापुढे संबंधित विभाग / घटकाने वैद्यकीय देयक या कार्यालयाकडे सादर करताना अधिकारी / कर्मचा-याने दिलेल्या प्रतिज्ञापत्राची पडताळणी करुन अधिकारी / कर्मचा-यांचे संबंधित नातेवाईक सदर अधिकारी / कर्मचारी यांचेवर अवलंबित असल्याचे पत्रामध्ये स्पष्ट नमुद करण्यात यावे. अन्यथा या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या वैद्यकीय देयकांचा विचार केला जाणार नाही, व याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

म.रा.प.

Scanned by CamScanner

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार / सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(सेवामंडळ)/मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी(सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (का व औ.सं)

Scanned by CamScanner

**कर्मचारीवर्ग खाते**
**परिपत्रक क्र.२७/२०१७**

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ 8283
म.रा.मा.प.महामंडळ,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आ.ना.मार्ग,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४००००८.
दिनांक: 02 ऑगस्ट, २०१७.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय,पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र. १-मुंबई व पुणे)/(समिती क्र. २-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र. ३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड
अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय:शिस्त व आवेदन कार्यपध्दती अंतर्गत प्राप्त होणा-या**
**रा.प.कर्मचा-यांच्या निलंबन प्रस्तावाबाबत.**

**संदर्भ: १)या खात्याचे परिपत्रक क्र.१९/२०१६ दि.१८.०७.२०१६.**
**२)या खात्याचे पत्र क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/४५६६ दि.२२.०९.२०१६.**
**३) या खात्याचे पत्र क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/४८४६ दि.०५.१०.२०१६.**
**४)या खात्याचे पत्र क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/४२९ दि.२३.०१.२०१७.**

या कार्यालयाकडे प्राप्त होणा-या रा.प.शिस्त व आवेदन कार्यपध्दती अंतर्गत निलंबन कालावधी वाढीच्या प्रस्तावांचे अवलोकन केले असता, खालील बाबी प्रकर्षाने निदर्शनास आल्या आहेत.

१) रा.प.कर्मचा-याचे निलंबन करताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत या कार्यालयाचे संदर्भित परिपत्रक क्र.१ अन्वये व वेळोवेळी सूचना देऊनही काही विभागात सरसकटपणे निलंबनाची कार्यवाही केली जात आहे.

२) कसुरदाराविरुध्दची समक्ष सुनावणी वेळेत पूर्ण होऊनही अंतिम कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण न करता प्रस्ताव या कार्यालयाकडे पाठविले जात आहेत.

३) केवळ बडतर्फीच्या कारण मिमांसा पत्रावर मा.न्यायालयाकडून स्थगनादेश मिळविलेली प्रकरणे किंवा अपवादात्मक प्रकरणामध्ये ९० दिवसांपुढील निलंबन कालावधी वाढविण्याकरिता या कार्यालयाकडे पाठविण्याच्या सूचना असताना देखिल इतर प्रकरणेही या कार्यालयाकडे पाठविली जात आहेत.

४) संदर्भित पत्र क्र.४ अन्वये निलंबन कालावधी वाढविण्याचे प्रस्ताव सादर करताना कोणत्या बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे याबाबत सविस्तर सूचना असूनही अपूर्ण प्रस्ताव या कार्यालयाकडे पाठविले जात आहेत.

कृ.मा.प.

Scanned by CamScanner

सदर बाब अत्यंत गंभीर असून, यामुळे निलंबन कालावधी वाढविण्याची प्रकरणे प्रलंबित राहात असून, याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विभाग / घटक प्रमुख यांची असल्याने याबाबत आपणास खालीलप्रमाणे पुन:श्च सुचित करण्यात येत आहे.

रा.प.शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार कर्मचा-याचे निलंबन करताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत या कार्यालयाचे संदर्भित परिपत्रक क्र.१ अन्वये दिलेल्या सूचना विचारात घेणेबाबत पुन:श्च सुचित करण्यात येत आहे.

२. निलंबन झालेल्या कर्मचा-यावर अपराध कारवाई निलंबनाच्या मुदतीमध्येच पूर्ण करण्यात यावी. केवळ अपवादात्मक प्रकरणी निलंबन कालावधी वाढविण्याकरिता प्रस्ताव स्पष्ट खुलाशासह या कार्यालयाकडे पाठविण्यात यावा. (उदा.स्थगनादेश मिळविलेल्या प्रकरणी व इतर) अन्यथा अपराध कारवाई निलंबनाच्या मुदतीमध्ये पूर्ण न केल्याबद्दल सक्षम प्राधिकारी यांना जबाबदार धरण्यात येऊन सदर बाब मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे निदर्शनास आणण्यात येईल.

अ) बडतर्फीच्या कारण मिमांसा पत्रावर स्थगनादेश मिळविलेल्या प्रकरणी निलंबन कालावधी वाढीचा प्रस्ताव या कार्यालयाकडे पाठविताना सदर स्थगनादेश उठविण्याबाबत या कार्यालयाचे संदर्भित पत्र क्र.२ व ३ अन्वये दिलेल्या सूचनांनुसार केलेल्या प्रयत्नांचा तारीखनिहाय खुलासा आपल्या स्पष्ट अभिप्रायासह या कार्यालयाकडे पाठविण्यात यावा. सदर खुलासा विचारात घेऊनच निलंबन वाढविण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. अन्यथा याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभाग / घटक प्रमुखांची राहील.

ब) निलंबनाचा प्रस्ताव या कार्यालयाकडे पाठविताना खाली दिलेल्या नमुन्यामध्ये संबंधित कागदपत्रांसह पाठविण्यात यावा.

| कर्मचा-याचे नाव/हुद्दा/ विभाग | अपराधाचे धोडक्यात स्वरुप | आरोपपत्राची तारीख | निलंबीत केल्याची तारीख | समक्ष सुनावणी पूर्ण झाल्याची तारीख | ९० दिवसांचा निलंबन कालावधी पूर्ण. झाल्याची तारीख | बडतर्फीचे कारणमिमांसा पत्रावर स्थगनादेश मिळाला असल्यास | | [illegible] कालावधी वाढविण्याची कारणमिमांसा (खुलासा स्पष्ट अभिप्रायासह) व स्थगनादेश उठविण्यासाठी केलेले प्रयत्न | निलंबन कालावधी वाढविण्याची मुदत | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | कारणमिमांसा पत्र दिनांक व कर्मचा-यास प्राप्त दिनांक | स्थगनादेश दिनांक | | पासून | पर्यंत |
| | | | | | | | | | | |

उपरोक्त सूचनांनूसार परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयाकडे पाठविण्यात यावा.अपूर्ण प्रस्ताव विचारात घेतला जाणार नाही. याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विभाग/ घटकप्रमुख यांची राहील, याची नोंद घेण्यात यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.२८/२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ ४३५४
म.रा.मा.प.महामंडळ,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आ.ना.मार्ग,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४००००८.
दिनांक: ०८ ऑगस्ट, २०१७.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड
अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय: वय वर्षे ४० पुढील चालक / वाहकांची आरोग्य तपासणी करणेबाबत.**

**संदर्भ: १)या खात्याचे परिपत्रक क्र. २१/२०१४ दि.१३.११.२०१४.**
**२)या खात्याचे परिपत्रक क्र.१४/२०१६ दि.०३.०५.२०१६.**
**३) या खात्याचे परिपत्रक क्र.२०/२०१६ दि.१९.०७.२०१६.**
**४) या खात्याचे परिपत्रक क्र.२१/२०१६ दि.२७.०७.२०१६.**

----------

२०१४-१५ च्या शासनास सादर करण्यात आलेल्या KRA मध्ये ४० वर्षांवरील ५००० चालकांची आरोग्य तपासणी करण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार संदर्भित परिपत्रक क्र.२१/२०१४ नुसार सूचना प्रसारीत करुन त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात आली होती. त्यानंतर उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने रा.प.महामंडळातील ४० वर्षांपुढील चालकांची दरवर्षी आरोग्य तपासणी करणेबाबत संदर्भित परिपत्रक क्र.१४/२०१६ नुसार सूचना प्रसारीत करण्यात आल्या आहेत. तसेच शासनास सादर करण्यात आलेल्या २०१६-१७ च्या KRA अंतर्गत ४० वर्षांवरील वाहक / कार्यशाळा कर्मचारी यांची आरोग्य तपासणी करण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार संदर्भित परिपत्रक क्र.२०/२०१६ नुसार ४० वर्षांवरील चालक / कार्यशाळा कर्मचारी यांची आरोग्य तपासणी करणेबाबत सूचना प्रसारीत करण्यात आल्या होत्या. तथापि संदर्भित परिपत्रक क्र.२१/२०१६ नुसार ४० वर्षांवरील सर्व वाहकांची दोन वर्षांतून एकदा आरोग्य तपासणी करण्याबाबत सूचना प्रसारीत करण्यात आलेल्या आहेत.

या परिपत्रकाद्वारे पुन्हा सूचना प्रसारीत करण्यात येत आहेत की, संदर्भित परिपत्रकांमध्ये दिलेल्या सूचनांनुसार ४० वर्षांवरील सर्व चालकांची आरोग्य तपासणी दरवर्षी करण्यात यावी व ४० वर्षांवरील वाहकांची आरोग्य तपासणी दोन वर्षांतून एकदा करण्यात यावी. केलेल्या आरोग्य तपासणीबाबतचा सविस्तर अहवाल दरमहा १० तारखेपर्यंत या कार्यालयास पाठविण्यात यावा.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. २९ /२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/४८६-ई/ ६३८९
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक :१० .०८.२०१७.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे / औरंगाबाद / नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/ पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदूर्ग/ ठाणे/ नाशिक/ जळगांव/ धुळे/ अहमदनगर/ पुणे/ कोल्हापूर/ सांगली/ सातारा/ सोलापूर/ औरंगाबाद/ बीड/ जालना/ लातूर/ नांदेड/ उस्मानाबाद/ परभणी/ नागपूर/ भंडारा/ चंद्रपूर/ गडचिरोली/ वर्धा/ अमरावती/ अकोला/ बुलडाणा/ यवतमाळ.

....

विषय : सरळसेवा भरती अंतर्गत वाहतूक नियंत्रक (कनिष्ठ) पदासाठी महिलांकरीता ठरविण्यात आलेल्या शारिरीक पात्रतेमध्ये अनुकंपा प्रकरणी शिथिलता देणेबाबत.

संदर्भ : गोपनीय पत्र क्र.राप/आस्था/४८६-ई /२१, दि.१६.०१.१९९५.

*****

महामंडळ ठराव क्र. २०१७:०७:१५ दिनांक ०५.०७.२०१७ अन्वये अनुकंपा तत्त्वावर वाहतूक नियंत्रक (कनिष्ठ) पदावर भरती करताना महिलांकरीता किमान उंची १४८ सेंमी. ऐवजी १४५ सेंमी करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली आहे.

२. संचालक मंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार अनुकंपा तत्त्वावर भरती करताना वाहतूक नियंत्रक (कनिष्ठ) पदासाठी महिलांकरीता आवश्यक किमान उंची १४८ सेंमी. ऐवजी १४५ सेंमी. इतकी विहीत केली आहे. सदर बाब फक्त अनुकंपा तत्त्वावरील प्रकरणांसाठी लागू राहील. याव्यतिरिक्त वरील संदर्भित पत्रात इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही, याची नोंद घ्यावी.

३. सदर अर्हतेबाबत अशा त-हेची काही प्रकरणे विभागीय स्तरावर प्रलंबित असतील, सदर प्रकरणे सुध्दा उपरोक्त तरतूदी विचारात घेऊन नियमानुसार या परिपत्रकाच्या दिनांकापासून एका महिन्याच्या आत निकाली काढण्यात यावीत.

परिपत्रकाची पोच द्यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क. व औ.सं.)

प्रत माहितीसाठी रवाना : मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां.व ख)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) महाव्यवस्थापक (यं.अ.) / मुख्य विधी अधिकारी/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्र.१ - मुंबई-पुणे, नियंत्रण समिती क्र.२ - नाशिक - औरंगाबाद, नियंत्रण समिती क्र.३ - अमरावती - नागपूर / मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/ मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / स.क.अ. (मुख्यालय) / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क. व औ.सं.)

SH\F:\2017 - Anukampa\A-Circulars.docx

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ३० /२०१७

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई (१)/ ५२०३
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई- ४००००८
दिनांक :- २८/८/२०१७.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ, मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/नांदेड/ अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/ उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय:- दिनांक ०१.०४.२०१७ पासून कनिष्ठ वेतनश्रेणीचा कालावधी ३ वर्षावरुन १ वर्ष करणेबाबत. [वर्ग-३ व वर्ग-४ मधील रा.प.कर्मचारी]

संदर्भ:- १. सामान्य स्थायी आदेश क्र.११८४, दि.०५.१०.२०००.
२. कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.११/२००२, दि.१३.०२.२००२.
(क्र.राप/आस्था-४०८-ई (१)/जीएडी/९२५, दि१३.०२.२००२.)
३. कामगार करार २०१२-२०१६ परिपत्रक क्र.१/२०१३
(क्र.राप/आस्था-७०२-जीई/२९७८, दि.०४.०७.२०१३.)

रा.प.महामंडळातील वर्ग-३ व वर्ग-४ मधील कनिष्ठ प्रवर्गातील कर्मचा-यांना कनिष्ठ वेतन श्रेणीचा कालावधी ३ वर्षावरुन १ वर्ष इतका करणे व कनिष्ठ वेतनश्रेणीत ६ महिने पुर्ण झाल्यानंतर संबंधित कर्मचा-यास वैयक्तिक वेतन लागू करणे या संदर्भातील निर्णय मा.संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेला आहे, त्यासंबंधी संचालक मंडळाने ठराव क्र.२०१७:०४:१३ दि. २०/०४/२०१७ व महामंडळ ठराव क्र.२०१७:०७:०१ दिनांक ०५.०७.२०१७ पारित केलेला आहे. सदर पारित केलेल्या ठरावांच्या अनुषंगाने त्यांची रा.प.महामंडळात अंमलबजावणी करण्यासाठी खालीलप्रमाणे सुचना निगर्मित करण्यात येत आहेत.

१) रा.प. महामंडळातील वर्ग-३ व वर्ग-४ मधील कनिष्ठ प्रवर्गातील कर्मचा-यांचा कनिष्ठ वेतन श्रेणीचा कालावधी दिनांक ०१.०४.२०१७ पासून तीन वर्षाहून एक वर्ष इतका करण्यात आलेला आहे. दि.०१एप्रिल २०१७ रोजी कनिष्ठ वेतनश्रेणीत ज्या कर्मचा-यांचा एक वर्षाचा सेवाकाळ समाधानकारकरित्या पुर्ण झाला असेल त्यांना दिनांक ०१.०४.२०१७ पासून नियमित वेतनश्रेणीत घेण्यात यावे. तसेच ज्या कर्मचा-यांचा दि.०१.०४.२०१७ रोजी व तद्नंतर कनिष्ठ वेतनश्रेणीत एक वर्षाचा सेवाकाळ ज्यावेळी समाधानकारकरित्या पुर्ण होईल त्यावेळी त्यांना नियमित वेतनश्रेणीवर घेण्यात यावे.

(उदा. 'क्ष' हा कनिष्ठ प्रवर्गातील कर्मचारी दिनांक ०१.०१.२०१५ रोजी कामगिरीवर हजर झालेला असेल तर त्यास

-२--

Scanned by CamScanner

उपरोक्त सुचनांनुसार दिनांक ०१.०४.२०१७ रोजी नियमित वेतनश्रेणीवर घेण्यात येईल. तसेच 'क्ष' हा कनिष्ठ प्रवर्गातील कर्मचारी दिनांक ०१.०६.२०१६ रोजी कामगिरीवर हजर झालेला असल्यास त्यास उपरोक्त सुचनाधिन दिनांक ०१.०६.२०१७ रोजी नियमित वेतनश्रेणीवर घेण्यात येईल.)

२) दिनांक ०१.०४.२०१७ रोजी कनिष्ठ वेतनश्रेणीमध्ये कार्यरत असलेल्या परंतु १ वर्ष समाधानकारक सेवाकाळ पुर्ण न झालेल्या कर्मचा-यांना दि.०१.०४.२०१७ रोजी व तद्नंतर कनिष्ठ वेतनश्रेणीमध्ये ६महिने किंवा जास्त कालावधी पुर्ण झाला असल्यास दि.०१.०४.२०१७ रोजी उर्वरित कनिष्ठ वेतनश्रेणीतील कालावधीकरिता प्रतिमहा वैयक्तिक वेतन रक्कम रु.५००/- देय होईल. (वैयक्तिक वेतनावर महागाई भत्ता व इतर अनुषांगिक भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.)

[उदा. १. दि.०१.०६.२०१६ रोजी कामगिरीवर हजर झालेल्या कनिष्ठ प्रवर्गातील कर्मचा-यांस दि.०१.०४.२०१७ पासूनच्या उर्वरीत दोन महिन्याच्या कनिष्ठ वेतनश्रेणीच्या कालावधीकरीता वैयक्तिक वेतन दरमहा रु.५००/- देय होईल.]

[उदा. २. दि.०१.१०.२०१६ रोजी कामगिरीवर हजर झालेल्या कनिष्ठ प्रवर्गातील कर्मचा-यांस दि.०१.०४.२०१७ पासूनच्या उर्वरीत सहा महिन्याच्या कनिष्ठ वेतनश्रेणीच्या कालावधीकरीता वैयक्तिक वेतन दरमहा रु.५००/- देय होईल.]

३) दि.०१.०४.२०१७ व तद्नंतर सरळसेवा भरतीद्वारे निवड झालेल्या खात्यातील कर्मचा-यांचे वेतन त्यांचे निवडीपूर्वीच्या मुळ पदातील वेतन हे संरक्षित होत असल्याच्या कारणास्तव त्यांना वैयक्तिक वेतन दरमहा रु.५००/- देय होणार नाही. तथापि, ज्या कनिष्ठ प्रवर्गातील त्यांची वेतननिश्चिती ही वरच्या पदातील कनिष्ठ वेतनश्रेणीत किमान टप्प्यावर होत असल्यास त्यांस वरील सुचनानुसार वैयक्तिक वेतन कनिष्ठ वेतनश्रेणीच्या कालावधीकरिता देय होईल.

४) कनिष्ठ वेतनश्रेणीतील कर्मचा-यांचा परिविक्षा कालावधी त्यांनी काम समाधानकारक न केल्यास वाढविण्यात येतो. त्यामुळे एका वर्षानंतर जितका परिविक्षा कालावधी वाढविण्यात येईल, तितक्या वाढीव कालावधीसाठी प्रतिमहा रु.५००/- वैयक्तिक वेतन कर्मचा-यांना देय नसेल.

५) उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी रा.प.महामंडळात दिनांक ०१ एप्रिल २०१७ पासून लागू करण्यात येईल तसेच या निर्णयाचा लाभ रा.प. महामंडळातील वर्ग-३ व वर्ग-४ मधील कनिष्ठ वेतनश्रेणीत काम करणा-या कर्मचा-यांना अनुज्ञेय असेल.

सदरचे परिपत्रक हे लेखा खात्याच्या संमतीने व मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

परिपत्रकाची पोच देण्यात यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :**

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (नियोजन)/महाव्यवस्थापक ( भां.व ख.)/महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (यं. अ)/ उपमहाव्यवस्थापक (संगणित्र)/मुख्य विधि अधिकारी/ मुख्य स्थापत्य अभियंता / मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिक / मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी /कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.) / अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव /उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे सचिव / मानसेवी मुख्य वैद्यकीय अधिकारी/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (घटकसंवर्ग)/(मुख्यालय) (प्रशासन/सा.प्रशासन/(राज्यसंवर्ग) (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/ समन्वय).



Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.३१/ २०१७

क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/४८६-ई/५३०१
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक : २९.०९.२०१७.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१ - मुंबई व पुणे) / (समिती क्र.२ - औरंगाबाद - नाशिक) / (समिती क्र.३ - नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे / औरंगाबाद / नागपूर.
- विभाग नियंत्रक,
  रा.प.मुंबई / पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदूर्ग / ठाणे / नाशिक / जळगांव / धुळे / अहमदनगर / पुणे / कोल्हापूर / सांगली / सातारा / सोलापूर / औरंगाबाद / बीड / जालना / लातूर / नांदेड / उस्मानाबाद / परभणी / नागपूर / भंडारा / चंद्रपूर / गडचिरोली / वर्धा / अमरावती / अकोला / बुलडाणा/ यवतमाळ.

....

विषय : रा.प.अपघातामधील कर्तव्यावरील मृत कर्मचा-यांच्या मृत्युप्रसंगी अनुकंपा तत्वावर वारसदारांना नोकरी <u>अथवा</u> **"हिंदू हृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे अपघात सहाय्यता निधी योजना"** अंतर्गत नुकसान भरपाईचा लाभ देणेबाबत.

*****

रा.प.महामंडळात कर्तव्यावर असताना मृत्यु झालेल्या कर्मचा-याच्या वारसास अनुकंपा तत्वावर नोकरी देणेबाबतची योजना महामंडळ ठराव क्र.२००६:०४:०३ दिनांक २५.०४.२००६ नुसार कार्यान्वित आहे.

२. आता महामंडळ ठराव क्र.२०१६:०४:०७ दिनांक ०१.०४.२०१६ नुसार रा.प.महामंडळातर्फे दिनांक ०१.०४.२०१६ पासून रा.प.अपघातामधील कर्तव्यावरील मृत कर्मचा-यांच्या मृत्युप्रसंगी अनुकंपा तत्वावर वारसदारांना नोकरी <u>अथवा</u> **"हिंदू हृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे अपघात सहाय्यता निधी योजना"** अंतर्गत नुकसान भरपाईचा लाभ रु.१०,००,०००/- (रुपये दहा लाख फक्त) देण्याबाबतची तरतूद करण्यात आली आहे.

३. उपरोक्त महामंडळ ठरावाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेतः-

१) दिनांक ०१.०४.२०१६ पासून कर्तव्यावर असताना रा.प.अपघातात मृत्यु प्रसंगी कर्मचा-याच्या वारसास **अनुकंपा तत्वावर नोकरी** <u>अथवा</u> **"हिंदू हृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे अपघात सहाय्यता निधी योजना"** अंतर्गत नुकसान भरपाई रु.१०,००,०००/- लाभ यापैकी एक पर्याय स्वीकारण्याची मुभा राहील.

२) अशा वारसास अनुकंपा नोकरी किंवा वरील अपघात सहाय्यता निधी योजनेअंतर्गत रु.१०,००,०००/- यापैकी निवडलेला एक पर्याय स्वीकारणे अनुज्ञेय आहे. त्याकरीता सर्व वारसांनी एकत्रित बंधपत्रावर स्वाक्षरी करुन नोटराईज करुन कर्मचारी ज्या विभागात होता, त्या विभागात सादर करणे आवश्यक राहील.

२..

SH\C:\Users\admin1\Desktop\A-Circulars.docx

Scanned by CamScanner

३) सदर लाभ हा श्रमिक भरपाई अधिनियम १९२३ नुसार देय असलेल्या भरपाई रकमेच्या व्यतिरिक्त देय होणार आहे.

४. विभागांनी नुकसान भरपाईचा पर्याय देण्या-या वारसांना नुकसान भरपाईची रक्कम अदा करून सदर प्रयोजनासाठी केलेला खर्च "३७३-डी" या लेखाशिर्षखाली नमुद करावा.

सदर परिपत्रक वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांचे संमतीने प्रसारित करण्यात येत आहे.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क. व औ. सं.)

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी, रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८ यांचे माहितीकरीता.

३) वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८ यांचे माहितीकरीता.

४) महाव्यवस्थापक(वाहतूक)/ महाव्यवस्थापक(भांवख)/ महाव्यवस्थापक(यं.अ.)/ महाव्यवस्थापक(निवप) / उपमहाव्यवस्थापक(मावतं) / मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य कामागार अधिकारी/ मुख्य लेखा परीक्षण अधिकारी/ विधि सल्लागार /
जनसंपर्क अधिकारी/ सचिव,म.रा.मा.प.महामंडळ, रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.

५) मा.अध्यक्ष यांचे स्वीय सहाय्यक/मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.

६) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / कर्मचारीवर्ग अधिकारी / सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (घटकसंवर्ग) / (मावक) / (प्रशासन) / (सा.प्रशासन).

Scanned by CamScanner

**कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. ३२/२०१७**

क्र.राप/कर्मवर्ग/म.ब./५३१०
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आ.ना. मार्ग,
मुंबई- ४०० ००८
दिनांक : २९ सप्टेंबर, २०१७.

- महाव्यवस्थापक (आवे[illegible]), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उप महा[illegible], रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उप महाव्यवस्थापक(समिती क्र.१ मुंबई व पुणे )/(समिती क्र.२ नाशिक व औरंगाबाद)/ (समिती क्र.३ नागपूर व अमरावती).
- कार्यकारी अभियंता, रा.प.मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी-पुणे/औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक,
रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ.

विषय :-पर्यवेक्षकीय कर्मचा-यांच्या पदांचे वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी या पदात रुपांतर करण्याबाबत.

...

रा.प.महामंडळातील कामाचे पर्यवेक्षण अधिक प्रभावीपणे करता यावे यासाठी उपलब्ध मनुष्यबळाचा पर्याप्त वापर करुन उत्पादकतेची उच्चतम पातळी गाठता यावी यादृष्टीकोनातून राज्यसंवर्ग प्रवर्गातील काही पदे वर्ग-२ मध्ये रुपांतरीत करण्याचा प्रस्ताव काही काळ महामंडळाच्या विचाराधीन होता.

रा.प.महामंडळामध्ये वर्ग-२ अधिकारी यांचे संख्याबळ कर्मचा-यांच्या तुलनेत अत्यंत अल्प असल्याचे आढळले त्यामुळे कर्मचा-यांकडून प्रभाविपणे काम करुन घेणे शक्य होत नाही असे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे त्यांनी खात्यामधील आवश्यक पर्यवेक्षकीय कर्मचा-यांना वर्ग-२ (कनिष्ठ) अधिका-यांचा दर्जा देऊन स्वतंत्र जबाबदारी सोपविल्यास महामंडळाच्या कामाचे नियोजन व व्यवस्थापन प्रभावीपणे होऊन महामंडळाच्या उत्पादकतेमध्ये वाढ होईल. ही बाब विचारात घेऊन वर्ग-३ राज्यसंवर्ग प्रवर्गातील ९ पदांचे खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार वर्ग-२(कनिष्ठ) अधिकारी या पदात रुपांतर करण्यात येत आहे.

तक्ता

| अ. क्र. | प्रवर्ग | पदांच्या आढाव्यानुसार मंजूर पदे | सध्याची वेतनश्रेणी (रु.) | वर्ग-३ प्रवर्गाची श्रेणीउन्नतीकरण झाल्यानंतरचे पदनाम | वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी या पदाची वेतनश्रेणी (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | सहा.वाह.अधिक्षक | २९३ | ७६६०-२५०२० | वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी | ७७५०-२५९०७ |
| २ | सहा.कार्य.अधि./ कनिष्ठ कार्यदेशक | ३५४ | ७६६०-२५०२० | वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी | ७७५०-२५९०७ |
| ३ | वरिष्ठ कार्यादेशक | ४६ | ७८३०-२५५८१ | वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी | ७७५०-२५९०७ |
| ४ | भांडार पर्य./ वरि. संग्रह पडताळक | ४१ | ७६६०-२५०२० | वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी | ७७५०-२५९०७ |
| ५ | विभागीय लेखाकार | ४९ | ७६६०-२५०२० | वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी | ७७५०-२५९०७ |
| ६ | कनि.अभियंता(स्था) | १३० | ७६६०-२५०२० | वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी | ७७५०-२५९०७ |
| ७ | कनि.अभियंता(वि) | २४ | ७६६०-२५०२० | वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी | ७७५०-२५९०७ |
| ८ | कार्या.अधि[illegible]/ आस[illegible]/वाहतूक पर्यवेक्षक | १०७ | ७६६०-२५०२० | वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी | ७७५०-२५९०७ |
| ९ | वरिष्ठ संगणित्र चालक | ५ | ७६६०-२५०२० | वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी | ७७५०-२५९०७ |
| | एकूण महामंडळ | १०४९ | | | |

-२-

Scanned by CamScanner

२. वर्ग-३ राज्यसंवर्ग या प्रवर्गातील वरील ९ पदे वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी या पदात रुपांतरीत करण्याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

१) वर नमूद केल्यानुसार वर्ग-३ राज्यसंवर्ग प्रवर्गातील वरील ९ प्रवर्गांची मंजुरी १०४९ ही वर्ग-३ राज्यसंवर्ग या प्रवर्गातून समर्पित करुन त्याप्रती १०४९ एवढी मंजुरी कमी करुन सदर पदे वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी या नवीन प्रवर्गाची निर्मिती करुन त्यामध्ये समाविष्ट करण्यात येत आहे.

२) वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी या नवीन प्रवर्गाची वेतनश्रेणी रु. ७७५०-२५९०७ अशी राहील.

३) वर्ग-३ राज्यसंवर्ग वर नमूद केलेल्या ९ प्रवर्गातील १०४९ पदांपैकी सध्याचे सरळसेवा व खात्याचे विविध प्रवर्गातील प्रमाण वेगवेगळे असल्यामुळे सदरची १०४९ पदे ही नव्याने निर्माण करण्यात येणा-या वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी वेतनश्रेणी रु. ७७५०-२५९०७ या वेतनश्रेणीत १००% खात्यांतर्गत पदोन्नतीने भरण्यात येतील.

४) वरील ९ प्रवर्गातील एकूण १०४९ पदे श्रेणीउन्नत करुन संबंधित कर्मचा-यांना वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी या नवीन प्रवर्गाची वेतनश्रेणी देण्यात येणार असल्याने त्यांची वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी या प्रवर्गात बढतीवर नेमणूक होणार असल्याने अशाप्रकारे श्रेणीउन्नत करण्यात आलेल्या कर्मचा-यांना निवडश्रेणीची संधी लागू राहणार नाही.

५) वर नमूद केल्यानुसार १०४९ पदे ही १००% खात्यांतर्गत पदोन्नतीने भरण्यात येणार आहेत मात्र वरील ९ प्रवर्गांपैकी एकूण ६ प्रवर्गांसाठी एकूण १८७ जागा सरळसेवा भरतीने भरण्याकरीता सन २०१७ मध्ये जाहिरात देण्यात आली असल्यामुळे सदर उमेदवारांची जाहिरातीनुसार दर्शविलेल्या कनिष्ठ वेतनश्रेणीमध्ये १ वर्ष समाधानकारक कामगिरी झाल्यानंतर सदर उमेदवारांना एकवेळचा पर्याय म्हणून नवनिर्मित वर्ग-२ (कनिष्ठ) या प्रवर्गात रु.७७५०-२५९०७ या वेतनश्रेणीत सामावून घेण्यात येईल व त्यानंतर नव्याने निर्माण करण्यात आलेल्या वर्ग-२ (कनिष्ठ) या प्रवर्गातील अधिकारी यांच्या सेवानिवृत्ती, मृत्यू, राजीनामा इत्यादी कारणास्तव रिक्त होणा-या जागा खात्यांतर्गत कर्मचा-यांना पदोन्नती देऊन भरण्यात येतील.

६) वर नमूद केल्यानुसार १०४९ पदे ही १००% खात्यांतर्गत पदोन्नतीने भरण्यात येणार आहेत मात्र वरील ९ प्रवर्गातील सध्या वर्ग-३ राज्यसंवर्ग या पदात कार्यरत असलेले ७५६ पदांमधील जे कर्मचारी यापूर्वी वर्ग-२ नियमीत या पदाची खाते बढती परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रतिक्षा यादीवर आहेत त्या कर्मचा-यांना त्यांच्या सेवाज्येष्ठतेनुसार वर्ग-२ नियमीत पदातील रिक्त जागा व आरक्षणानुसार वर्ग-२ नियमीत प्रवर्गातील रु.१२९७०-३१५०३ या वेतनश्रेणीत प्रचलित कार्यपध्दतीनुसार सामावून घेण्यात येईल व त्यानंतर वर्ग-३ राज्यसंवर्ग प्रवर्गामध्ये कार्यरत असलेल्या पर्यवेक्षकीय कर्मचा-यांचे श्रेणीउन्नतीकरण करुन त्यांना वर्ग-३ राज्यसंवर्ग या प्रवर्गातून वर्ग-२ (कनिष्ठ) या पदात त्यांची किमान ३ वर्ष सेवा समाधानकारक पूर्ण झाल्यानंतर प्रचलित कार्यपध्दतीनुसार बढती देण्यात आल्यानंतर सदर कर्मचा-यांना वर्ग-२ (वरिष्ठ) या प्रवर्गात सामावून घेण्यात येईल.

७) वर नमूद केल्यानुसार नव्याने निर्माण करण्यात येणा-या वर्ग-२ (कनिष्ठ) या पदात ३ वर्षाची नियमीत सेवा पूर्ण केल्यानंतर अशा कर्मचा-यांना वर्ग-२ (वरिष्ठ) रु.१२९७०-३१५०३ या वेतनश्रेणीत पदोन्नती देताना नियमानुसार खाते बढती परीक्षेचे आयोजन करण्यात येईल.

-३-

Scanned by CamScanner

८) वर्ग-३ राज्यसंवर्ग या ९ प्रवर्गातील कर्मचा-यांचे श्रेणीउन्नतीकरण करुन त्यांना वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी या पदाचा दर्जा दिल्याने सध्या वर्ग-२ (कनिष्ठ) रु.१२९७०-३१५०३ या वेतनश्रेणीत कार्यरत असलेल्या अधिका-यांच्या पदनामात बदल करुन सदर पदाचे नामकरण वर्ग-२ (वरिष्ठ) असे करण्यात येत आहे. तसेच वर्ग-२ (वरिष्ठ) वेतनश्रेणी रु.१४८८०-३६१४१ या वेतनश्रेणीत कार्यरत असलेल्या अधिका-यांच्या पदनामात बदल करुन सदर पदाचे नामकरण वर्ग-२ (वरिष्ठ) (निवडश्रेणी) असे करण्यात येत आहे.

३. तरी वरीलप्रमाणे वर्ग-३ राज्यसंवर्ग या ९ प्रवर्गातील कर्मचा-यांना वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी वर्गात प्रत्यार्पित करुन विशिष्ट जबाबदारी दिल्यामुळे चालनीय स्थितीमध्ये प्रभावी नियोजन व नियंत्रण येऊन कर्मचा-यांच्या कार्यक्षमतेमध्ये वाढ होईल. परिणामस्वरुप महामंडळच्या उत्पादकतेमध्ये वाढ होऊन महामंडळाचे चालनीय कामकाज अधिक प्रभावीपणे चालण्यास मदत होईल. तरी वर्ग-३ राज्यसंवर्ग पर्यवेक्षकीय कर्मचा-यांना वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी हा दर्जा देण्याबाबतचे आदेश दिनांक १.१०.२०१७ पासून अंमलात येतील.

४. सदर परिपत्रक वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांच्या सहमतीने तसेच मा.संचालक मंडळाच्या कार्योत्तर मंजुरीच्या अधिन राहून प्रसारीत करण्यात येत आहे.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी, रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८ यांचे माहितीकरीता.
२) वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८ यांचे माहितीकरीता.
३) महाव्यवस्थापक(वाहतूक)/ महाव्यवस्थापक(भांवख)/ महाव्यवस्थापक(यं.अ.)/ महाव्यवस्थापक(निवप) / उपमहाव्यवस्थापक(मावतं) / मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य कामागर अधिकारी/ मुख्य लेखा परीक्षण अधिकारी/ विधि सल्लागार /जनसंपर्क अधिकारी/ सचिव,म.रा.मा.प.महामंडळ, रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.
४) मा.अध्यक्ष यांचे स्वीय सहाय्यक/मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.
५) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ कर्मचारीवर्ग अधिकारी / सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग)/(मुख्यालय)/ (घटकसंवर्ग)/ (मावक)/ (प्रशासन)/(सा.प्रशासन).

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

MPP२०१७Circular.docx

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ३३ /२०१७

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई (१)/५३११
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४००००८
दिनांक :- २९ सप्टेंबर, २०१७.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प. प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/नांदेड/
  अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/
  उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

**विषय: वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरलेल्या कर्मचारी यांना स्वेच्छानिवृत्ती लागू करणेबाबत.**

...

शारिरीक विकलांगतेमुळे रा.प.महामंडळाचे कामकाज करण्यास असमर्थ असलेल्या कर्मचा-यांना स्वेच्छानिवृत्ती दयावयाची आहे. सदरची योजना रा.प.संचालक मंडळाच्या मंजूरीच्या अधिन राहील. सदर स्वेच्छानिवृत्ती योजनेच्या अंमजबजावणीसाठी रा.प.विभाग / घटक यांना खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

## योजनेचे स्वरुप

| | |
|---|---|
| १)लाभार्थी | - कामगार/कर्मचारी |
| २)स्वेच्छानिवृत्तीस पात्रता | - शारिरीक विकलांगतेमुळे कर्तव्य बजावण्यास असमर्थ ठरणे |
| ३)योजनेचा लाभ मिळण्यासाठी वयाची व सेवेची अट | - महामंडळामध्ये कामगार /कर्मचारी म्हणून रोजंदार कालावधी धरुन किमान २० वर्षे सेवा झालेली असावी. |
| ४)स्वेच्छा निवृत्ती मंजूर करणारे प्राधिकारी | - नियुक्ती प्राधिकारी |
| ५)लाभ मिळण्यासाठीचे प्रमाणपत्र | - शासकीय वैद्यकीय मंडळ |
| ६)स्वेच्छानिवृत्तीचे देय लाभ | - रा.प.कर्मचा-यांची सेवा निवृत्ती पर्यंतची उर्वरीत सेवा विचारात घेऊन खालीलप्रमाणे आर्थिक लाभ अनुज्ञेय राहतील. |

| सेवा निवृत्तीपर्यंतची उर्वरित सेवा | लाभाची देय रक्कम |
|---|---|
| २-३ वर्षे | रु.५ लाख |
| ३-४ वर्षे | रु.६ लाख |
| ४-५ वर्षे | रु.७ लाख |
| ५ वर्षे व अधिक | रु.१० लाख |

सदर योजनेसाठी लाभाची कमाल मर्यादा रु.१० लाख राहील.

७) तसेच ज्या चालकांची वयाची ५५ वर्षे पूर्ण झाली आहेत असे चालक वैद्यकीय कारणाशिवायही स्वेच्छानिवृत्तीसाठी पात्र ठरतील. अशा चालकांना वरिल योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील.

..२..



Scanned by CamScanner

५०



२. सदर योजनेचा लाभ घेऊ इच्छिणा-या कर्मचा-यांमार्फत आलेले अर्ज कामगार शाखेमार्फत स्विकारुन त्याची स्वतंत्रपणे नोंद घेण्यात यावी. तद्नंतर सदर कर्मचारी योजनेस पात्र ठरत असल्याची खातरजमा करुन घटक संवर्ग पदातील कर्मचा-यांचे अर्ज संबंधित विभाग / घटकातील कर्मचारीवर्ग खात्याकडे व राज्यसंवर्गीय पदातील कर्मचा-यांचे अर्ज महाव्यवस्थापक (क.व औ.सं) यांचेकडे अंतिम कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावेत. सदर अर्जावर नियुक्ती प्राधिकारी अंतिम निर्णय घेतील.

३. कामगार करारातील खालील तरतुदीनुसार,रा.प.सेवेत असताना कर्मचा-यास अपंगत्व आल्यास त्याला पर्यायी नोकरीचा पर्यायही उपलब्ध राहील.

अ) कामगार करार१९९६-२००० खंड ४६ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

" ज्यांना सेवेत असताना शारिरीक अपंगत्व आले आहे व वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरविण्यात आले आहे अशा कर्मचा-यांना पर्यायी नोकरी देऊन सेवेत ठेवण्याचे काम महामंडळाने यापुर्वीच ठरविले आहे. "

ब) कामगार करार सन२००४-२००८ खंड २९ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

"दृष्टीतिक्षणता चाचणीत चालक अपात्र ठरल्याने पर्यायी नोकरीत घेतल्यास त्याचे पुर्वीचे वेतन संरक्षित करण्यात येईल. मात्र ज्या पदामध्ये पर्यायी नोकरी दिली आहे त्या पदाची वेतनश्रेणी दिली जाईल. "

४. सदर परिपत्रकीय सुचना वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांच्या सहमतीने प्रसारीत करण्यात येत आहेत.

५. सदर परिपत्रकास विभागाच्या / आगाराच्या सुचना फलकावर प्रसिध्दी देण्यात यावी तसेच सदर परिपत्रक प्रत्येक कर्मचा-याच्या निदर्शनास आणून त्याची पोच कार्यालयीन दप्तरी ठेवण्यात यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक(क.व औ.सं.)

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी /
महाव्यवस्थापक (नियोजन)/महाव्यवस्थापक ( भां.व ख.)/महाव्यवस्थापक (वाहतूक) /
महाव्यवस्थापक (यं. अ)/ उपमहाव्यवस्थापक (संगणित्र)/मुख्य विधि अधिकारी/ मुख्य स्थापत्य अभियंता /
मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिक /
मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी /कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव /उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे सचिव /मानसेवी मुख्य वैद्यकीय अधिकारी/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (घटकसंवर्ग)/(मुख्यालय)/ (प्रशासन/सा.प्रशासन/(राज्यसंवर्ग) (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/ समन्वय).

- व्यवस्थापकीय संचालक, एस.टी.को.ऑ.बॅंक, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई यांस माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.



Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ३४/२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/लैंछ/ ५४०९
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आ.ना.मार्ग,
मुंबई-४०००0८.
दिनांक:०८ ऑक्टोबर, २०१७.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-नाशिक व औरंगाबाद)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक,रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे/अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड
अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

विषय : कामाच्या ठिकाणी महिलांवर होणा-या लैंगिक अत्याचाराबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत.

संदर्भ: परिपत्रक क्र.१४/२०१७,क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/लैंछ/१८९६, दि.०६.०४.२०१७.

उपरोक्त संदर्भित परिपत्रकानुसार मध्यवर्ती कार्यालय स्तरावर महिला लैंगिक अत्याचार तक्रार निवारण यंत्रणा समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीतील सदस्य श्री.प्र.ब.पवार, मुख्य कामगार अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई हे दि.३१.०५.२०१७ रोजी रा.प.सेवेतून निवृत्त झाल्याने सदर जागा रिक्त झाली आहे. सदर रिक्त जागी श्री.स.ल.उज्जैनकर,मुख्य कल्याण अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे. तसेच समितीतील सदस्य श्री.न.रा.तिवारी, यंत्र अभियंता (चालन) मध्यवर्ती कार्यालय,मुंबई व श्री.प्र.ल.राठोड,सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई यांची अन्य विभागात बदली झाली असल्याने समितीतील रिक्त होणा-या सदस्य पदी श्री.वै.वृ.वाकोडे, यंत्र अभियंता (हं) व श्री.सु.कि.भांबळ, सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी(हं), मध्यवर्ती कार्यालय,मुंबई यांची नियुक्ती करण्यात येत असून, रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई येथे खालीलप्रमाणे अंतर्गत तक्रार निवारण समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष | श्रीमती दि.प्र.विभूते (कुंडले) | सांख्यिकी अधिकारी,मध्यवर्ती कार्यालय, मुंबई |
| २ | सदस्य सचिव | श्रीमती मं.सु.उदामले | स्वीय सहाय्यक,मध्यवर्ती कार्यालय, मुंबई |
| ३ | सदस्य | श्री.स.ल.उज्जैनकर | मुख्य कल्याण अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई |
| ४ | सदस्य | श्रीमती शिल्पा मल्होत्रा | लेखा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई |
| ५ | सदस्य | श्री.वै.वृ.वाकोडे | यंत्र अभियंता (हं) मध्यवर्ती कार्यालय,मुंबई |
| ६ | सदस्य | श्री.सु.कि.भांबळ | सहा.कर्मचारीवर्ग अधिकारी,(हं)म.का.,मुंबई. |
| ७ | सदस्य | श्रीमती दिव्या तनेजा | अशासकीय सदस्य (टाटा सामाजिक विज्ञान संस्थान, मुंबई) |

परिपत्रकाची पोहोच देण्यात यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

प्रत: माहितीसाठी सादर रवाना.
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी /उप महाव्यवस्थापक (विधी) / सचिव,म.रा.मा.प. महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / सहा.जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / मा. अध्यक्षांचे स्वीय सचिव/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) /(मुख्यालय)/ (मनुष्यबळ)/(घटकसंवर्ग)/(प्रशासन)/(सामान्य प्रशासन)/ (मावक)/ श्री.स.ल.उज्जैनकर,मुख्य कल्याण अधिकारी, रा.प.मध्यवर्ती कार्यालय,मुंबई/ श्रीमती मं.सु.उदामले, स्वीय सहाय्यक,म.का.मुंबई / श्रीमती शिल्पा मल्होत्रा, सहा.लेखाअधिकारी,म.का.मुंबई/श्री.वै.वृ.वाकोडे, यंत्र अभियंता (हं)म.का.मुंबई/ श्री.सु.कि.भांबळ,सहा.कर्मचारीवर्ग अधिकारी(हं), म.का.मुंबई/ श्रीमती दि.प्र.विभूते,सांख्यिकी अधिकारी,म.का.मुंबई/ श्रीमती दिव्या तनेजा,अशासकीय सदस्य (टाटा सामाजिक विज्ञान संस्था), व्ही.एन.परब मार्ग,देवनार,मुंबई-४०००८८.

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ३५/२०१७.

क्र.राप/कर्मवर्ग/म.ब./ ५४२९
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आ.ना. मार्ग,
मुंबई- ४०० ००८
दिनांक :०९ ऑक्टोबर, २०१७.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उप महाव्यवस्थापक(समिती क्र.१ मुंबई व पुणे )/(समिती क्र.२नाशिक व औरंगाबाद)/ (समिती क्र.३नागपूर व अमरावती).
- कार्यकारी अभियंता, रा.प.मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी-पुणे/औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/ कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/ परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ.

विषय :- प्रादेशिक कार्यालय स्तर कमी करुन त्रिस्तरीय प्रशासन प्रणाली अनुसरण्यात आल्यामुळे पुणे प्रदेशातील गोठविण्यात आलेल्या सुरक्षा रक्षक प्रवर्गाच्या ४ मंजुर पदापैकी २ पदांची मंजुरी द्वितीय आवेदन समिती व कार्यकारी अभियंता, यांच्या कार्यालयासाठी पुन:र्जिवित करण्याबाबत.

संदर्भ :- १) नियोजन वं पणन खात्याचे परिपत्रक क्र.२/२०१६ दिनांक १७.११.२०१६.
२) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१६/२०१७ दिनांक २४.४.२०१७.
३) जा.क्र.राप/विनिपु/आस्था/जी-४/७०१० दिनांक १८.८.२०१७.

***

रा.प.महामंडळामध्ये सध्या कार्यान्वित असलेल्या चार स्तरीय प्रशासन प्रणाली मधिल प्रादेशिक कार्यालय स्तर कमी करुन त्रिस्तरीय प्रशासन प्रणाली अनुसरण्याबाबत घेण्यात आलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार प्रादेशिक स्तर कमी झाल्यामुळे कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१६/२०१७ दिनांक २४.४.२०१७ अन्वये प्रादेशिक कार्यालयातील वर्ग-३ व वर्ग-४ या संवर्गातील काही पदे गोठविण्यात आली आहेत.

२) तथापि प्रादेशिक कार्यालय, पुणे येथे द्वितीय आवेदन समिती तसेच कार्यकारी अभियंता ही कार्यालये कार्यान्वित असल्याने सुरक्षा रक्षक प्रवर्गाची गोठविण्यात आलेली मंजुरी पुन:र्जिवित करुन देण्याबाबत विभाग नियंत्रक, रा.प.पुणे यांनी त्यांचे संदर्भाधीन पत्र क्र.३ अन्वये मागणी केली होती, या अनुषंगाने सादर केलेल्या प्रस्तावावर गोठविण्यात आलेल्या सुरक्षा रक्षक प्रवर्गाच्या ४ मंजुरीपैकी २ मंजुरी पुन:र्जिवित करण्याबाबत सक्षम प्राधिकारी यांनी मान्यता दिली आहे. त्यामुळे संदर्भ क्र.२ या परिपत्रकानुसार गोठविण्यात आलेल्या सुरक्षा रक्षक प्रवर्गाच्या ४ मंजुरीपैकी २ मंजुरी ही द्वितीय आवेदन समिती व कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयासाठी पुन:र्जिवित करण्यात येत असून सदर २ पदांची मंजुरी रा.प.पुणे विभागात वर्ग करण्यात येत आहे. त्याबाबतचा तपशील खालील तक्त्यानुसार देण्यात येत आहे.

-२-

Scanned by CamScanner

तक्ता

| अ. क्र. | घटकाचे नाव | पदाचे नाव | परिपत्रक क्र.२४/७८६ दि.२.७.२००५ नुसार सुधारीत मंजुरी | परिपत्रक क्र.१६/२०१७ नुसार दिनांक २४.४.२०१७ नुसार गोठविण्यात आलेली पदसंख्या | द्वितीय आवेदन समिती कार्यालय व कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयासाठी पुन:र्जिवित करण्यात आलेल्या पदांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रादेशिक कार्यालय, पुणे | सुरक्षा रक्षक | ४ | ४ | २ | सुरक्षा रक्षक प्रवर्गाची पुन:र्जिवित करण्यात आलेली २ मंजुरी ही पुणे विभागाकडे वर्ग करण्यात येत आहे. |

सुरक्षा रक्षकांची पदे पुन:र्जिवित करण्याबाबत वरीलप्रमाणे देण्यात आलेल्या सूचनांव्यतिरिक्त अन्य कोणताही बदल परिपत्रक क्र.१६/२०१७ मध्ये करण्यात आलेला नाही, याची नोंद घ्यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.**

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी, रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८ यांचे माहितीकरीता.

२) वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८ यांचे माहितीकरीता.

३) महाव्यवस्थापक(वाहतूक)/ महाव्यवस्थापक(भांवख)/ महाव्यवस्थापक(यं.अ.)/ महाव्यवस्थापक(नियप)/ उपमहाव्यवस्थापक(मावतं) / मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य कामागर अधिकारी/ मुख्य लेखा परीक्षण अधिकारी/ विधि सल्लागार /जनसंपर्क अधिकारी/ सचिव,म.रा.मा.प.महामंडळ, रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.

४) मा.अध्यक्ष यांचे स्वीय सहाय्यक/मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.

५) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ कर्मचारीवर्ग अधिकारी / सहायक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग)/(मुख्यालय)/ (घटकसंवर्ग)/ (मावक)/ (प्रशासन)/(सा.प्रशासन).

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

F:\MPP२०१७\Circular.docx

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. ३६८ /२०१७
महत्त्वाचे / तातडीचे :

क्र.राप/ कर्मवर्ग/आस्था/युआर/ ५४८०४
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक : १० .१०.२०१७.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/ धुळे/ अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/ उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

...

विषय : शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत.

संदर्भ : कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. २४/२०१७,
संदर्भ क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/३४५६, दिनांक २३.०६.२०१७.

***

शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ नुसार दरवर्षी फेब्रुवारी व ऑगस्ट सत्रामध्ये तांत्रिक व्यवसायिक व आय.टी.आय.उत्तीर्ण, कार्यशाळा शिकाऊ उमेदवारांची नेमणूक केली जाते व त्यांना शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार विद्यावेतन अदा करण्यात येते.

विद्यावेतनवाढ ही संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाद्वारा अधिसूचित अर्धकुशल कर्मचा-यांसाठी निश्चित केलेल्या किमान वेतनावर आधारित आहे. कामगार आयुक्त यांनी त्यांचे दि.२८.०१.२०१५ रोजीच्या कळविलेल्या पत्रानुसार किमान वेतन हे मुळ वेतन अधिक विशेष भत्ता एकत्रित करुन परिगणित करण्यात येते. मूळ वेतनावर दिला जाणारा विशेष भत्ता प्रत्येक सहा महिन्यानंतर बदलत असतो.

सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षणार्थी संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांचे पत्र क्र.२१/एटीएस/२०१५/प्र.क्र.१४/१७५ दिनांक १०.०९.२०१५ अन्वये किमान वेतनाच्या (Minimum Wages) दरामध्ये वेळोवेळी होणारे बदल सुधारण्यासाठी www.paycheck.in/India या संकेतस्थळावरुन अधिक माहिती उपलब्ध करुन घेण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

सदर संकेतस्थळावरुन माहिती घेतली असता दि.०१.०१.२०१७ ते ३०.०६.२०१७ या कालावधीकरिता खालीलप्रमाणे किमान वेतनाचे (Minimum Wages) दर दर्शविण्यात आले आहेत.

| अनु.क्र. | तपशिल | किमान वेतनाचे दर | |
|---|---|---|---|
| | | परिमंडळ - १ | परिमंडळ - २ |
| १. | मुळवेतन | ४६००.०० | ४४००.०० |
| २. | विशेष भत्ता | ३९२७.०० | ३९२७.०० |
| ३. | एकुण | ८५२७.०० | ८३२७.०० |

..२..

SHUF:\2017-UR\UR-Circular - 2017.docx

Scanned by CamScanner

उपरोक्त दर्शविलेल्या किमान वेतनाच्या दरानुसार रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय, श्रम व रोजगार मंत्रालय अधिसूचना भाग - II, खंड - ३, उपखंड (i) दि.२२.०९.२०१४ नुसार सुधारित दर खालीलप्रमाणे दर्शविण्यात येत आहेत.

| क्र. | वर्ष | **पूर्वीचा दर** (परिपत्रक क्र.२४/२०१७ संदर्भ क्र. राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/३४५६ दि.२३.०६.२०१७) (www.paycheck.in/India येथे दर्शविल्यानुसार) किमान वेतन = मुळ वेतन + विशेष भत्ता **परिमंडळ-१ =** मुळ वेतन रु. ४६०० + विशेष भत्ता रु.३७३२.७५ = रु.८३३२.७५ व **परिमंडळ-२ =** मुळ वेतन रु. ४४०० + विशेष भत्ता रु.३७३२.७५ =रु. ८१३२.७५ (विशेष भत्ता दि.०१.०७.२०१६ ते ३१.१२.२०१६ कालावधीकरीता www.paycheck.in/India येथे दर्शविल्यानुसार) याप्रमाणे निश्चित केलेल्या किमान वेतनाच्या दरानुसार | | **सुधारित दर** (www.paycheck.in/India येथे दर्शविल्यानुसार) किमान वेतन = मुळ वेतन + विशेष भत्ता **परिमंडळ-१ =** मुळ वेतन रु. ४६०० + विशेष भत्ता रु. ३९२७.०० = रु.८५२७.०० व **परिमंडळ-२ =** मुळ वेतन रु. ४४०० + विशेष भत्ता रु. ३९२७.०० =रु. ८३२७.०० (विशेष भत्ता दि.०१.०१.२०१७ ते ३०.०६.२०१७ कालावधीकरीता www.paycheck.in/India येथे दर्शविल्यानुसार) याप्रमाणे निश्चित केलेल्या किमान वेतनाच्या दरानुसार **सुधारित दर (रुपयामध्ये)** | |
|---|---|---|---|---|---|
| | | **परिमंडळ - १** | **परिमंडळ - २** | **परिमंडळ - १** | **परिमंडळ - २** |
| १ | **पहिले वर्ष** | किमानवेतन रु. ८३३२.७५ च्या ७०% = रु.५८३२.९२ | किमानवेतन रु.८१३२.७५ च्या ७०% = रु.५६९२.९२ | किमानवेतन रु. ८५२७.०० च्या ७०% = रु.५९६८.९० | किमानवेतन रु.८३२७.०० च्या ७०% = रु.५८२८.९० |
| २ | **दुसरे वर्ष** | किमानवेतन रु. ८३३२.७५ च्या ८०% = रु.६६६६.२ | किमानवेतन रु.८१३२.७५ च्या ८०% = रु.६५०६.२ | किमानवेतन रु. ८५२७.०० च्या ८०% = रु.६८२१.६० | किमानवेतन रु.८३२७.०० च्या ८०% = रु.६६६१.६० |
| ३<br>४ | **तिसरे वर्ष**<br>**चौथे वर्ष** | किमानवेतन रु. ८३३२.७५ च्या ९०% = रु.७४९९.४७ | किमानवेतन रु.८१३२.७५ च्या ९०% = रु.७३१९.४७ | किमानवेतन रु. ८५२७.०० च्या ९०% = रु.७६७४.३० | किमानवेतन रु.८३२७.०० च्या ९०% = रु.७४९४.३० |

** परिमंडळ १ - महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगर पालिका व 'अ' वर्ग नगरपालिका क्षेत्रांचे मिळून होईल.

** परिमंडळ २ - परिमंडळ एक वगळून राज्याच्या उर्वरित क्षेत्राचे मिळून होईल.



Scanned by CamScanner

सदर अधिसुचनेमध्ये असे नमुद केले आहे की, जर एखाद्या संबंधीत राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाद्वारा एखाद्या व्यवसायासाठी किमान वेतनाचा दर ठरवून दिला नसेल तर अशावेळी या व्यवसायातील विद्यावेतन अदा करताना त्या संबंधीत राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाद्वारा अर्धकुशल कर्मचा-यांसाठी अधिसूचीत केलेल्या अनुसूचीत रोजगारातील जास्तीत जास्त किमान वेतन विचारात घेण्यात यावे. तसेच, सदर अधिसुचनेमध्ये अधिनियम धारा -६ मधील खंड -क मध्ये नमुद केलेल्या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारांनी जर राष्ट्रीय परिषदेने मान्य केलेल्या कोणत्याही विद्यालय किंवा अन्य संस्थामध्ये घेतलेला प्रशिक्षणार्थीचा कालावधी विद्यावेतन अदा करताना विचारात घेण्यात यावा असे नमुद केले आहे.

वर नमुद केल्याप्रमाणे, सुधारित दराने विद्यावेतन अदा करताना अदा केलेले विद्यावेतन व सुधारीत दराने देय होणारे विद्यावेतन यातील फरकाची रक्कम शिकाऊ उमेदवारांना अदा करावी. विद्यावेतन अदा करताना याची पूर्णपणे पडताळणी करुन व लेखा परिक्षण करुनच शिकाऊ उमेदवारांना विद्यावेतन अदा करावे. अतिरिक्त विद्यावेतन अदा केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी संबंधित विभाग/घटकाची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

तरी, वर दर्शविलेल्या तारखेपासून सुधारीत दराने विद्यावेतन अदा करण्यात यावे.

सदर परिपत्रक वित्त व लेखा खात्याच्या सहमतीने प्रसृत करण्यात येत आहे.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क. व औ.सं.)

प्रत रवाना : मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां.व ख)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) महाव्यवस्थापक (यं.अ.) / मुख्य विधी अधिकारी/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्र.१ - मुंबई-पुणे, नियंत्रण समिती क्र.२ - नाशिक - औरंगाबाद, नियंत्रण समिती क्र.३ - अमरावती - नागपूर / मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/ मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / स.क.अ. (मुख्यालय) / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन यांस माहितीसाठी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क. व औ.सं.)

SH/F:\2017- UR\UR-Circular - 2017.docx

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. ३८/२०१७.

जा.क्र.राप/कर्मवर्ग/म.ब./ ५८३८
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आ.ना. मार्ग,
मुंबई- ४०० ००८
दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उप महाव्यवस्थापक(समिती क्र. १ मुंबई व पुणे )/(समिती क्र. २नाशिक व औरंगाबाद)/ (समिती क्र. ३नागपूर व अमरावती).
- कार्यकारी अभियंता, रा.प.मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी-पुणे/औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक,
  रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/
  कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
  परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ.

विषय : -मेस्कोकडून तसेच जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाकडून कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन घेण्याबाबत करावयाची कार्यवाही.

संदर्भ :- १) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.२०/१९९९ दिनांक १५.६.१९९९.
२) परिपत्रक क्र. २५/२००६ क्र.राप/कर्मवर्ग/मनुष्यबळ/सुरक्षा रक्षक/४६६८ दि.१०.१०.२००६.
३) परिपत्रक क्र.१३/२०११क्र.राप/कर्मवर्ग/मनुष्यबळ/५५०२ दि.१८.११.२०११.
४) परिपत्रक क्र.१२/२०१३क्र.राप/कर्मवर्ग/मनुष्यबळ/४८८३ दि.२५.१०.२०१३.
५) परिपत्रक क्र.३४/२०१६क्र.राप/कर्मवर्ग/म.ब./६४३३ दि.२९.१२.२०१६.

***

रा.प.महामंडळाच्या मालमत्तेच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने पदांच्या आढाव्याअंती दिलेली मंजुरी व त्यानुसार करण्यात आलेली नियुक्ती विचारात घेता, रिक्त असलेल्या पदांच्या संख्येइतके माजी सैनिक सुरक्षा रक्षक कंत्राटी पध्दतीने मेस्कोकडून (मुंबई व ठाणे विभाग वगळता ) उपलब्ध करुन घेण्याबाबत संदर्भित कर्मचारीवर्ग खाते परिपत्रकान्वये स्वयंस्पष्ट व सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत.

२) तसेच महामंडळ ठराव क्र.२०१६:०४:१८ दिनांक १.४.२०१६ नुसार पारित करण्यात आलेल्या ठरावांच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय बसस्थानकासाठी कंत्राटी पध्दतीने माजी सैनिक सुरक्षा रक्षकांची सेवा उपलब्ध करुन घेण्यासाठी कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.३४/२०१६ क्र.राप/कर्मवर्ग/म.ब./६४३३ दि.२९.१२.२०१६ अन्वये अतिरिक्त मंजुरी देण्यात आली आहे.

३) रा.प.महामंडळामध्ये सध्या सुरक्षा रक्षक पदी रिक्त असलेल्या जागा, सुरक्षिततेचा उपाय म्हणून, शासनाच्या सूचनेनुसार शासनमान्य माजी सैनिक महामंडळाकडून कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षकांची सेवा उपलब्ध करुन घेण्याबाबत उपरोक्त परिपत्रकाद्वारे वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत. सदर सूचनांमध्ये जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या कार्यक्षेत्रांतर्गत समाविष्ट असलेल्या विभागांना, जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळास प्रथम प्राधान्य देण्याबाबत सूचना दिल्या होत्या. मात्र, जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या प्रतिक्षा यादीवर माजी सैनिक सुरक्षा रक्षकांची नोंदणी झाली नसल्यास जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाकडून माजी सैनिक सुरक्षा रक्षकांची उपलब्धता करुन देण्यास विलंब होतो. तसेच जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाकडे माजी सैनिक सुरक्षा रक्षक उपलब्ध नसल्यामुळे अन्य संस्थेकडून माजी सैनिक सुरक्षा रक्षकांची उपलब्धता करुन घेण्यासाठी रा. प. महामंडळास आवश्यक असलेले

-२-

Scanned by CamScanner

ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी येत होत्या. याबाबत ब-याच विभागाकडून या कार्याल... मार्गदर्शनासाठी संदर्भ केले जातात परिणामत: सुरक्षा रक्षकांची उपलब्धता करुन घेण्यास वेळेचा अपव्यय होत... परंतु महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित, पुणे या संस्थेस शासनमान्यता देण्यात आली असून ... आस्थापनांमध्ये सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करताना त्यांना महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या कलम २३ अंतर्गत सूट देण्याबाबतच्या प्रस्तावास उद्योग, ऊर्जा व काम... विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक २२.१०.२०१४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे सूट दिली आहे. त्या... महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियमाच्या अंमलबजावणीतून सूट ... असल्याने यापुढे महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित, पुणे या संस्थेकडून महामंडळासाठी सुरक्षा रक्ष... सेवा उपलब्ध करुन घेताना जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाचा 'ना हरकत दाखला ' घेण्याची आवश्यकता राहणार ना...

४) तरी वरील तरतूदी विचारात घेता, रा.प.महामंडळामध्ये शासनमान्य माजी सैनिक महामंडळा... कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षकांची सेवा उपलब्ध करुन घेताना यापूर्वी देण्यात आलेल्या सूचनांनुसार महामंडळा... कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकांची संख्या व कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या सुरक्षा रक्षकांची संख्या मंजूर संख्ये... जास्त होणार नाही, याबाबत दक्षता घेऊन सुरक्षा रक्षकांची सेवा उपलब्ध करुन घेण्याबाबत कार्यवाही करण्यात या...

५) सदर परिपत्रक प्रसारीत करण्यात येणा-या तारखेपासुन सदर परिपत्रकातील दिलेल्या सूच... अंमलबजावणी करावी. सदरचे परिपत्रक मा.मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी यांच्या सहमतीने तसेच मा.उपाध्य... व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने प्रसारीत करण्यात येत आहे.

परिपत्रकाची पोच देण्यात यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.प्र औ.सं.)

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी, रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८ यांचे माहितीकरीता.
२) वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८ यांचे माहितीकरीता.
३) महाव्यवस्थापक(वाहतूक)/ महाव्यवस्थापक(भांवख)/ महाव्यवस्थापक(यं.अ.)/ महाव्यवस्थापक(निवप)/ उपमहाव्यवस्थापक(मावतं) / मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य कामागार अधि... मुख्य लेखा परीक्षण अधिकारी/ विधि सल्लागार /जनसंपर्क अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प.महामंडळ, रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.
४) मा.अध्यक्ष यांचे स्वीय सहाय्यक/मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.
५) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ कर्मचारीवर्ग अधिकारी / महाव्य... कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग)/(मुख्यालय)/ (घटकसंवर्ग)/ (मावक)/ (प्रशासन)/(सा.प्रशासन).

F:\MPP२०१७\Circular.docx

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.३८/२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/... ९०७९
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आ.ना.मार्ग,
मुंबई-४००००८.
दिनांक: १३ नोव्हेंबर, २०१७.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-नाशिक व औरंगाबाद)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक,रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड
अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

विषय : अपहार प्रवण असलेल्या वाहकांच्या बदली धोरणाबाबत.
संदर्भ: परिपत्रक क्र.०२/२०१७,क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/६७४ दि.०१.०२.२०१७.

अपहार प्रवण असलेल्या वाहकांवर अपहार प्रकरणात शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात येत असूनही अपहार प्रकरणांची संख्या कमी न झाल्याने अशा अपहारप्रवण वाहकांना आळा घालण्यासाठी सदर वाहकांची त्यांनी केलेल्या अपहार प्रकारानुसार बदलीची कार्यवाही करणेबाबत संदर्भित परिपत्रकान्वये अपहार प्रवण असलेल्या वाहकांच्या चतुर्थ व त्यानंतरच्या प्रमाद प्रकरणी संबंधित प्रदेशामधील अन्य विभागामध्ये बदली करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

२. तथापि मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी दिलेल्या निदेशानुसार अपहार प्रवण असलेल्या वाहकांच्या चतुर्थ व त्यानंतरच्या अपहार प्रकरणी ज्या प्रदेशामधील विभागामध्ये कसुरदार वाहक कार्यरत असेल, त्या प्रदेशाच्या शेजारच्या प्रदेशामधील जवळील विभागात संबंधीत विभाग नियंत्रक यांनी सदर वाहकाची बदली करावी. असे प्रस्ताव यापुढे मध्यवर्ती कार्यालयाकडे पाठविण्यात येऊ नयेत.

३. अशी बदली करताना सदर वाहकास त्याच्या मूळ गावी बदली मिळणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

या व्यतिरीक्त संदर्भित परिपत्रकामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

वरील सूचनांची अंमलबजावणी करावी व परिपत्रकाची पोच द्यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत: माहितीसाठी सादर रवाना.**

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी /उप महाव्यवस्थापक (विधी) / सचिव,म.रा.मा.प. महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / सहा.जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / मा. अध्यक्षांचे स्वीय सचिव/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) /(मुख्यालय)/ (मनुष्यबळ)/(घटकसंवर्ग)/(प्रशासन)/(सामान्य प्रशासन)/ (मावक)

Scanned by CamScanner

परिपत्रक क्र.३९/२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/ ६२३६
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-८.
दिनांक:22 नोव्हेंबर, २०१७.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय,पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक,रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/ नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी / नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषयः खाजगी रुग्णालयांना रा.प.महामंडळाच्या नामिकेवर (Panel) घेण्याबाबत.**

**संदर्भः परिपत्रक क्र.९/८७ जावक क्र.राप/कर्मवर्ग/६०१-वै/२२५८ दिनांक २३.०४.१९८७.**

---------

उपरोक्त संदर्भित परिपत्रकानुसार भाग-२, अंतर्गत येणा-या गंभीर आजारांवरील उपचाराकरिता येणा-या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत रा.प.महामंडळाच्या नामिकेवर (Panel) घेण्यात आलेल्या रुग्णालयांची नावे नमुद करण्यात आलेली आहेत. सदर यादीमध्ये खालील खाजगी रुग्णालयांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या आजाराकरिता C.G.H.S. च्या दराने उपचार करण्यासाठी सक्षम प्राधिकारी यांनी मान्यता दिली आहे.

| क्र. | रुग्णालयाचे नांव व पत्ता | आजाराचे स्वरुप | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | शुश्रुषा हार्ट केअर सेंटर ॲण्ड स्पेशालिटी हॉस्पीटल, प्लॉट नं.२२-अे,फेज-३, पाम बिच रोड,सेक्टर ६,नेरुळ, नवी मुंबई-४०० ७०६. | ह्दय शस्त्रक्रियेची प्रकरणे, ह्दय उपमार्ग शस्त्रक्रिया व ॲन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया | ०२२-६४५९६६६१-८० |
| २ | एच.जे.दोशी घाटकोपर हिंन्दू सभा हॉस्पीटल, कार्डीॲक सेट-अप मॅनेज्ड बाय पॅरीसोहा फाऊंडेशन प्रा.लि., श्रध्दानंद रोड,रेल्वे स्टेशन जवळ, घाटकोपर (पश्चिम) मुंबई-४०० ०८६. | ह्दय शस्त्रक्रियेची प्रकरणे, ह्दय उपमार्ग शस्त्रक्रिया व ॲन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया | ०२२-२५११३९७७/ २५१२३९७७ |
| ३ | महालक्ष्मी ह्दयालय प्रा.लि., (श्री साई कार्डीॲक सेंटर) २०२१/बी,'ई' वॉर्ड,६ वी लेन,राजारामपूरी, कोल्हापूर-४१६ ००८. | ह्दय शस्त्रक्रियेची प्रकरणे, ह्दय उपमार्ग शस्त्रक्रिया व ॲन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया | (०२३१) २५२२८९२/ ९३/९४/९५ |
| ४ | स्वस्तीक हॉस्पीटल, प्लॉट नं.२९,साई दर्शन हॉटेलच्या मागे, ताराराणी चौक,'ई' वॉर्ड, कोल्हापूर-४१६ ००३. | ह्दय शस्त्रक्रियेची प्रकरणे, ह्दय उपमार्ग शस्त्रक्रिया, ॲन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया व कर्करोग | (०२३१) २५३५३७३ मोबाईल ९६६५२२००९६ ९३७०४१२२३३ |

क्र.मा.प.

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | श्री साईबाबा हार्ट इन्स्टिटयूट ॲण्ड रिसर्च सेंटर, कालिदास कला मंदीर जवळ, शालीमार, नाशिक-४२२ ००२. | हृदय शस्त्रक्रियेची प्रकरणे, हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया व ॲन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया | (०२५३) २५०७००१/ ०२/०४/०५ मोबाईल ९१५८८८७५५४ |
| ६ | ऑर्कीड मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल, २७१-२७२(पी), जिल्हा पेठ, जळगाव-४२५ ००१. | हृदय शस्त्रक्रियेची प्रकरणे, हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया व ॲन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया | (०२५७) २२२९७४९ / २२२८९६९ |
| ७ | संजीवन मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल ॲण्ड रिसर्च सेंटर, रतनलाल प्लॉट, महादेव मंदीर रोड, यवतमाळ-४४५ ००१. | ॲन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया व कर्करोग | ०७२३२-२५६६०१/०९ |
| ८ | श्रीकृष्ण हृदयालय व क्रिटीकल केअर सेंटर, टिकेकर रोड, कॉंग्रेस नगर स्क्वेअर, धंतोली, नागपूर-४४० ०१२. | हृदय शस्त्रक्रियेची प्रकरणे, हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया व ॲन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया | २४४४४३४/ २४४२१३६ |

उपरोक्त रुग्णालयात रा.प.कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियानी उपचार करुन घेतल्यास त्यांना C.G.H.S (Central Government Health Scheme) च्या प्रचलित दराप्रमाणे वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करावी.

सदर परिपत्रक सर्व अधिकारी / कर्मचारी व मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणावे. सदर परिपत्रक वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांचे सहमतीने प्रसारीत करण्यात येत आहे. सदर परिपत्रक प्रसारीत केलेल्या दिनांकापासून लागू करण्यात येत आहे.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार / सचिव, म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(सेवामंडळ)/मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी(सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

Scanned by CamScanner

परिपत्रक क्र. ४०/२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/ 6234
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-८.
दिनांक: २२ नोव्हेंबर, २०१७.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /
नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय: गजानन हार्ट हॉस्पीटल, जळगाव या रुग्णालयाची मान्यता रद्द करण्याबाबत.**

**संदर्भ: क्र.राप/कर्मवर्ग/४५८९ दि.०३.११.२०१०**
**परिपत्रक क्र.२६/२००६ दि.३१.१०.२००६.**

---------

उपरोक्त संदर्भित पत्रानुसार गजानन हार्ट हॉस्पीटल, जळगाव या रुग्णालयास ह्दयावरील शस्त्रक्रिया व उपचारासाठी पाच वर्षांकरिता रा.प.महामंडळाच्या नामिकेवर (Panel) घेण्यात आले होते. तथापि सदर रुग्णालयाने या कार्यालयाकडे रा.प.महामंडळाच्या नामिकेवर (Panel) घेण्यासाठी दिलेल्या नवीन प्रस्तावास सक्षम प्राधिकारी यांनी मान्यता न दिल्याने या रुग्णालयाचे नाव रा.प.महामंडळाच्या तासीकेवरुन (Panel) कमी करण्यात येत आहे.

तरी सदर परिपत्रक प्रसारीत झाल्याच्या तारखेपासून गजानन हार्ट हॉस्पीटल, जळगाव रुग्णालयाची मान्यता रद्द करण्यात येत आहे. मात्र येथे स्पष्ट करण्यात येते की, ज्या कर्मचारी अथवा अधिका-यांनी परिपत्रक प्रसारीत करण्याच्या तारखेपूर्वीच सदर रुग्णालयात ह्दय विकारावरील शस्त्रक्रिया व उपचारासाठी उपचार सुरु केले असतील किंवा अग्रिम घेतला असेल तरी अशी बिले गजानन हार्ट हॉस्पीटल, जळगाव या रुग्णालयाच्या पूर्वीच्या नियमानुसार मंजूर करावयाची आहेत.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (का व औ.सं)

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार / सचिव, म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(सेवामंडळ)/मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी(सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. ७९ /२०१७

क्र. राप/ कर्मवर्ग/घटकसंवर्ग/ ६४०६
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक : ०६ डिसेंबर, २०१७.

प्रति,

- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा दापोडी, पुणे./औरंगाबाद /नागपूर.
- विभाग नियंत्रक,
  रा.प.मुंबई/ पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदूर्ग/ ठाणे/ नाशिक/ जळगांव/ धुळे/अहमदनगर/ पुणे/ कोल्हापूर/ सांगली/ सातारा/ सोलापूर/ औरंगाबाद/ बीड/ जालना/ लातूर/ नांदेड/उस्मानाबाद/ परभणी/ नागपूर/ भंडारा/ चंद्रपूर/ गडचिरोली/ वर्धा/ अमरावती/ अकोला/ बुलडाणा/ यवतमाळ.

विषयः- सरळसेवा भरती सन २०१६-२०१७ अंतर्गत सहाय्यक [कनिष्ठ] पदाच्या भरतीबाबत.

महाव्यवस्थापक [यंअ] यांनी त्यांचे पत्र क्र.राप/यंअ/एसटी-एफ/भरती/४७०४, दिनांक ११.११.२०१६ नुसार सरळसेवा भरती अंतर्गत जाहिरात प्रसारित करण्याकरीता सहाय्यक पदाकरीता शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर आवश्यक अर्हताबाबत कळविले होते. त्यानुसार सरळसेवा भरती सन २०१६-२०१७ अंतर्गत जाहिरात क्र.२/२०१७ प्रसारित करताना सहाय्यक [कनिष्ठ] पदाकरीता शैक्षणिक अर्हता / अनुभव व इतर आवश्यक अर्हता यांचा समावेश करण्यात आला होता.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने सध्या सुरु असलेल्या भरती प्रक्रियेअंतर्गत काही विभागांकडून उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेमधील काही व्यवसायाबाबत तसेच उच्च शैक्षणिक अर्हता असलेल्या उमेदवारांना पात्र / अपात्र ठरविण्याबाबत मार्गदर्शन मागविले आहे त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

सरळसेवा भरती सन २०१६-२०१७ अंतर्गत करावयाच्या सहाय्यक [कनिष्ठ] पदाच्या भरतीबाबत जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता तसेच खालील शैक्षणिक अर्हता प्राप्त असलेल्या उमेदवारांचा सहाय्यक [कनिष्ठ] या पदासाठी विचार करण्याबाबत मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी मान्यता दिली आहे.

१. शासन निर्णय क्र.आयटीआय-२०१५ /प्र.क्र.१५१/व्यशि-३,दिनांक ०१.०७.२०१५ मधील परिशिष्ट 'अ' नुसार सीओई सेक्टर मधील ट्रेड हे आयटीआयच्या कोणत्या व्यवसायाशी (trade) समकक्ष असतील अशा सर्व ट्रेडचा विचार करण्यास हरकत नाही.
२. पदविका, पदवी धारकाची शैक्षणिक अर्हता ही आयटीआय पेक्षा वरच्या दर्जाची असल्यामुळे त्यांचे अर्ज ग्राह्य धरण्यात यावेत.

वर नमूद केलेली शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या ज्या उमेदवारांना यापूर्वी कागदपत्र छाननीमध्ये आपल्या विभागीय समितीने अपात्र ठरविले आहे त्यांचा, ते इतर सर्व अर्हता व अटी पूर्ण करीत असल्यास विभागीय समितीकडून पात्र करुन घेण्यात यावे.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक [क.व.औ.स]

सोबतः शासन निर्णय.

प्रत माहितीसाठी अग्रेषित :
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां.व ख)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) महाव्यवस्थापक (यं.अ.) / मुख्य विधी अधिकारी/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्र.१ - मुंबई-पुणे, नियंत्रण समिती क्र.२ - नाशिक - औरंगाबाद, नियंत्रण समिती क्र.३ - अमरावती - नागपूर / मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/ मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / स.क.अ. (मुख्यालय) / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन.

SH\F:\2017- UR\UR -Division Letters - 2017.docx

Scanned by CamScanner

Center of Excellence या योजनेअंतर्गत सुरू असलेले व्यवसाय अभ्यासक्रम शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत (CTS) येणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमांशी समकक्ष ठरविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः आयटीआय-२०१५/प्र.क्र. १५१/व्यशि-३
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०९ जुलै, २०१५

संदर्भ :

१) डी.जी.ई.टी., नवी दिल्ली यांचे क्रमांक. DGET-१९/०६/२०१४-CD, दि. ०६ जून, २०१४ चे पत्र
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. आयटीआय-२०१४/प्र.क्र. ९४/ व्यशि-३, दि. ०३ जुलै, २०१४
३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. आयटीआय-२०१४/प्र.क्र. ९४/ व्यशि-३, दि. १५ जून, २०१५.
४) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक : २०/सीटीएस/ २०१४/ ४९२, दि. ०३.१२.२०१४

प्रस्तावना :

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून दिले जाणारे व्यवसाय प्रशिक्षण कारखान्यातील तंत्रज्ञानाच्या गरजेशी सुसंगत होण्यासाठी व कौशल्ययुक्त जागतिक दर्जाचे मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी कारखाने/औद्योगिक संघटना यांच्या सहकार्याने केंद्र शासनाने सन २००५ या वर्षापासून देशातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जा उंचावून त्यांना सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये रूपांतरीत करण्याची योजना सुरू केली होती. केंद्र शासनाच्या सदर योजनेनुसार राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये Center of Excellence (COE) ही बहुकौशल्यावर आधारित योजना सुरू करण्यात आली होती.

डी.जी.ई.टी., नवी दिल्ली यांच्या संदर्भीय (१) येथील पत्रास अनुसरून संचालनालयाने सादर केलेला प्रस्ताव विचारात घेवून संदर्भीय (२) येथील शासन निर्णयान्वये शासकीय औ. प्र. संस्थांमध्ये, Center of Excellence (COE) बेसिक मॉडयुलच्या (COE Chemical आणि COE Plastic Processing वगळता) संलग्नता प्राप्त ५४० तुकडयांना शैक्षणिक वर्ष सन २०१४-१५ पासून शिल्पकारागीर प्रशिक्षण (CTS) योजनेअंतर्गत येणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमात रूपांतर (convert) करण्यास मान्यता देण्यांत आली आहे. तसेच संदर्भीय (३) येथील शासन निर्णयान्वये संलग्नता प्राप्त Broad Base Basic Training Modules चे Chemical आणि Plastic Processing Sector व Advance Modules चे CTS अंतर्गत रूपांतरीत करण्यास मान्यता देण्यांत आली आहे.

त्या अनुषंगाने संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी संदर्भीय (४) येथील पत्रान्वये COE योजनेंतर्गत असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांना CTS अंतर्गत

Scanned by CamScanner

येणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमाशी समकक्ष ठरविण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाल्यास सन २००५ पासून COE उत्तीर्ण उमेदवारांना राज्यातील विविधि आस्थापनांमध्ये तसेच शासकीय/ निमशासकीय औद्योगिक आस्थापनांमध्ये/महामंडळामध्ये रोजगाराच्या संधी निर्माण होण्याचा मार्ग सुकर होईल असे संचालनालयाने स्पष्ट केले आहे. त्यानुसार Center of Excellence या योजनेअंतर्गत सुरू असलेले व्यवसाय अभ्यासक्रम शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत (CTS) येणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमांशी समकक्ष ठरविणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :**

वरील पार्श्वभूमीवर Center of Excellence या योजनेअंतर्गत सुरू असलेले व्यवसाय अभ्यासक्रम शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत (CTS) येणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमांना परिशिष्ट- "अ" मध्ये दर्शविल्यानुसार समकक्षता देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. प्रस्तुत व्यवसाय अभ्यासक्रमासंदर्भात कार्यवाही करतांना केंद्र शासन व डी.जी.ई.टी., नवी दिल्ली यांच्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संचालनालयाची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०७०९१२३३४५९५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vivek Madhav Patil

Digitally signed by Vivek Madhav Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=841bf2ba2d65f151b54b6b93f5088959 [illegible], cn=Vivek Madhav Patil
Date: 2015.07.09 12:35:02 +05'30'

(विवेक मा. पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
३. मा.प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक,
४. सह सचिव (व्यशि) उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
५. संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/ औरंगाबाद/अमरावती/नागपूर. (संचालनालयामार्फत)
७. महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी, (संचालनालयामार्फत)
११. सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, (संचालनालयामार्फत)
१२. संबंधित प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, (संचालनालयामार्फत)
१३. निवड नस्ती (व्यशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned by CamScanner

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : आयटीआय-२०१५/प्र.क्र. १५१/व्यशि-३, दिनांक : ०९ जुलै, २०१५ सोबतचे

परिशिष्ट- "अ"

| Sr. No. | COE Sector | | Equitant Trades |
|---|---|---|---|
| 1 | Apparel | 1 | Fashion Design & Technology |
| 2 | Automobile | 1 | Mechanic Motor Vehicle |
| | | 2 | Mechanic Diesel |
| 3 | Chemical | 1 | Attendant Operator in Chemical Plant |
| | | 2 | Maintenance Mechanic in Chemical Plant |
| | | 3 | Instrument Mechanic in Chemical Plant |
| 4 | Information Technology | 1 | Computer Operator & Programing Assistance |
| | | 2 | Information & Communication Technology System Maintenance |
| 5 | Electrical | 1 | Wireman |
| | | 2 | Electrician |
| 6 | Electronics | 1 | Electronics Mechanic |
| 7 | Industrial Automation Sector | 1 | Fitter |
| | | 2 | Electronics Mechanic |
| | | 3 | Electrician |
| 8 | Hospitality | 1 | Craftsman Food Production (General) |
| | | 2 | Food & Beverage Service Assistant |
| | | 3 | Housekeeper |
| 9 | Production & Manufacturing | 1 | Welder |
| | | 2 | Fitter |
| | | 3 | Machinist |
| | | 4 | Machinist Grinder |
| | | 5 | Turner |
| 10 | Construction & Wood Working | 1 | Carpenter |
| | | 2 | Mason ( Bldg. Contractor) |
| 11 | Plastic Processing Operator | 1 | Plastic Processing Operator |
| 12 | Refrigeration & Air Conditioning | 1 | Mech. Refrigeration & Air Conditioning |
| 13 | Fabrication & Fitting & Wearing) | 1 | Fitter |
| | | 2 | Welder |
| 14 | Textile Technology | 1 | Spinning Technician |
| | | 2 | Weaving Technician |
| | | 3 | Textile Wet Processing Technician |

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.५२/२०१७

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई (१)/ E५६८
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई- ४००००८
दिनांक :- ०७ ~~नोव्हेंबर~~ डिसेंबर, २०१७.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प. प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/नांदेड/
  अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/
  उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय:- अखिल भारतीय सेवेतील, राज्य सेवेतील तसेच सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे इत्यादींचे अधिकारी/पदाधिकारी यांच्या विदेश दौ-यासंबंधीचे निकष,सुचना व कार्यपध्दती --- एकत्रित आदेश.

संदर्भ:- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.परदौ-१४१४/प्र.क्र.-४६ /का-१८ दिनांक २९.१२.२०१४

संदर्भित शासन परिपत्रकान्वये अखिल भारतीय सेवेतील,राज्य सेवेतील तसेच सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे इत्यादींचे अधिकारी/पदाधिकारी यांच्या विदेश दौ-यासंबंधीचे निकष,सुचना व कार्यपध्दती यासंदर्भात सुचना प्रसारीत करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन परिपत्रक सोबत जोडण्यात येत असून शासन परिपत्रकामधील तरतुदीनूसार उपरोक्त विषयासंदर्भात कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रकामधील विहित तरतुदी विचारात घेउन रा.प.महामंडळातील अधिकारी व कर्मचारी यांना विदेश दौ-यांवर पाठवण्याबाबत विभाग/घटक प्रमुखांना खालीलप्रमाणे कार्यवाही करणेबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१) शासन परिपत्रकामधील विहित तरतुदींनुसार विभागीय/घटक स्तरावरील अशा प्रकारचे प्रस्ताव मध्यवर्ती कार्यालयाकडे किमान एक महिना अगोदर पाठविण्यात यावे.

२) अशा प्रकारचे प्राप्त झालेले वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचा-यांच्या प्रस्तावाबाबत कर्मचारीवर्ग खात्यामार्फत कार्यवाही करणेत येईल व अधिकारी वर्गाच्या प्रस्तावाबाबत नियोजन व पणन खात्यामार्फत कार्यवाही करण्यात येईल.

३) अधिकारी व कर्मचारी यांचा एकाच विषयासंदर्भात एकत्रित दौरा असल्यास त्याबाबतच्या एकत्रित प्रस्तावावर नियोजन व पणन खात्यामार्फत कार्यवाही करण्यात येईल.

उपरोक्त सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. अन्यथा संबंधितांवर शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

सोबत- संदर्भित शासन परिपत्रक

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :**
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी /
महाव्यवस्थापक (नियोजन)/महाव्यवस्थापक (भां.व ख.)/महाव्यवस्थापक (वाहतूक) /
महाव्यवस्थापक (यं. अ)/ उपमहाव्यवस्थापक (संगणित्र)/मुख्य विधि अधिकारी/ मुख्य स्थापत्य अभियंता /
मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिक /
मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी /कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव /उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे सचिव /मानसेवी मुख्य वैद्यकीय अधिकारी/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (घटकसंवर्ग)/(मुख्यालय)/(प्रशासन/सा.प्रशासन/(राज्यसंवर्ग)(मागासवर्ग)/ ( मनुष्यबळ नियोजन/ समन्वय).



Scanned by CamScanner

**अखिल भारतीय सेवेतील, राज्य सेवेतील तसेच सार्वजनिक उपक्रम, मंडळे , महामंडळे इत्यादींचे अधिकारी/पदाधिकारी यांच्या विदेश दौऱ्यासंबंधीचे निकष, सूचना व कार्यपद्धती---- एकत्रित आदेश**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्र.परदौ- १४१४/प्र.क्र.४६/११

मंत्रालय, मुंबई-४०००३२

दिनांक: २९ डिसेंबर, २०१४

**वाचा:**

१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- सीडीआर-१०८३/११९/९९/अकरा, दिनांक २६ ऑक्टोबर, १९८३
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०८४/२२०२/४८-अकरा, दिनांक ०४ डिसेंबर, १९८४
३) शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: सीडीआर-१०८४/१४९८/२८/अकरा, दिनांक २० ऑगस्ट, १९८४
४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०८५/४६/३३/अकरा, दिनांक २१ ऑगस्ट, १९८६
५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: सीडीआर-११९१/१८१/४/९१/११, दिनांक ०८ फेब्रुवारी, १९९१
६) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०९४/प्रकरण-३/९४/अकरा, दिनांक ३० मार्च, १९९४
७) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक टीआरएन. ११९५/प्र.क्र. ६/ ९५/दहा, दिनांक २० जानेवारी, १९९५
८) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०९६/८७/प्र.क्र.४/९६/अकरा, दिनांक ६ एप्रिल, १९९६
९) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- सीडीआर-१०९६/प्रकरण-२३/९६/अकरा, दिनांक २२ मे, १९९६
१०) शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:- सीडीआर-१०९६/८७/प्र.क्र.४/९६/११, दिनांक ४ सप्टेंबर, १९९६
११) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०९६/८७/प्र.क्र.४/९६/अकरा, दिनांक २४ऑक्टोबर,१९९६
१२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- सीडीआर-१०९६/२२४/प्र.क्र.१५/९६/११, दिनांक १३ नोव्हेंबर,१९९६
१३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: सीडीआर.१०९६/८७/प्र.४/९६/११, दिनांक ३१ डिसेंबर, १९९६
१४) शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: सीडीआर-१०९६/८७/प्र.क्र.४/९६/११, दिनांक ११ एप्रिल, १९९७
१५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :सीडीआर-१०९६/८७/प्र.क्र.४/९६/११, दिनांक ११ ऑगस्ट, १९९७
१६) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- सीडीआर-२००१/प्र.क्र.१२/०१/अकरा, दिनांक ३ नोव्हेंबर, २००१
१७) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक सीडीआर-१००६/प्र.क्र.९/०६/११, दिनांक १५ जून, २००६
१८) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: सीडीआर-१०१०/प्र.क्र ९/१०/११, दिनांक १८ मार्च, २०१०
१९) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :संकीर्ण-१०११/प्र.क्र.६९/११, दिनांक ०७ जुलै, २०११
२०) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: परदौ-१४१३/प्र.क्र.७१/का. ११, दिनांक २९ ऑक्टोबर, २०१३

## परिपत्रक

अखिल भारतीय सेवेतील, राज्य सेवेतील तसेच सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे इत्यादींचे अधिकारी/पदाधिकारी यांच्या विदेश दौऱ्यांचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागामार्फत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील शिफारस समितीसमोर सादर केले जातात. शिफारस समितीने केलेल्या शिफारशीवर मा. मुख्यमंत्री निर्णय घेतात. सदर प्रस्ताव तपासण्यासाठी शासनाने निकष विहित केले असून याबाबत वेळोवेळी मार्गदर्शक सूचनाही निर्गमित केल्या आहेत.

विदेश दौऱ्यांसंबंधीच्या आदेशांतील सूचना आवश्यक तेथे सुधारणा करुन एकत्रित स्वरुपात उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

Scanned by CamScanner

२. अखिल भारतीय सेवेतील, राज्य सेवेतील तसेच सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे इत्यादींचे अधिकारी/पदाधिकारी यांच्या विदेश दौऱ्यासंबंधी सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेले वरील सर्व आदेश अधिक्रमित करुन आता खालीलप्रमाणे सुधारित एकत्रित आदेश देण्यात येत आहेत:

अखिल भारतीय सेवेतील, राज्य सेवेतील तसेच सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे, सांविधिक संस्था इत्यादींचे अधिकारी/ पदाधिकारी/ कर्मचारी प्रशिक्षण, चर्चासत्र, कार्यशाळा, अभ्यास/ पाहणी, व्यापार/ उद्योगांची वृद्धी, संघटनांच्या नियतकालिक परिषदा/ कार्यक्रम, नियमित देवाणघेवाण, इत्यादि कारणांसाठी वेळोवेळी विदेश दौरे करतात. सदर दौरे करण्यासाठी देशाचे मौल्यवान परकीय चलन खर्च होते व दौऱ्यावर जाणाऱ्या अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे शासनाचे कामकाजही खोळंबते. काही दौरे अनुत्पादक असतात तर काही दौऱ्यांतून शासनास अत्यल्प लाभ होतो. काही प्रकरणी अन्य संस्था/ संघटनांचे आतिथ्य स्वीकारुन दौरे करणे शासनाच्या हिताचे ठरत नाही, या बाबी प्रस्ताव तयार करताना विभागांनी प्राथम्याने विचारात घ्याव्यात.

३. शासनास अधिकृतरित्या प्राप्त झालेल्या खालील प्रकारांतील विदेश दौऱ्यांचे प्रस्ताव दौऱ्याचे प्रयोजन राज्याच्या प्रगती व विकासाच्या दृष्टीने कशाप्रकारे फायदेशीर ठरेल याबद्दल खात्री करुन सादर करावेत:

(अ) अभ्यास दौरा,

(ब) आंतराष्ट्रीय कार्यशाळा,

(क) राज्याच्या हिताच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय संस्थांना व्यावसायिक व तांत्रिक ज्ञानवर्धनासाठी भेट,

(ड) आंतरराष्ट्रीय संस्थांशी राज्य शासनाच्या वतीने द्विपक्षीय आर्थिक, वाणिज्यिक, औद्योगिक स्वरूपाचे करार करण्यासाठी करावयाचा विदेश दौरा (अर्थात या दौऱ्यांना केंद्र शासनाच्या स्वतंत्र परवानगीची आवश्यकता राहील.),

(इ) नियमित देवाणघेवाण (Exchange Programme) कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाच्या मान्यतेनुसार अधिकाऱ्यांनी करावयाचे परदेश दौरे,

(फ) इतर देशांच्या शासनाकडून अथवा युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशनच्या (U.N.O.) विशेष एजन्सीजकडून किंवा मान्यताप्राप्त संस्थांकडून अथवा प्रादेशिक आर्थिक गटांकडून (Regional Groups) किंवा केंद्र शासनाने मान्य केलेल्या अशा तऱ्हेच्या इतर आंतरराष्ट्रीय संस्थांकडून उद्योग, वाणिज्यिक, शैक्षणिक, सांस्कृतिक बाबींसाठी अधिकृत निमंत्रण राज्य शासनाला प्राप्त झाले असल्यास व त्यानुसार राज्य शासनाने संबंधित अधिकाऱ्यांचा संबंधित देशात पाठवावयाच्या शिष्टमंडळात समावेश केला असल्यास व

(ग) द्विपक्षीय करारांतर्गत मान्य प्रशिक्षणे.

कोणत्याही शासकीय स्वरुपाच्या विदेश दौऱ्यांचे प्रस्ताव तयार करताना मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी पुढे विहित केलेल्या निकषांचे काटेकोरपणे पालन करावे:

१) राज्य शासनास लक्षणीयदृष्ट्या फायदेशीर ठरणाऱ्या किंवा टाळता येणे शक्य नसलेल्या दौऱ्यांचेच प्रस्ताव विचारात घ्यावेत. राज्य शासनास कोणता फायदा होईल ते स्पष्टपणे नमूद करावे, मोघम स्वरुपात नमूद करु नये.

२) दौऱ्यांच्या बाबतीत दौऱ्याचा कालावधी व शिष्टमंडळातील सदस्यांची संख्या कमीतकमी ठेवावी.

३) ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा दौऱ्याच्या उद्देशाशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही किंवा ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना दौऱ्यावर पाठविणे औचित्याचे नाही, अशा अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना स्वतंत्रपणे वा कोणत्याही शिष्टमंडळाचे सदस्य म्हणून विदेश दौरा करण्यास परवानगी देण्याविषयीचे प्रस्ताव सादर

Scanned by CamScanner

करु नयेत. यासंदर्भात विभागाच्या सचिवांनी व्यक्तिश: तपासणी करुन आणि खात्री करुन विदेश दौरा आवश्यक असल्याचे प्रमाणित करावे.

४) मंत्री आणि त्यांच्या विभागाचे सचिव/वरिष्ठ अधिकारी एकाच वेळी गैरहजर राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

५) राज्यातील योजनांसाठी विदेशी आर्थिक मदत मिळविणे ही बाब केंद्र शासनाच्या आर्थिक व्यवहार विभागाच्या कक्षेत येत असल्याने त्या प्रयोजनार्थ राज्य शासनाच्या मंत्री/अधिकाऱ्यांच्या विदेश दौऱ्याचे प्रस्ताव सादर करु नयेत.

६) कोणत्याही अधिकाऱ्यास सार्वजनिक वा खाजगी स्वरुपाच्या देशांतर्गत/विदेशी संस्था/संघटनांकडून परस्पर निमंत्रण प्राप्त झाल्यास अशा निमंत्रणाच्या आधारे विदेश दौऱ्यांचे प्रस्ताव तयार करु नयेत. विदेशी शासन/संस्थांकडून विशिष्ट अधिकाऱ्यांसाठी थेट राज्य शासनाकडे किंवा संबंधित अधिकाऱ्यांकडे प्राप्त होणारी विदेश दौऱ्याची/विदेशी शिष्यवृत्तीची निमंत्रणे राज्य शासनाने सरळसरळ नामंजूर करावयाची आहेत. फक्त केंद्र शासनाच्या परराष्ट्र मंत्रालयामार्फत आलेल्या विदेशी दौऱ्यांच्या निमंत्रणाचाच विचार राज्य शासन करु शकते. विचारात घ्यावयाच्या निमंत्रणाच्या प्रकरणांतही, दौऱ्याचे नावाने्शी निमंत्रण प्राप्त झाले असल्यास, संबंधित अधिकाऱ्याने त्याच्या कार्यालयीन कामातून निर्माण झालेल्या हितसंबंधातून वा व्यक्तिगत हितसंबंधातून दौऱ्यासाठी निमंत्रण वा शिफारस प्राप्त करुन घेतली आहे किंवा कसे याची विभागाने खातरजमा करुन घ्यावी. तसे आढळल्यास त्या अधिकाऱ्याच्या दौऱ्याचा प्रस्ताव सादर करु नये व त्याच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

७) सर्वसाधारण स्वरुपाची माहिती मिळविण्यासाठी अभ्यास दौरे आयोजित करु नयेत.

८) मंडळे, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम, सांविधिक संस्था यांतील अधिकारी/कर्मचारी शासनाने नियुक्त केले नसले तरी, तसेच संबंधित संस्था त्यांच्या निधीतून किंवा इतर माध्यमातून विदेश दौऱ्याचा खर्च करणार असल्या तरी, संबंधित संस्थांवर शासनाचे नियंत्रण असल्याने अशा संस्थांमधील अधिकारी/कर्मचारी यांची विदेश दौऱ्याची प्रकरणे राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांप्रमाणेच शिफारस समितीसमोर सादर करुन मा. मुख्यमंत्र्यांची मान्यता घेण्यात यावी.

९) सेवानिवृत्ती जवळ आलेले अधिकारी प्रशिक्षणक्षम ठरतीलच असे नाही. शिवाय असे अधिकारी शासकीय उत्पादकता व कार्यक्षमता वाढविण्यात योगदान देऊ शकतीलच याचीही खात्री देता येत नाही. त्यामुळे ज्या अधिकाऱ्यांना सेवानिवृत्त होण्यास किमान एक वर्षाचा कालावधी शिल्लक आहे, अशाच अधिकाऱ्यांना विदेश दौऱ्यावर पाठविण्याचा प्रस्ताव सादर करावा.

१०) विदेश दौऱ्यातून प्राप्त होणारी माहिती इतर माध्यमातून प्राप्त होईल किंवा कसे, तसेच विदेश दौरा न करता व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून सहभागी होता येईल किंवा कसे, त्याचबरोबर अन्य कनिष्ठ अधिकाऱ्यांना दौऱ्यावर पाठविणे शक्य असल्यास तशी कार्यवाही करण्याबाबत छाननी करण्यात यावी व तसे प्रमाणित करण्यात यावे.

११) (एक) कोणत्याही अधिकाऱ्याला **एका आर्थिक वर्षात** वर नमूद केलेल्या प्रकारांतील जास्तीत जास्त **तीन** विदेश दौरे करण्याची परवानगी देता येईल.

(दोन) वरील ३ (ग) वगळून कोणताही विदेश दौरा हा प्रवासास लागणारा कालावधी धरून कमाल १५ **दिवसांच्यावर** असणार नाही.

(तीन) शासनाने विदेश दौऱ्यावर पाठविलेल्या अधिकाऱ्यास प्रचलित नियमानुसार जो कमाल कालावधी अनुज्ञेय आहे त्या कालावधीकरिता विदेश दौऱ्याला जोडून सुट्टी घेवून परदेशात वास्तव्य करता येईल.



Scanned by CamScanner

१२) विदेश दौऱ्यांच्या काही प्रकरणी शासनाच्या पूर्वपरवानगीने अर्ज करावा असे संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते. अशा प्रकरणांतही प्रथम मा. मुख्यमंत्र्यांची मान्यता प्राप्त करुन घ्यावी व त्यानंतर विदेश दौऱ्यासाठी अर्ज करावा. अपवादात्मक प्रसंगी वेळेअभावी मा. मुख्यमंत्र्यांची पूर्वपरवानगी घेणे शक्य नसल्यास, प्रत्यक्ष दौरा सुरू होण्यापूर्वी मा. मुख्यमंत्र्यांची मान्यता मिळविण्याच्या अटीअधीन संबंधित विभागाचे प्रभारी मंत्री यांची मान्यता घेऊन अर्ज करण्यास परवानगी देता येईल. तथापि, त्यानंतर विदेश दौऱ्यास मा. मुख्यमंत्र्यांनी मान्यता न दिल्यास दौऱ्यावर जाण्यास परवानगी देता येणार नाही.

४. या आदेशांसोबत तपासणीसूची उपलब्ध करुन दिली आहे. ही तपासणीसूची पूर्णपणे भरुन त्यासह विभागांनी विदेश दौऱ्यांचे प्रस्ताव विभागाच्या मंत्र्यांच्या मान्यतेसाठी सादर करावेत. त्यांच्या मान्यतेनंतर प्रस्ताव या प्रयोजनार्थ गठीत केलेल्या शिफारस समितीसमोर सादर करण्यासाठी तपासणीसूचीच्या सहा प्रतींसह सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावेत.

५. वरीलप्रमाणे विहित केलेल्या निकषांच्या आधारे तपासून विभागांनी तयार केलेले विदेश दौऱ्यांचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडून शिफारस समितीसमोर सादर करण्यात येतील. या समितीची रचना पुढीलप्रमाणे आहे:

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव | ---- | अध्यक्ष |
| अ.मु.स. (वित्त)/प्र.स (वित्त) | ---- | सदस्य |
| अ.मु.स. (सेवा)/प्रधान सचिव (सेवा) | ---- | सदस्य सचिव |

शिफारस समिती प्रस्तावाची सर्वंकष तपासणी करेल. प्रस्तावित दौरा राज्य शासनाच्या खर्चाने केला जाणार असल्यास समिती सर्वसाधारणपणे शिफारस करणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत, राज्य शासनास दौऱ्यामुळे होणारा भरीव फायदा हा निकष विचारात घेण्यात येईल. शासनाव्यतिरिक्त अन्य संस्थांमधील अधिकारी/कर्मचारी विदेश दौरा करणार असतील आणि त्या संस्था खर्च करणार असतील तरीही याच निकषावर प्रस्ताव तपासण्यात येईल.

६. विदेश दौऱ्यांचे प्रस्ताव शिफारस समितीसमोर सादर करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविताना ते यासंबंधी वेळोवेळी विहित केलेल्या निकषांत बसत असल्याचे विभागाने प्रस्तावात स्पष्टपणे नमूद करावे. विहित कालावधीत प्राप्त न झालेले व निकषांची पूर्तता होत नसलेले प्रस्ताव शिफारस समितीसमोर सादर न करता सामान्य प्रशासन विभागाच्या स्तरावरुन नाकारुन परत पाठविले जातील. या आदेशांतील सूचनांची अंमलबजावणी होईल याची दक्षता विभागाच्या सचिवांनी घ्यावी. शासनाच्या सूचनांकडे दुर्लक्ष करुन विहित निकषांत न बसणारे प्रस्ताव सादर केल्याचे आढळल्यास विभागाच्या सचिवांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

७. विदेश दौऱ्याच्या प्रस्तावास मा. मुख्यमंत्र्यांची मान्यता मिळाल्यावर केंद्र शासनाची मान्यता मिळविणे आवश्यक राहील. विदेश दौऱ्यास केंद्र शासनाच्या आवश्यक त्या मंत्रालयांची मान्यता मिळाल्यानंतरच दौरा मंजुरीचे आदेश निर्गमित करण्यात यावेत. हे आदेश निर्गमित झाल्यावरच विदेश दौरा सुरू करता येईल. विदेश दौऱ्यास केंद्र शासनाची मान्यता मिळविण्यासाठी विहित केलेली कार्यपद्धती खालीलप्रमाणे आहे:

(एक) राज्य शासनाच्या सदस्यांनी त्यांच्या कार्यालयीन जबाबदाऱ्यांचे पालन करताना करावयाच्या विदेश दौऱ्यांचे प्रस्ताव संमतीसाठी आणि परकीय चलन मंजूर करण्यासाठी सचिव, भारत सरकार, वित्त मंत्रालय, आर्थिक व्यवहार विभाग यांना पाठवावे आणि त्यांच्या प्रती केंद्र शासनाच्या खालील मंत्रालयांना पृष्ठांकित कराव्यात :-



Scanned by CamScanner

(१) परराष्ट्र मंत्रालय,

(२) ज्या विषयासंबंधात दौरा प्रस्तावित केला आहे त्या विषयाशी संबंधित असलेले केंद्रीय प्रशासकीय मंत्रालय, आणि

(३) गृह मंत्रालय

ज्या प्रकरणामध्ये विदेशी आतिथ्य किंवा आर्थिक मदत अंतर्भूत असते ती प्रकरणे फॉरेन कॉन्ट्रीब्युशन (रेग्युलेशन) ॲक्ट, २०१० अनुसार केंद्रीय गृह मंत्रालयास सादर करावयाची असतात. परकीय आर्थिक मदतीचा समावेश असलेल्या प्रकरणात आवश्यक ती सहमती मिळविण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यावर आहे. राज्य शासनाच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम किंवा महामंडळे यांच्याकडून सादर केल्या जाणाऱ्या प्रस्तावांनाही ही कार्यपद्धती लागू आहे.

या संदर्भात फॉरेन कॉन्ट्रीब्युशन (रेग्युलेशन) ॲक्ट, २०१० च्या तरतुदीनुसार विदेशी आतिथ्य स्वीकारण्यावर घातलेल्या निर्बंधाकडे लक्ष वेधण्यात येत आहे. मंत्री, विधानमंडळाचे सदस्य, राजकीय पक्षाचे पदाधिकारी, शासकीय कर्मचारी किंवा महामंडळाचे कर्मचारी यांनी अशा प्रकारचे आतिथ्य (ज्याम ` प्रवास सहाय्य किंवा सवलत यांचा समावेश होतो.) स्वीकारण्यापूर्वी केंद्र शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. ज्या प्रकरणांमध्ये प्रवासखर्चासह परदेशी आतिथ्याचा समावेश होतो, अशा प्रकरणात आतिथ्य स्वीकृतीसंबंधी होकार कळविण्यापूर्वी गृह मंत्रालयाची स्पष्ट आणि पूर्वअनुमती मिळवणे आवश्यक आहे. प्रवास आणि वास्तव्य यावरील खर्च कोणत्या साधनाद्वारे भागविण्याचे प्रस्तावित केले आहे याबाबतची माहिती विहित नमुन्यात (एफ सी-२) भरून त्याबाबतचा परस्पर वेगळा पत्रव्यवहार करून ती त्या मंत्रालयाकडे उचित कालावधीत पाठविण्यात यावी.

(विदेशी आतिथ्य स्वीकारण्यापूर्वी केंद्र शासनाची पूर्वपरवानगी घेण्याच्या कार्यपद्धतीत केंद्र शासनाने बदल केले असून सुधारित कार्यपद्धतीनुसार शासकीय कर्मचारी व शासनाच्या मालकीच्या वा नियंत्रणाखालील महामंडळातील किंवा अन्य निकायामधील (body) कर्मचाऱ्यांच्या बाबतीत विदेशी आतिथ्य स्वीकारण्यास पूर्वपरवानगी देण्याबाबतचे अर्ज केवळ ऑनलाईन स्वरुपात स्वीकारले जातील. असा ऑनलाईन अर्ज भरताना, त्यासोबत अ) यजमान संस्था वा देशाचे निमंत्रणपत्र, ब) राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता (ज्यात सदर दौरा शासकीय आहे अथवा खाजगी यासह दौऱ्याचा दिनांक, स्थळ आणि हेतू नमूद केला असेल) आणि क) विहित नमुन्यातील फॉर्म- FC-२ ची स्वाक्षरित प्रतदेखील स्कॅन करुन अपलोड करावी. ऑनलाईन अर्ज (FC-२ नमुना) भरण्यासंबंधीच्या सविस्तर सूचना www.fcraonline.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.)

अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या विदेश दौऱ्याचा कालावधी दोन आठवड्यांपेक्षा जास्त असेल तर, त्या अधिकाऱ्यांच्या केंद्र शासनातील संबंधित संवर्ग नियंत्रण प्राधिकाऱ्याची, म्हणजे भा.प्र.से. अधिकाऱ्यांकरिता डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल, भा.पो.से. अधिकाऱ्यांकरिता मिनिस्ट्री ऑफ होम अफेअर्स व भा.व.से. अधिकाऱ्यांकरिता मिनिस्ट्री ऑफ एन्व्हार्नमेंट ॲन्ड फॉरेस्ट यांच्या सहमतीची आवश्यकता आहे.

(दोन) अधिकृत शिष्टमंडळाच्या सदस्यांची संख्या आणि सदस्यांची पूर्ण ...का देण्यात यावी.

(तीन) दौऱ्यामध्ये ज्या ज्या स्थानांना भेट देण्यात येणार असेल त्या त्या ठिकाणी करावयाचे कामकाज, विशेषत: विदेशी सरकारच्या प्रतिनिधीसमवेत होणाऱ्या अधिकृत बैठकीत होणारा व्यवहार याबाबतची माहिती देण्यात यावी. परकीय चलन वाचविण्याची नितांत गरज लक्षात घेता विदेश दौ-यांतील मुक्कामाचा कालावधी कमीत कमी असावा. तेथील मुक्कामाचा कालावधी,

(चार) संबंधित मंत्रालयांकडून शिफारशी प्राप्त झाल्यावर त्या एकत्रित करून दौऱ्यास मान्यता देणे, दौऱ्यावर विदेशात जाणाऱ्या सदस्यांची संख्या आणि दौऱ्यांमध्ये भेट देण्याची ठिकाणे व प्रत्येक ठिकाणाच्या भेटीचा



Scanned by CamScanner

कालावधी याबाबतचे अंतिम आदेश केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयातील आर्थिक व्यवहार विभागाकडून काढण्यात येतील.

(पाच) दौरा पूर्ण झाल्यानंतर तीन आठवडयांच्या कालावधीत शिष्टमंडळाच्या प्रमुखाने दौऱ्याच्या कामकाजाचा विस्तृत अहवाल केंद्रीय वित्त मंत्रालयाच्या आर्थिक व्यवहार विभागाकडे पाठवावा आणि त्याच्या प्रती दौऱ्याच्या विषयाशी संबंधित मंत्रालयास पाठवाव्यात.

तसेच, संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या विदेश दौऱ्यासंबंधीचा वरील अहवाल त्यांच्या प्रशासकीय विभागास व सामान्य प्रशासन विभागासही सादर करावा. अधिकाऱ्यांनी विदेश दौऱ्यात प्राप्त केलेल्या ज्ञानाचा/कौशल्याचा उपयोग विभागाने अन्य अधिकारी/ कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यासाठी करावा.

८. केंद्र शासनाची अनुमती गृहीत धरून कोणताही विदेश दौरा करण्यात येणार नाही, याची दक्षता घ्यावी. केंद्र शासनाने भारतीय दूतावासांना अशा आशयाच्या सूचना दिल्या आहेत की, या संदर्भात योग्य प्राधिकाराविना कोणालाही कोणत्याही प्रकारचे आर्थिक प्रदान केले जाऊ नये. संबंधितांची गैरसोय किंवा अडचण होऊ नये म्हणून केंद्र शासनाची याबाबतीतील कार्यपद्धती काटेकोरपणे पाळण्याची अनिवार्यता याद्वारे पुन्हा एकदा सर्व संबंधितांच्या नजरेस आणून देण्यात येत आहे.

९. विदेश दौऱ्यांचे प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी विदेश दौऱ्यास सुरुवात होण्याच्या तारखेपासून किमान तीन आठवडे अगोदर पाठवावयाचे असतात. त्यामुळे या प्रस्तावांना मा. मुख्यमंत्र्यांची मान्यता मिळविण्यासाठी ते किमान एक महिना अगोदर त्यांच्या कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे. प्रस्ताव सादर करण्याविषयीच्या या कालमर्यादा विचारात घेता, शिफारस समितीला त्यावर विचार करुन शिफारस करण्यासाठी पुरेसा कालावधी प्राप्त व्हावा यासाठी, संबंधित प्रस्ताव शिफारस समितीच्या विचारार्थ किमान सहा आठवडे अगोदर पाठवावेत.

१०. केंद्र शासनाने असे निदर्शनास आणले आहे की, परदेश दौऱ्यातील अधिकाऱ्यांनी किंवा लोकप्रतिनिधींनी निश्चित केलेल्या बैठका किंवा संमेलने (Seminar) ऐनवेळी रद्द केल्यामुळे किंवा पुढे ढकलल्यामुळे परदेशातील भारतीय दूतावासास गैरसोयीचे किंवा अडचणीचे होते. केंद्र शासनाने असेही निदर्शनास आणले आहे की, शेवटच्या क्षणी असे बदल जरी काही अपरिहार्य कारणामुळे करावे लागत असले तरी त्यामुळे परदेशातील भारतीय दूतावासास अशा बैठका पुन्हा आयोजित करणे अहितकारक ठरते व त्यामुळे पर्यायाने भारताच्या व विशेषत्वाने संबंधित आस्थापनेच्या प्रतिमेलाही धक्का पोहोचतो. या बाबी विचारात घेऊन केंद्र शासनाने अशा सूचना दिल्या आहेत की, आमंत्रणे स्वीकारताना किंवा भेटी ठरविताना संबंधितांनी सर्व प्रकारची आवश्यक ती काळजी घ्यावी. पूर्वमान्यता घेतल्याशिवाय आमंत्रण स्वीकारू नये अथवा भेटी आयोजित करणे टाळावे. जर शेवटच्या क्षणी बदल करणे अनिवार्य ठरले तर लवकरात लवकर त्याबाबतच्या सूचना संबंधितांना दिल्यास व नंतर उचित पत्रव्यवहाराद्वारे सुयोग्य भावना संबंधितांकडे व्यक्त केल्यास त्यामुळे प्रतिकूल व नकारात्मक संकेत सौम्य होतील. सर्व संबंधितांनी या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

११. प्रशिक्षण, चर्चासत्र, परिषद यांना उपस्थित राहण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनास विहित मुदतीत प्रस्ताव पाठविला गेला नाही तर शासकीय अधिकारी तसेच मंडळे, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम, सांविधिक संस्था यांच्यातील अधिकारी यांचा न्याय्य हक्क हिरावून घेतला जाण्याची व परिणामी संबंधित अधिकाऱ्यावर विनाकारण अन्याय होण्याची शक्यता असते. अशी शक्यता उद्भवू नये यासाठी सर्व मंत्रालयीन विभाग तसेच विभाग प्रमुख यांनी विदेश दौऱ्याबाबतचे सर्व प्रस्ताव विहित मुदतीत हाताळण्याची व शिफारस समितीस तसेच केंद्र शासनास पाठविण्याची दक्षता घ्यावी. जर एखाद्या प्रकरणात एखाद्या अधिकाऱ्याची न्याय्य संधी हिरावली गेल्याचे आढळून



Scanned by CamScanner

आल्यास त्याबाबतची जबाबदारी निश्चित करून संबंधितांवर व कार्यालय प्रमुखावर उचित कार्यवाही करणे आवश्यक राहील याची नोंद घ्यावी.

१२. शासनाचे अधिकारी/ कर्मचारी स्वखर्चाने रजा घेऊन विदेशात प्रशिक्षण, चर्चासत्र, शोधनिबंध सादर करणे अशा कारणांसाठी जात असतील आणि त्यांच्या विदेश दौऱ्यामुळे शासनावर आर्थिक भार पडत नसेल तर अशी प्रकरणे शिफारस समितीसमोर सादर करण्याची आवश्यकता नाही. तथापि, अशा प्रकरणी शासन स्तरावर मान्यता घेण्यात यावी व दौऱ्याच्या कालावधीत संबंधित अधिकाऱ्याकडून म.ना.से. (वर्तणूक) नियम, १९७९ मधील कोणत्याही तरतुदींचा भंग केला जाणार नाही अशी अट मंजुरी आदेशांत समाविष्ट करण्यात यावी. या प्रकरणी कोणत्याही संस्थेकडून प्रवासखर्च, विदेशी वास्तव्याचा खर्च वा अन्य कोणत्याही प्रकारचे आदरातिथ्य स्वीकारु नये.

१३. विदेशांत राहणाऱ्या नातेवाईकांना भेटणे, पर्यटन, वैद्यकीय उपचार घेणे अशा खाजगी कारणांसाठी करावयाच्या विदेश दौऱ्यांच्या प्रकरणामध्ये प्रस्ताव शिफारस समितीसमोर सादर करण्याची आवश्यकता नाही. मात्र,अशा प्रकरणी अधिकारी/ कर्मचाऱ्यास रजा मंजूर करण्यास सक्षम असणाऱ्या प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी घेण्यात यावी. या प्रकारचे दौरे कोणत्याही खाजगी/ वाणिज्यिक संस्थेच्या आमंत्रणावरुन करु नयेत व अशा कोणत्याही संस्थेकडून प्रवासखर्च, विदेशी वास्तव्याचा खर्च वा अन्य कोणत्याही प्रकारचे आदरातिथ्य स्वीकारु नये.

१४. सर्व मंत्रालयीन विभागांनी विदेश दौऱ्याचे प्रस्ताव सादर करताना वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच, सदरहू सूचना त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सार्वजनिक क्षेत्रातील सर्व उपक्रम, मंडळे व महामंडळे, सांविधिक संस्था तसेच शासकीय व निमशासकीय संस्था यांच्या निदर्शनास आणून देऊन या सूचनांचे त्यांच्याकडून काटेकोरपणे पालन केले जाईल याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना त्यांना द्याव्यात.

१५. हे आदेश शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यांचा संकेतांक २०१४१२२९१५३८२५१००७ असा आहे. हे आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhagwan Sahai

Digitally signed by Bhagwan Sahai
DN: c=IN, o=All India Service, ou=IAS, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Bhagwan Sahai
Date: 2014.12.29 16:01:09 +05'30'

(डॉ.भगवान सहाय)
प्रधान सचिव (सेवा)

**प्रति,**

१) राज्यपालांचे सचिव,
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
४) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,
५) सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/ स्वीय सहायक,
६) *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई



Scanned by CamScanner

७) *प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई

८) *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई

९) *सचिव, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, मुंबई,

१०) *सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई,

११) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

१२) *आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,

१३) सर्व मंत्रालयीन विभाग,

१४) सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख,

१५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती),

१६) विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती),

१७) सर्व विधीमंडळ सदस्य,

१८) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,

१९) निवडनस्ती

*पत्राने

Scanned by CamScanner

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक परदौ-१४१४/प्र.क्र.४६/का-११, दिनांक २९ डिसेंबर, २०१४ चे सहपत्र

## तपासणी सूची

| अ.क्र. | मुद्दा | विभागाने भरावयाची माहिती |
|---|---|---|
| १ | दौऱ्यावर जाणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व विभाग | |
| २ | अ) विदेश दौऱ्याचे ठिकाण | |
| | आ) दौऱ्याचा कालावधी (यात प्रवासाचा कालावधीही समाविष्ट करावा.) | |
| ३ | अ) विदेशी शासन/विदेशी संस्थेचे निमंत्रण केंद्र शासनाच्या परराष्ट्र मंत्रालयामार्फत आले आहे काय? | |
| | आ) विदेश दौऱ्यासंबंधीचे /प्रशिक्षणासंबंधीचे निमंत्रण सरळ अधिकाऱ्याकडे आले आहे वा राज्य शासनाकडे आले आहे? | |
| | इ) राज्य शासनाकडे सरळ निमंत्रण आले असल्यास ते विभागाच्या /संस्थेच्या नावाने आले वा अधिकाऱ्याच्या नावाने आले आहे? | |
| ४ | अधिकाऱ्याच्या नावे शिफारस/आमंत्रण आले असल्यास त्याने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या स्वत: शिफारस / निमंत्रण प्राप्त करुन घेतलेले आहे असे मत आहे काय? | |
| ५ | अ) विदेश दौऱ्याचे/ प्रशिक्षणाचे निमंत्रण केंद्र शासनाच्या संबंधित मंत्रालयाकडून आले आहे काय? | |
| | आ) केंद्र शासनाच्या संबंधित मंत्रालयाचे नाव काय? | |
| | इ) केंद्र शासनाने राज्य शासनाकडून अधिकाऱ्यांच्या नावाची शिफारस मागितली आहे की विशिष्ट अधिकाऱ्याची शिफारस केली आहे? | |
| ६ | अ) विदेश दौऱ्याचा प्रस्ताव संबंधित मंत्रालयीन विभागाने स्वत:हून शासनाच्या मंजुरीसाठी सादर केला आहे काय? | |
| | आ) हा दौरा या शासन परिपत्रकातील परिच्छेद ३ मधील कोणत्या प्रकारात मोडतो? | |
| ७ | प्रस्तावित दौरा संबंधित अधिकाऱ्यास आणि राज्य शासनास कसा उपयुक्त ठरेल याचे सविस्तर विवेचन | |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| ८ | अ) अधिकाऱ्याची या पदावर किती सेवा झाली आहे? | |
| | आ) या पदावर अधिकारी आणखी किती काळ राहण्याची शक्यता आहे? | |
| | इ) विदेश दौऱ्यासाठी/ प्रशिक्षणासाठी आवश्यक प्रशासकीय अनुभव/ शैक्षणिक अर्हता संबंधित अधिकाऱ्याकडे आहे किंवा कसे? | |
| | ई) विदेश दौऱ्यासाठी/ प्रशिक्षणासाठी किमान सेवेची अट असल्यास ती पूर्ण होते किंवा कसे? | |
| | उ) विदेश दौरा/ प्रशिक्षणासाठी वयाची मर्यादा घालण्यात आली असल्यास अधिकारी त्यासंबंधीच्या अटीची पूर्तता करतो किंवा कसे? | |
| | ऊ) अधिकाऱ्याची किती वर्षे सेवा शिल्लक आहे? (कालावधी मोजताना प्रवास संपेल तो महिना सोडून त्यापुढील महिन्यापासून वर्ष व महिन्यात मोजावा.) | |
| ९ | अ) विदेश दौऱ्याचा/प्रशिक्षणाचा खर्च कोण करणार आहे? | |
| | आ) खर्च करणारी संस्था पुढीलपैकी कोणत्या प्रकारात समाविष्ट होते? केंद्र शासन/केंद्र शासनाचा उपक्रम/ राज्य शासन /राज्य शासनाचा उपक्रम/मंडळ, महामंडळ/सांविधिक संस्था/ शासकीय संस्था/निमशासकीय संस्था/ विदेशाचे शासन/ त्या शासनाचा उपक्रम वा आधिपत्याखालील संस्था/जागतिक बँक/जागतिक बँकेची एजन्सी/ संयुक्त राष्ट्र संघटना/ तिच्या आधिपत्याखालील संघटना | |
| | इ) खर्च करणारी संस्था खाजगी स्वरुपाची असल्यास त्या संस्थेच्या उत्पन्नाच्या स्रोताचा तपशील द्यावा. | |
| १० | अ) राज्य शासन किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील निकाय (body) खर्च करणार असल्यास त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद आहे काय? | |
| | आ) या खर्चास मंजुरी देण्यास सक्षम प्राधिकारी कोण आहेत व त्यांनी खर्चास मंजुरी दिली आहे काय? | |
| ११ | विदेश दौऱ्यावर /प्रशिक्षणासाठी जाणाऱ्या अधिकाऱ्याविरुद्ध अ)विभागीय चौकशी चालू आहे काय? | |
| | आ)न्यायालयीन प्रकरण चालू आहे काय? | |
| | इ) सचोटी संशयास्पद असलेल्या अधिकाऱ्यांच्या यादीत नाव समाविष्ट आहे काय? | |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| १२ | अ) विदेश दौऱ्यावर/ प्रशिक्षणासाठी प्रस्तावित अधिकाऱ्यांनी गेल्या पाच वर्षात शासकीय कामासाठी/ प्रशिक्षणासाठी विदेश दौरा केला आहे काय? | |
| | आ) केला असल्यास,विदेश दौऱ्यांचा/ प्रशिक्षणांचा तपशील (यात दौऱ्याचा कालावधी व भेट दिलेल्या देशांची नावे नमूद करावीत. अधिकाऱ्यांना त्यांच्या पदासाठी अनिवार्य असलेल्या प्रशिक्षणासाठी केलेल्या विदेश दौऱ्यांचा यात समावेश करु नये.) | |
| १३ | प्रस्तावित दौरा हा चालू आर्थिक वर्षातील कितवा दौरा आहे? | |
| १४ | प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्याच्या दिनांकास दौऱ्यासाठी सहा आठवड्यांचा कालावधी शिल्लक आहे काय? | |
| १५ | दिनांक ३१ मार्च अखेरचे मालमत्तेविषयीचे विवरण सादर केले आहे काय? | |
| १६ | विदेश दौऱ्यातून प्राप्त होणारी माहिती विदेश दौरा न करता इतर माध्यमातून (जसे व्हिडिओ कॉन्फरन्स) प्राप्त होईल किंवा कसे? | |
| | अन्य कनिष्ठ अधिकाऱ्यांना दौऱ्यावर पाठविणे शक्य आहे काय? | |
| १७ | विदेश दौऱ्याच्या उद्देशाशी संबंधित असलेल्या व दौऱ्यावर पाठविणे आवश्यक असलेल्या अधिकारी /कर्मचाऱ्यांचाच प्रस्तावित दौऱ्यात समावेश करण्यात आला असल्याची बाब विभागाच्या सचिवांनी तपासली आहे काय? | |
| १८ | या अधिकाऱ्याचा प्रस्ताव मान्य न झाल्यास पर्यायी कोणते अधिकारी विदेश दौऱ्यासाठी /प्रशिक्षणासाठी पाठविता येतील? | |

टीप: वरील तपासणी सूचीमधील सर्व मुद्दयांची माहिती निसंदिग्धरित्या भरावी. एखादा मुद्दा लागू नसल्यास <u>लागू नाही</u> असे स्पष्टपणे नमूद करावे, कोणताही मुद्दा रिकामा सोडू नये. कोणत्याही मुद्दयासमोर – अशी खूण करु नये वा निरंक असे नमूद करु नये.

- तपासणी सूचीमधील सर्व माहिती बरोबर असल्याचे मी प्रमाणित करतो.

उप सचिव, --------------- विभाग



Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. ४३ /२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/४८६-ई/ ६७२३
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक : १५ .१२.२०१७.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे / औरंगाबाद / नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/ पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदूर्ग/ ठाणे/ नाशिक/ जळगांव/ धुळे/ अहमदनगर/ पुणे/ कोल्हापूर/ सांगली/ सातारा/ सोलापूर/ औरंगाबाद/ बीड/ जालना/ लातूर/ नांदेड/ उस्मानाबाद/ परभणी/ नागपूर/ भंडारा/ चंद्रपूर/ गडचिरोली/ वर्धा/ अमरावती/ अकोला/ बुलडाणा/ यवतमाळ.

....

विषय : अनुकंपा तत्वावर लिपीक-टंकलेखक [कनिष्ठ] पदी नेमणूक दिलेल्या परंतु विहित कालमर्यादेत विहित टंकलेखन व एमएससीआयटी संगणक कोर्स प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे सेवा समाप्त केलेल्या कर्मचा-यांना मागील रा.प.सेवेची सलगता न धरता पुर्ननेमणूक देण्याबाबत.

संदर्भ : क्र.राप/आस्था/४८६-ई/१४२१, दि.१५.०३.२०१७.

*****

रा.प.महामंडळामध्ये अनुकंपा तत्वावर लिपीक-टंकलेखक [कनिष्ठ] पदी नेमणूक दिलेल्या परंतु विहित कालमर्यादेत विहित टंकलेखन व एमएससीआयटी संगणक कोर्स उत्तीर्ण झाल्याबाबतचे दाखले दिनांक ०६.०९.२०१६ पर्यत सादर न करु शकलेल्या कर्मचा-यांची सेवा तात्काळ समाप्त करण्याच्या वरील संदर्भाधीन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

महामंडळ ठराव क्र.२०१७:११:०६ दिनांक ०८.११.२०१७ नुसार, उपरोक्त परिपत्रकीय सुचनांप्रमाणे लिपीक-टंकलेखक [कनिष्ठ] पदाच्या ज्या कर्मचा-यांची रा.प.सेवा समाप्त करण्यात आली होती, त्या कर्मचा-यांनी सदर पदाची अर्हता पूर्ण केल्याचे दाखले सादर केले असल्यास व यापुढे सादर करणा-या अशा कर्मचा-यांना पूर्वीच्या सेवेचा लाभ न देता नव्याने नेमणूका देण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली आहे .

संचालक मंडळाच्या वर नमूद केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करण्याकरीता खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. अनुकंपा तत्वावर नियुक्ती झालेल्या लिपीक-टंकलेखक [कनिष्ठ] पदाच्या कर्मचा-यांना टंकलेखन व संगणक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे विहित दाखले नियुक्तीच्या तारखेपासून २ वर्षे कालावधीत सादर करण्याची अट अस्तित्वात राहील.

२. नियुक्तीच्या तारखेपासून २ वर्षे कालावधीत टंकलेखन व संगणक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे विहित दाखले सादर न करु शकलेल्या कर्मचा-यांची रा.प.सेवा समाप्त करण्यात येईल.

--२--



Scanned by CamScanner

३. अनुकंपा तत्वावरील लिपीक-टंकलेखक [कनिष्ठ] पदातील ज्या कर्मचा-यांची वरील अनु.क्रमांक.२ प्रमाणे रा.प.सेवा समाप्त केल्यानंतर, जे कर्मचारी टंकलेखन व संगणक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे विहित दाखले यापुढे सादर करतील अशा कर्मचा-यांना पूर्वीच्या सेवेचा लाभ न देता नव्याने नेमणूक देण्यात यावी.

वरील सूचनांची विभागीय स्तरावर काटेकोरपणे अंमलबजावणी करून अनुपालन अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठविण्यात यावा.

परिपत्रकाची पोंच द्यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क. व औ.सं.)

प्रत माहितीसाठी अग्रेषित :
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां.व खं) / महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) महाव्यवस्थापक (यं.अ.) / मुख्य विधी अधिकारी / उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्र.१ - मुंबई-पुणे / नियंत्रण समिती क्र.२ - नाशिक - औरंगाबाद, नियंत्रण समिती क्र.३ - अमरावती - नागपूर / मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/ मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / स.क.अ. (मुख्यालय) / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन.



Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.५७/२०१७

क्र.राप/ कर्मवर्ग/आस्था/युआर/ ६०५४
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक १६ डिसेंबर,२०१७.

प्रति,

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्र.१ - मुंबई-पुणे, नियंत्रण समिती क्र.२ - नाशिक - औरंगाबाद, नियंत्रण समिती क्र.३ - अमरावती - नागपूर
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/ पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदूर्ग/ ठाणे/ नाशिक/ जळगांव/ धुळे/ अहमदनगर/ पुणे/ कोल्हापूर/ सांगली/ सातारा/ सोलापूर/ औरंगाबाद/ बीड/ जालना/ लातूर/ नांदेड/ उस्मानाबाद/ परभणी/ नागपूर/ भंडारा/ चंद्रपूर/ गडचिरोली/ वर्धा/ अमरावती/ अकोला/ बुलडाणा/ यवतमाळ.
- सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय), कर्मचारीवर्ग खाते ,रा.प. मध्यवर्ती कार्यालय,मुंबई

विषय : सरळसेवा भरती सन २०१६-२०१७ अंतर्गत देण्यात आलेल्या लिपिक-टंकलेखक [कनिष्ठ] पदातील जाहिरातीच्या अनुषंगाने घेण्यात येणा-या लेखी परीक्षा देण्याकरीता रा.प.महामंडळातील सदर पदाची सर्व अर्हता पूर्ण करणा-या सर्व पदातील इच्छुक कर्मचा-यांना परवानगी देणेबाबत.

संदर्भः १) क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/४७५९, दि.०१.०९.२०१७.

***

सरळसेवा भरती सन २०१६-२०१७ अंतर्गत लिपिक-टंकलेखक [कनिष्ठ] पदाच्या भरतीसाठी देण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने घेण्यात येणा-या लेखी परीक्षा देण्याकरीता रा.प.महामंडळातील सदर पदाची अर्हता पूर्ण करणा-या सर्व पदातील इच्छुक कर्मचा-यांना परवानगी देणेबाबत उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार परिपत्रकीय सूचना प्रसारित करण्यात आल्या होत्या.

१. आता दिनांक ०८.११.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत मा.संचालक मंडळाने सदर विषयी महामंडळ ठराव क्र.२०१७:११:१७ दिनांक ०८.११.२०१७ पारीत केला आहे त्यानुसार रा.प.महामंडळातील लिपीक-टंकलेखक [कनिष्ठ] पदाची जाहिरातीत नमूद केलेली वयाची अट वगळता इतर सर्व अर्हता पूर्ण करणा-या सर्व पदातील कार्यरत इच्छूक कर्मचा-यांना लेखी परीक्षेस बसण्याची परवानगी देण्याच्या धोरणात्मक निर्णयास संचालक मंडळाने मंजूरी दिली आहे.

२. संचालक मंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार या कार्यालयाचे पत्र क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/४७५९,दिनांक ०१.०९.२०१७ मधील मुद्दा क्र.१ मध्ये खालीलप्रमाणे अंशतः बदल करण्यात येत आहेत.

लिपीक-टंकलेखक [कनिष्ठ] या पदासाठी आवश्यक मराठी -३० श.प्र.मि व इंग्रजी- ४० श.प्र.मि.परीक्षा उत्तीर्ण असल्याचा शासन मान्य संस्थेने दिलेला दाखला तसेच D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत C.C.किंवा O स्तर किंवा C स्तर यापैंकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MSCIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र व दाखला हा लिपीक-टंकलेखक [कनिष्ठ] पदी नेमणूक दिल्यानंतर एक वर्षाच्या आत सादर करणे आवश्यक राहील अन्यथा सदर कर्मचा-यास त्याच्या मूळ पदामध्ये पदावनत करण्यात येईल.

या व्यतिरिक्त उपरोक्त संदर्भित परिपत्रकातील कोणत्याही अटी तसेच सूचनांमध्ये बदल करण्यात आलेला नाही याची नोंद घ्यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क. व औ.सं.)

प्रत माहितासाठी अग्रेषित : मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां.व ख)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) महाव्यवस्थापक (यं.अ.) / मुख्य विधी अधिकारी/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/ मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / स.क.अ. राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन.

SH\F:\2017-UR\UR-Circular - 2017.docx

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ४५/२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ ६७७०
कर्मचारीवर्ग खाते, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४००००८.
दिनांक: १५ डिसेंबर, २०१७.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/ नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

विषय: शिस्त व अपिल कार्यपध्दतीबाबत.

संदर्भ: परिपत्रक क्र.१६/२००५ क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/२३००दि.२७.०५.२००५.

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकानुसार व महामंडळ ठराव क्रमांक २००४:१२:०२ दिनांक २२.१२.२००४ अन्वये सुधारीत शिस्त व अपिल कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. शिस्त व अपिल कार्यपध्दतीमधील खंड ५ (आय) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद विहित करण्यात आली आहे.

" आरोपीत कर्मचा-याला त्याच्या / तिच्या बचावासाठी मदत करण्याकरिता एखाद्या सहकारी कर्मचा-यामार्फत अशा रितीने आपली बाजू मांडण्याचा हक्क राहील.

परंतू कामगाराच्या बाबतीत आरोपीत कामगार आणि आरोपीत व्यक्तीची जेथे नियुक्ती केली असेल, त्याच घटक कार्यालयातील म्हणजे आगार/टायर पुन:स्तरण प्रकल्प / विभागीय कार्यालय / प्रादेशिक कार्यालय / मध्यवर्ती कार्यालय / मध्यवर्ती कार्यशाळा इत्यादी मधील त्याच्या / तिच्या पसंतीच्या कोणत्याही कामगाराचो सहकारी कर्मचारी म्हणून मदत घेता येईल, मात्र असा सहकारी कर्मचारी कामावर असल्याचे समजण्यात येणार नाही.

**किंवा**

तो ज्या श्रमिक संघाचा सभासद आहे, त्याच्या पदाधिका-याला अशा चौकशीच्यावेळी उपस्थित राहण्याचा अधिकार राहील, आणि असा कामगार, त्याच्या पसंतीचा कामगार किंवा श्रमिक संघाचा प्रतिनिधी यांना अशा चौकशीच्यावेळी प्रकरणपरत्वे त्याच्या / तिच्या प्रकरणात किंवा त्या कामगारांच्या प्रकरणात प्रतिनिधीत्व करण्याचा हक्क राहील. "

२. दिनांक ०८.११.२०१७ रोजी झालेल्या रा.प.संचालक मंडळाच्या बैठकीत शिस्त व अपिल कार्यपध्दतीमधील खंड ५ (आय) मधील सध्याची तरतूद वगळून त्याजागी खालीलप्रमाणे सुधारीत तरतूद दाखल करण्यास रा.प.संचालक मंडळाने महामंडळ ठराव क्र.२०१७:११:२२ दिनांक ०८.११.२०१७ अन्वये मान्यता दिलेली आहे.

**" आरोपीत कर्मचा-याला त्याच्या / तिच्या बचावासाठी मदत करण्याकरिता एखाद्या सहकारी कर्मचा-यामार्फत अशा रितीने आपली बाजू मांडण्याचा हक्क राहील. अशा कामगाराच्या पसंतीच्या सहकारी कामगार / कर्मचारी यांना चौकशीच्या वेळी प्रकरणपरत्वे त्याच्या / तिच्या प्रकरणात किंवा त्या कामगाराच्या प्रकरणात प्रतिनिधीत्व करण्याचा हक्क राहील. मात्र असा सहकारी कामावर असल्याचे समजण्यात येणार नाही ".**

वरील सूचनांची रा.प.अधिकारी व कर्मचारी यांचे अपराध प्रकरणी काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर परिपत्रक सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावे तसेच आगार / घटक कार्यालयामधील सूचना फलकावर लावण्यात यावे.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)
रा.मा.प.

Scanned by CamScanner

**प्रत माहितीसाठी सादर रवाना :**

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / उप महाव्यवस्थापक (विधी) / सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / सहा.जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / मा.अध्यक्षांचे स्वीय सचिव/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.४६/२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ ६८०९
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आ.ना.मार्ग,
मुंबई-४०० ००८.
दिनांक:१८ डिसेंबर, २०१७.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-नाशिक व औरंगाबाद)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).

कार्यशाळा व्यवस्थापक,रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड
अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

विषय : अपहार प्रवण असलेल्या वाहकांच्या बदली धोरणाबाबत.
संदर्भ: १)परिपत्रक क्र.०२/२०१७,क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/६७४ दि.०१.०२.२०१७.
२)परिपत्रक क्र.३८/२०१७,क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/६००९ दि.१३.११.२०१७.

-----

संदर्भित परिपत्रकांन्वये अपहार प्रवण असलेल्या वाहकांच्या चतुर्थ व त्यानंतरच्या प्रमाद प्रकरणी संबंधित प्रदेशामधील अन्य विभागामध्ये संबंधित विभाग नियंत्रकांमार्फत शेजारच्या प्रदेशातील जवळील विभागात बदली करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि संदर्भित परिपत्रक क्र.२ मधील अनु.क्र.२ मध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

२. मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी दिलेल्या निदेशानुसार अपहार प्रवण असलेल्या वाहकांच्या चतुर्थ व त्यानंतरच्या अपहार प्रकरणी, कसुरदार वाहक ज्या प्रदेशामधील विभागामध्ये कार्यरत असेल, त्या प्रदेशाच्या शेजारच्या प्रदेशामधील जवळील विभागात सदर वाहकाची बदली करण्याचे अधिकार संबंधीत विभागाच्या सनियंत्रण समितीच्या उप महाव्यवस्थापकांस देण्यात येत आहेत. असे प्रस्ताव यापुढे मध्यवर्ती कार्यालयाकडे पाठविण्यात येऊ नयेत.

३. अशी बदली करताना सदर वाहकास त्याच्या मूळ गावी बदली मिळणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

या व्यतिरीक्त संदर्भित परिपत्रकातील तरतुदींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

वरील सूचनांची अंमलबजावणी करावी व परिपत्रकाची पोच द्यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत: माहितीसाठी सादर रवाना.**

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी /उप महाव्यवस्थापक (विधी) / सचिव,म.रा.मा.प. महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / सहा.जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / मा. अध्यक्षांचे स्वीय सचिव/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) /(मुख्यालय)/ (मनुष्यबळ)/(घटकसंवर्ग)/(प्रशासन)/(सामान्य प्रशासन)/ (मावक_)

Scanned by CamScanner

**कर्मचारीवर्ग खाते**
**परिपत्रक क्र. ४५/२०१७**

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ ६८८८
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आ.ना.मार्ग,
मुंबई-४००००८.
दिनांक: १८ डिसेंबर, २०१७.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र. १-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-नाशिक व औरंगाबाद)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक,रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड
अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय : चालकांची दृष्टी तिक्ष्णता चाचणी करणेबाबत.**

संदर्भ: १)परिपत्रक क्र.०८/१९९८,क्र.राप/आस्था/४०८-ई/२५५९ दि.०५.०५.१९९८.
२)परिपत्रक क्र.१९/२०१४ दि.१८.१०.२०१४.
३)परिपत्रक क्र.०२/२०१६,क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/३५७९ दि.२८.०७.२०१६.

-----

रा.प.कर्मचा-यांसाठी महामंडळाने शारिरीक पात्रतेसंबंधी जे विनियम तयार केलेले आहेत त्यातील अ.क्र.७ (१) (अ) मध्ये चालक पदातील कर्मचा-यांना त्यांची कर्तव्ये सुरक्षिततेने पार पाडणे सातत्याने शक्य व्हावे यासाठी चालकांची त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या तारखेपासून त्याचे वय ४० वर्षांचे होईपर्यंत प्रत्येक दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर डोळयांची तपासणी तसेच ४० वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या निवृत्तीच्या वयापर्यंत म्हणजेच त्यांच्या वयाच्या ५८ वर्षांपर्यंत दरवर्षी दृष्टी तिक्ष्णता चाचणी करण्याबाबत तसेच डोळयाला कोणतीही ईजा झाल्यास त्यासंबंधी पुन्हा तपासणी करण्याबाबत करावयाच्या कार्यवाही संदर्भात सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२. या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, संदर्भित परिपत्रकान्वये सूचना देऊनही काही विभागामध्ये चालकांची दृष्टी तिक्ष्णता चाचणी करणेबाबत योग्य मोहिम राबविली जात नाही. रा.प.बसमधून प्रवास करणा-या प्रवाशांचा प्रवास सुरक्षित होण्याच्या दृष्टीने चालकाची फार मोठी भुमिका असल्याने चालकांची दृष्टी तिक्ष्णता चाचणी वेळेवर करुन घेणे महत्वाचे आहे.

३. उपरोक्त परिपत्रकामधील सूचना विचारात घेऊन आपल्या विभागातील / घटकातील नेत्र तज्ञांची नेमणूक करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व कोणताही चालक दृष्टी तिक्ष्णता चाचणीविना राहणार नाही याची खबरदारी घ्यावी.

सदर परिपत्रकातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

(माधव काळे)
**महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)**

प्रत: सचिव,म.रा.मा.प. महामंडळ यांस माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.७७अ/२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/म.ब./ ६९४४-(अ)
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आ.ना. मार्ग,
मुंबई- ४०० ००८
दिनांक : २६ डिसेंबर, २०१७.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उप महाव्यवस्थापक(समिती क्र.१ मुंबई व पुणे )/(समिती क्र.२ नाशिक व औरंगाबाद)/ (समिती क्र.३ नागपूर व अमरावती).
- कार्यकारी अभियंता, रा.प.मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी-पुणे/औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक,
  रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/ कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/ परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ.

विषय :-पर्यवेक्षकीय कर्मचा-यांच्या पदांचे वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी या पदात रुपांतर करण्याबाबत.

संदर्भ :- कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.३२/२०१७ दिनांक २९.९.२०१७.

***

महामंडळ ठराव क्र.२०१७:११:१८ दिनांक ८.११.२०१७ अन्वये देण्यात आलेल्या निदेशानुसार वरील संदर्भित परिपत्रक या परिपत्रकाद्वारे रद्द करण्यात येत आहे.

रा.प.महामंडळातील कामाचे पर्यवेक्षण अधिक प्रभावीपणे करता यावे व उत्पादकता वाढविण्यासाठी पर्यवेक्षकीय कर्मचा-यांना वर्ग-२ (कनिष्ठ) अधिका-यांचा दर्जा देऊन स्वतंत्र जबाबदारी सोपविल्याने महामंडळाच्या उत्पादकतेमध्ये वाढ होईल या दृष्टीकोनातून राज्यसंवर्ग पदातील काही पदे वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी या पदामध्ये रुपांतरीत करण्यात येईल.

अधिकारी वर्ग-२ (कनिष्ठ) या संवर्गातील अधिका-यांच्या जबाबदा-या व कर्तव्य निश्चित करुन त्याबाबत परिपत्रकीय सुचना नियोजन व पणन खात्याकडून प्रसिध्द झाल्यानंतर,नव्याने निर्माण होणाऱ्या वर्ग-२ (कनिष्ठ) या संवर्गातील अधिकारी यांनी कार्यभार स्विकारण्याबाबत, करावयाच्या वेतननिश्चितीबाबत व देय अनुषंगिक भत्ते याबाबतच्या सविस्तर सूचना स्वतंत्रपणे प्रसारीत करण्यात येतील.

परिपत्रकास ठळक प्रसिध्दी देण्यात यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/महाव्यवस्थापक(वाहतूक)/ महाव्यवस्थापक(भांवख) / महाव्यवस्थापक(यं.अ.)/महाव्यवस्थापक(निवप)/उपमहाव्यवस्थापक(मावत)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य कामागर अधिकारी/ मुख्य लेखा परीक्षण अधिकारी/ विधि सल्लागार /जनसंपर्क अधिकारी/ सचिव,म.रा.मा.प.महामंडळ.
२) मा.अध्यक्ष यांचे स्वीय सहाय्यक/मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव.
३) कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय/राज्यसंवर्ग/ सा.प्रशासन/प्रशासन)/ कर्मचारीवर्ग अधिकारी (म.ब./समन्वय)/घटकसंवर्ग/मागासवर्ग कक्ष) रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.
४) सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/ (राज्यसंवर्ग) / (मागासवर्गकक्ष)/ (घटकसंवर्ग)(प्रशासन/ सामान्य प्रशासन)(म.ब./समन्वय) रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८.

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ४८/२०१७

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ ६६७३
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आ.ना.मार्ग,
मुंबई-४०००0८.
दिनांक: २८ डिसेंबर, २०१७.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-नाशिक व औरंगाबाद)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).

कार्यशाळा व्यवस्थापक,रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड
अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

विषय : रा.प.कर्मचारी विशेषत: चालक पदातील कर्मचा-यांसाठी समुपदेशक नेमणेबाबत.
संदर्भ: १)परिपत्रक क्र.१०/२०१२,क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/समुपदेशक/२७५३ दि.२०.०६.१२.
२)परिपत्रक क्र.०६/२०१३,क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/समुपदेशक/२७७३ दि.२४.०६.१३.
३)परिपत्रक क्र.२०/२०१४,क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/समुपदेशक/५१८० दि.०५.११.१४.
४)परिपत्रक क्र.०३/२०१५,क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/समुपदेशक/५६५, दि. ०३.०२.१५.

----------

रा.प.महामंडळातील कर्मचारी विशेषत: चालकांवर प्रवासी बस चालविताना सतत मानसिक ताण येत असल्याने त्याची परिणीती गंभीर प्रसंगामध्ये होऊ शकते. हे टाळण्याच्या उद्देशाने चालकांचे समुपदेशन करण्यासाठी ३-४ आगारांकरिता एक समुपदेशक याप्रमाणे मानद तत्वावर समुपदेशक नेमणूकीबाबत संदर्भित परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापी काही विभागांमध्ये समुपदेशक नेमले नसल्याचे किंवा नेमलेल्या समुपदेशकांची मुदत संपल्याने तसेच प्रतिक्षा यादीचा कालावधीही संपला असल्याने बहुतांश विभागात समुपदेशकांच्या जागा रिक्त असल्याचे दिसून येते.

समुपदेशनाची प्रक्रिया अधिक परिणामकारक व्हावी याकरिता ज्या विभागात समुपदेशकांची नेमणूक करण्यात आलली नाही त्या विभागात समुपदेशकांच्या नेमणूकीबाबत खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

१. **जाहिरात :** समुपदेशकाच्या नेमणूकीच्या अनुषंगाने मध्यवर्ती कार्यालयामार्फत रा.प.महामंडळातील सर्व विभागांकरिता जाहिरात प्रसारीत करण्यात येईल . उमेदवारांनी अर्ज संबंधित विभागांकडे सादर करावे असे जाहिरातीमध्ये नमुद करण्यात येईल. जाहिरातीचा नमुना या परिपत्रकासोबत जोडण्यात आला आहे. मध्यवर्ती कार्यालयामार्फत वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द केल्यानंतर सदर जाहिरातीस स्थानिक वृत्तपत्रांमध्ये संबंधित विभागांमार्फत **बातमी** स्वरुपात प्रसिध्दी देण्यात यावी.

२. **नियुक्तीबाबतचा कालबध्द कार्यक्रम :** समुपदेशकाच्या नियुक्तीबाबतचा कालबध्द कार्यक्रम खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आला आहे.

| क्र. | करावयाची कार्यवाही | कालावधी |
|---|---|---|
| १ | मध्यवर्ती कार्यालयामार्फत सर्व विभागांकरिता वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसारीत करणे | २८.१२.२०१७ |
| २ | उमेदवारांनी संबंधित विभागाकडे अर्ज करण्याचा अंतिम दिनांक | १७.०१.२०१८ |
| ३ | मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित करणे व उमेदवारांना समुपदेशक पदी नियुक्ती देण्याची कार्यवाही करणे. | १७.०२.२०१८ पर्यंत |

३. **निवड करावयाची कार्यपध्दती :** उपरोक्त प्रमाणे दिलेल्या जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या अर्जांची जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार छाननी करुन समुपदेशकाची निवड करण्याकरिता खालीलप्रमाणे समिती गठीत [illegible] आहे.

क्र.मा.प.

Scanned by CamScanner

संबधित विभागाच्या सनियंत्रण समितीचे उपमहाव्यवस्थापक, अध्यक्ष

संबंधित विभाग नियंत्रक, सदस्य

संबंधित कामगार अधिकारी, सदस्य

संबंधित विभागीय वाहतूक अधिकारी, सदस्य

संबंधित सहाय्यक/विभागीय कर्मचारीवर्ग अधिकारी, सदस्य सचिव

उपरोक्त नमुद केलेली समिती खाली नमुद केलेल्या अटी व शर्तींनुसार समुपदेशाकांची निवड करेल.

**४. समुपदेशकाची कर्तव्ये :** समुपदेशकांची नेमणूक तीन ते चार आगारांकरिता एक समुपदेशक याप्रमाणे मानद तत्वावर करण्यात येत असून, समुपदेशकाने आगारास महिन्यातून किमान ३ भेटी देणे आवश्यक आहे.

रा.प.महामंडळातील कर्मचा-यांचे विशेषतः चालक पदातील कर्मचा-यांचे समुपदेशनाद्वारे मानसिक ताण-तणावाचा निचरा करणे, त्याच्याशी वैयक्तीक संवाद साधून अडीअडचणी समजून घेऊन वैयक्तीक पातळीवर निराकरण करणे व आवश्यकता वाटल्यास वरिष्ठ पातळीवर अहवाल पाठवून पुढील उपचाराची गरज निदर्शनास आणून देणे.

**५. संमतीपत्र :** सदर परिपत्रकामधील अटी, शर्ती व कर्तव्य मान्य असल्याबाबतचे संमतीपत्र विभाग नियंत्रक निवड झालेल्या समुपदेशकाकडून घेतील व त्यानंतर नेमणूकीचे आदेश देतील. सदर नियुक्ती मानद तत्वावर असल्याने रा.प.महामंडळाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमीत सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचे अधिकार / हक्क अर्जदारास/समुपदेशकास नसल्याचे तसेच सक्षम प्राधिकारी/ नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत समुपदेशकाची सेवा समाप्त करण्याचे अधिकार असल्याचे संमतीपत्रामध्ये नमुद करण्यात यावे.

**६. प्रतिक्षा यादी :** आपल्या विभागात जितक्या संख्येने समुपदेशकाच्या जागा रिक्त आहेत, तितक्या संख्येने समुपदेशकांची निवड करण्यात यावी व आवश्यकतेपेक्षा जास्त समुपदेशक उपलब्ध झाल्यास उर्वरीत समुपदेशकांना (जास्तीत जास्त पाच) प्रतिक्षा यादीवर ठेवण्यात यावे. प्रतिक्षा यादीची मुदत तीन वर्षे राहील. प्रतिक्षा यादीवरील निवड झालेले समुपदेशक अन्य विभागांमध्ये समुपदेशक म्हणून काम करण्यास इच्छूक असल्यास त्याबाबतचा निर्णय मुख्य कामगार अधिकारी, रा.प.मध्यवर्ती कार्यालय यांच्या मान्यतेने घेण्यात यावा. विभागांकरिता समुपदेशकांची संख्या निश्चित केलेली आहे, तेवढयाच समुपदेशकांचा वापर करावा. ज्या आगारांमध्ये अद्यापही समुपदेशकांच्या नेमणूकीचा कालावधी शिल्लक आहे अशा आगारांमध्ये नेमणूकीचा कालावधी संपल्यानंतर सदर परिपत्रकानुसार निवड केलेल्या किंवा प्रतिक्षा यादीवर असलेल्या समुपदेशकांची नेमणूक करण्यात यावी.

**७. नेमणूकीचा कालावधी :** समुपदेशकाची नेमणूक एक वर्षासाठी मानद तत्वावर राहील. समुपदेशकाच्या नेमणूकीचा कालावधी संपल्यानंतर संबंधित समुपदेशकाचा मागील कार्यकाल विचारात घेऊन नेमणूकीचा कालावधी पुढे वाढविणेबाबत किंवा प्रतिक्षा यादीवरील अन्य उमेदवारास नेमणूक देणेबाबत संबंधित विभाग / घटक प्रमुखांमार्फत कार्यवाही करण्यात यावी. समुपदेशकाचा नेमणूकीचा कालावधी वाढविताना अ.क्र.५ येथे नमुद केल्यानुसार सदर समुपदेशकाकडून पुन:श्च संमतीपत्र घेण्यात यावे.

जर काही विभागांना जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज प्राप्त झाले नाहीत तर संबंधित विभागामार्फत जाहिरात देण्यात यावी व समुपदेशकांची मानद तत्वावर नेमणूक करण्याबाबत सदर परिपत्रकामधील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी. कोणताही विभाग / घटक समुपदेशकांच्या नेमणूकीवीना राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

**८. समुपदेशकांची विभागनिहाय नेमणूकीची संख्या :** या कार्यालयाचे संदर्भित परिपत्रक क्र.१ अन्वये समुपदेशन करण्यासाठी ३-४ आगारांसाठी एक समुपदेशक याप्रमाणे सुमारे ६३ समुपदेशक मानद तत्वावर नेमण्याबाबत ठरविण्यात आल्याचे कळविण्यात आले आहे. विभागातील आगारातील संख्या विचारात घेऊन विभागनिहाय समुपदेशकांच्या नेमणूकीची संख्या दर्शविणारा तक्ता सोबत जोडण्यात आला आहे.

**९. मानधन :** समुपदेशकांना दरमहा रु.४०००/- इतके मानधन + दैनिक भत्ता (वर्ग-१ अधिका-यांना लागू असलेला) देण्यात येईल. जाण्या-येण्यासाठी रा.प.साध्या बसचा मोफत पास देण्यात येईल. सदर मानधन संबंधित विभाग नियंत्रक यांचेकडून अदा करण्यात येईल.

--३--

Scanned by CamScanner

१०. **आगार समितीने करावयाची कार्यवाही :** कोणत्या चालकांना समुपदेशनासाठी पाठवावयाचे याबाबत निर्णय घेण्यासाठी परिपत्रक क्र.१०/२०१२ दि.२०.०६.२०१२ अन्वये आगार पातळीवर समिती गठीत करण्यात आलेली आहे. तथापि सदर समितीने चालकांना समुपदेशनासाठी पाठविताना कोणत्या बाबी विचारात घ्यावयाच्या याबाबत काही मार्गदर्शक बाबी खालीलप्रमाणे सुचविण्यात येत आहेत.

अ) प्रवाशांशी वागताना सौजन्याचा अभाव.
ब) व्यसनाधिनता.
क) गैरहजेरीचे प्रमाण जास्त.
ड) प्रापंचिक अडीअडचणीने मानसीक तणावाखाली वावर.
इ) लहान सहान गोष्टींमध्ये चिडखोरपणा, भांडखोरपणा व विध्वंसक प्रवृत्ती.
ई) व्यवस्थापनाच्या प्रत्येक निर्णयाकडे संशयाने पाहणे.
फ) वरील व्यतिरीक्त अन्य काही कारणे असल्यास तीही विचारात घ्यावीत.

चालकांना दोन वेगवेगळया सत्रांमध्ये समुपदेशनासाठी पाठविल्यानंतर सदर चालकाची वागणूक,आचार-विचारामध्ये काही बदल झाला आहे का? याबाबतचे मोजमाप समितीने करावयाचे आहे. आवश्यक वाटल्यास वेळप्रसंगी संबंधित चालकाशी संवाद साधून त्याचे मत विचारात घेण्यात यावे. किंबहुना त्याने काही सूचना केल्या असतील तर त्याचाही बारकाईने विचार समितीने करणे आवश्यक आहे. तसेच अशा चालकांचे समुपदेशन झाल्यानंतर त्यांच्यामध्ये नेमका काय बदल झाला आहे याबाबत निदर्शनास आलेल्या बाबी स्वतंत्र नोंदवहीमध्ये नोंदवून ठेवण्यात याव्यात.

सदर आगार समितीमार्फत दर महिन्याच्या ३० तारखेला बैठक घेऊन समुपदेशकांच्या कार्याचा आढावा घेण्यात यावा व समुपदेशन केलेल्या चालकांच्या नावासह अहवाल प्रत्येक महिन्याच्या २ तारखेपर्यंत संबंधित विभागास पाठविण्यात यावा.

तसेच शक्य झाल्यास नजिकच्या प्रजापिता ब्रम्हाकुमारी संस्थेच्या समुपदेशनाबाबत मदत घेण्यासंबंधी विचार करण्यात यावा.

१०. **मध्यवर्ती कार्यालयाकडे पाठवावयाच्या अहवालाबाबत :** समुपदेशक आगारास महिन्यातून किमान ३ वेळा भेट देतील. संबंधित विभागातील समुपदेशकांनी प्रत्येक महिन्यामध्ये किती आगारांना भेटी दिल्या व किती चालकांचे समुपदेशन केले तसेच समुपदेशन परिणामकारक ठरले आहे का ? याबाबतचा अहवाल विभागातील कामगार अधिकारी यांचे मार्फत मुख्य कामगार अधिकारी, रा.प.मध्यवर्ती कार्यालय,मुंबई यांचेकडे प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत खालील नमुन्यामध्ये पाठविण्यात यावा.

| क्र | समुपदेशकाचे नांव | आगाराचे नाव | भेट दिलेली तारीख | समुपदेशन केलेल्या चालकांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

मुख्य कामगार अधिकारी,रा.प.मध्यवर्ती कार्यालय यांचे सदर योजनेवर संपूर्ण सनियंत्रण राहील. तसेच मुख्य कामगार अधिकारी,रा.प.मध्यवर्ती कार्यालय प्रत्येक महिन्यात विभागांमार्फत प्राप्त झालेली माहिती संकलित करुन सक्षम प्राधिका-यांना अवलोकनार्थ सादर करतील.

तरी आपणास निर्देश देण्यात येत आहेत की, समुपदेशकांच्या नेमणूकीची प्रक्रिया उपरोक्त नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार त्वरीत सुरु करण्यात यावी. तसेच समुपदेशकाच्या नेमणूकीची कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण करण्यात यावी. समुपदेशकांच्या नेमणूका व कार्यवाहीचा अहवाल विभाग नियंत्रक हे मुख्य कामगार अधिकारी यांना पाठवतील.

परिपत्रकाची पोच द्यावी.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

सोबत: १)जाहिरात
२)विभागनिहाय समुपदेशकांची संख्या दर्शविणारा तक्ता

कृ.मा.प.

Scanned by CamScanner

## समुपदेशकांची विभागनिहाय संख्या

| क्र. | विभाग | आगारांची संख्या | आवश्यक समुपदेशक |
|---|---|---|---|
| १ | मुंबई | ५ | १ |
| २ | पालघर | ८ | २ |
| ३ | ठाणे | ८ | २ |
| ४ | रायगड | ८ | २ |
| ५ | रत्नागिरी | ९ | २ |
| ६ | सिंधुदुर्ग | ७ | २ |
| ७ | नाशिक | १२ | ४ |
| ८ | धुळे | ९ | २ |
| ९ | जळगांव | ११ | ३ |
| १० | अहमदनगर | ११ | ३ |
| ११ | पुणे | १२ | ३ |
| १२ | सांगली | १० | २ |
| १३ | सातारा | ११ | ३ |
| १४ | कोल्हापूर | १२ | ३ |
| १५ | सोलापूर | ९ | २ |
| १६ | औरंगाबाद | ८ | २ |
| १७ | नांदेड | ९ | २ |
| १८ | जालना | ४ | १ |
| १९ | परभणी | ७ | २ |
| २० | बीड | ८ | २ |
| २१ | लातुर | ५ | १ |
| २२ | उस्मानाबाद | ६ | २ |
| २३ | अमरावती | ८ | २ |
| २४ | अकोला | ९ | २ |
| २५ | यवतमाळ | ९ | २ |
| २६ | बुलढाणा | ९ | २ |
| २७ | नागपूर | ८ | २ |
| २८ | वर्धा | ५ | १ |
| २९ | चंद्रपूर | ४ | १ |
| ३० | भंडारा | ६ | २ |
| ३१ | गडचिरोली | ३ | १ |

Scanned by CamScanner